

१० मार्च १९७३

# माणूस

पन्नास पैसे

# आमची पिढी

संपादक
श्री. ग. माजगावकर

१० मार्च १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : चाळीस

## सप्रेम नमस्कार...

१९ फेब्रुवारी ७३

◻ 'माणूस'चा व्हिएतनाम विशेषांक वाचला. एकूण संकलन उत्कृष्ट केल्याबद्दल अरुण साधु यांस खास धन्यवाद. नाझी भस्मासुरापासूनची माणूसची परंपरा पुन्हा उज्ज्वलित झाली हे आवर्जून सांगावयास हवे.

—यातील एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली. हो ची मिन्हने कम्युनिस्ट असूनही व्हिएतनामी लढ्याची चळवळ जोपासताना इतिहासावर भर दिला—व्हिएतनामी संस्कृतीचाच उच्चार अभिमानाने केला—पोथीनिष्ठ कम्युनिस्टांचे मार्ग न धुंडाळता राष्ट्रवादाचाच पुरस्कार केला. किंबहुना साऱ्या कम्युनिस्ट यशस्वितेमागे केवळ 'भाकरी' नव्हती तर त्याही पलिकडील काहीतरी होते. जे मार्क्सच्या ग्रंथात आढळणार नाही.

आपल्याकडील कम्युनिस्ट व त्यांचे सहप्रवासी जेव्हा जेव्हा येथील राष्ट्रवादी प्रवाहाची उपेक्षा करतात, 'संस्कृती' शब्दाची कुचेष्टा करतात त्याचवेळी लक्षात येते की कम्युनिस्ट जगताच्याही इतिहासाकडे त्यांची जाणूनबुजून डोळेझाक करण्याची प्रवृत्ती आहे. अन् यातच त्यांच्या साऱ्या चळवळीचे अपयश लपलेले आहे.

व्हिएतनाम राष्ट्र या महान् लढ्यातून निश्चितच यशस्वीरीत्या बाहेर पडेल, अन् ते साऱ्या जगाला स्फूर्ती देईल—पण तत्पूर्वी त्याची कृत्रिम फाळणी नष्ट होऊन ते एकसंध झालेले असेल हे निश्चित.

आपल्याही देशाला भविष्यकाळात याच अग्निपरीक्षेतून जावे लागणार आहे का? काळच ठरवील !

सुहास बाक्रे, ठाणे

मुखपृष्ठ : आरे दूध वसाहतीतील गवळ्यांचे आंदोलन.

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

'ऑपरेशन फ्लड' ही पी. एल्. ४८० ची आणखी एक आवृत्ती आहे.

पी. एल्. ४८० जेव्हा सुरू झाले, आल्याकडील दुष्काळातून मार्ग काढण्यासाठी जेव्हा परदेशी धान्याच्या बोटी मुंबई बंदरात दाखल होऊ लागल्या तेव्हा, या मदतीचे बहुतेकांनी स्वागतच केलेले होते. आपण मागासलेले, परदेशी मदत —शक्यतो फुकट मिळत असलेली—घेतल्यावाचून आपला विकास कसा होणार, अशी वसाहतवादी वृत्तीच या क्षेत्रात सर्वत्र दिसून येत होती.

'माणूस' ने प्रथम या वृत्तीवर हल्ला चढवला. भूकबळी परवडले पण भीकबळी नको असा स्वतंत्र व स्वाभिमानी बाणा व्यक्त केला. पी. एल्. ४८० विरुद्ध वातावरण निर्माण केले. आज अर्थशास्त्रज्ञ, राजकीय नेते व इतरही अनेकजण स्पष्ट कबुली देत आहेत की, पी. एल्. ४८० मुळे भारतीय शेतीक्रांतीचे पाऊल वीस वर्षांनी तरी मागे खेचले गेले. आपल्याला परदेशात यामुळे बदनामी व बेअब्रूही भरपूर प्रमाणात सहन करावी लागली ती वेगळीच.

आता पी. एल्. ४८० अस्तित्वात नाही. पण पी. एल्. ४८० ची मनोवृत्ती मात्र गेलेली नाही. अंतर्गत पुनर्रचना करून आपल्या संकटांवर मात करण्याचे सुसंगत धोरण कणखरपणे अमलात आणण्याऐवजी आपण नव्या नव्या क्षेत्रात परदेशांची उधारउसनवारी करून, वेळ मारून नेण्याचा पी. एल्. ४८० मार्गच शॉर्टकट म्हणून स्वीकारत आहोत. अन्नाचा प्रश्न सुटला, आपल्याला युरोपीय देशांनी लोण्याच्या पर्वताखाली गोठवण्याचे ठरवले आणि आपणही तत्परतेने गुडघे टेकून मोकळे झालो. आज मुंबईकरांवर ही पाळी आलेली आहे. उद्या सगळीकडेच ही अवस्था दिसेल. परिणाम असा होईल, की आपल्या शेतीक्रांतीचे पाऊल आणखी मागे पडेल. आपला दूध उत्पादकही या परदेशी दडपणाखाली कायमचा चिरडला जाईल.

दूध हा जोडधंदा आहे, शेतीक्रांतीशी या धंद्याची सांगड घातली गेली पाहिजे ही उघड गोष्ट अद्याप आपण पुरेशी ध्यानात घेतलेली नाही. त्यामुळे कोट्यवधी रुपये खर्चून उभारलेल्या आरे-दापचरी योजना कोलमडत आहेत, ग्रामीण दूधयोजना प्रचंड नुकसानीत येत आहेत. मग कधी दूध महागते, बाटल्यांची बुचे बदलतात, लोक संतप्त होऊन मंत्र्यांना घेराव घालतात, दुधाच्या गाड्या अडवल्या जातात, सरकार खरेखोटे खुलासे करून वेळ मारून नेते. लोकही कंटाळून शेवटी मिळेल ते पत्करून स्वस्थ बसतात.

मुळापासून या सर्व परिस्थितीचा विचार व्हायला नको काय ?

अन्नाइतका दुधाचा प्रश्न महत्त्वाचा आहे, मूलभूत आहे. भारताच्या शंभर टक्के जनतेच्या हिताहिताशी या प्रश्नाचे नाते आहे, म्हणून तो सर्वांनी जाणून घेतला पाहिजे. इराण्याच्या दुकानात चहाचे घुटके घेत क्रांतीच्या धूम्रवलयांकित

चर्चा करणाऱ्या संतप्त तरुणांनी; तसाच खेडोपाडी पसरलेल्या दोन चार एकर-वाल्या शेतकऱ्यांनीही.


म्हणून एकाच अंकात हा सर्व विषय हाताळण्याचा हा माणूसचा प्रयत्न.

गेल्या वर्षी 'गरिबी हटाव' अंक माणूसने प्रसिद्ध केला होता. त्याच धर्ती-वर हा दूध विशेषांकही प्रसिद्ध होत आहे. गरिबी हटाव अंकाचे जसे सर्वत्र स्वागत झाले तसे या अंकाचेही होईल अशी आशा आहे.

कारण विषय जिव्हाळ्याचा आहे, लेखकही अधिकारी आहे. —संपादक



लेखक : र. गो. करमरकर
दाखल करीत आहेत
दूध उत्पादकांची, दूध ग्राहकांची फिर्याद...



# वृत्तपत्रांचा आवाज

गेल्या काही दिवसात 'दूध' ह्या विषयाने मुंबईत धमाल उडवून दिली आहे. काही दिवसापूर्वी पुण्याला गेलो होतो तेव्हा तेथे माणूसच्या श्री. ग. मा. ना भेटलो. भूमिपुत्र प्रतिष्ठानमार्फत मनोरजवळ कोंढाण व दामखिड येथे चाललेल्या आमच्या कामाबद्दल बोलणे झाले. अगदी सुरुवातीपासूनच श्री. माजगावकर यांची ह्या आम्ही नव्यानेच हाती घेतलेल्या कामाबद्दल आपुलकी आहे. त्यामुळे अगदी भान हरपून आमची मैफल जमली होती. उठता उठता मला माजगावकरांनी विचारले, 'महाराष्ट्र टाइम्समध्ये दुधासंबंधी आलेली बातमी वाचलीत की नाही?' आणि त्यांनी ता. ५–१–७३ चा पेपरच माझ्या पुढे ठेवला. 'आता होल दूध कायमचे बंद' ह्या मोठ्या मथळ्या-

खाली, 'शनिवार ता. ६–१–७३ पासून सरकारी दूध योजनेच्या ग्राहकांना होल दूध मिळणार नाही तर त्याऐवजी स्पेशल टोण्ड दूध १ रु. ७० पैसे लिटर या भावाने देण्यात येणार आहे,' अशी ती बातमी होती. माजगावकर मला म्हणाले.

'ह्या सरकारी दूध भाववाढीमुळे मुंबई शहरात खूप वादळ उठून राहिले आहे. ही दुधाची भानगड काय आहे हो? यासंबंधी सर्व प्रश्न मांडणारा एखादा लेख लिहा ना माणूससाठी.'

मी त्यांना कबूल करून मुंबईला आलो. आणि पहातो तो हे दूध प्रकरण बरेच पेटलेले होते. सर्व विरोधी पक्षांनी सरकारवर तोफा डागल्या होत्या. महागाई प्रतिकार संयुक्त महिला समिती ह्या संघटनेने ह्या प्रश्नावर शक्ती एकवटून महिलांचा विरोधाचा जोरदार मोर्चा बांधला होता. महागाईची झळ महिला वर्गाला अधिक जाणवते आणि दूध ह्या त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर जनमत संघटित करण्याचा त्यांचा प्रयत्न स्वाभाविकच होता. वर्तमानपत्रेही सरकारने चोरमार्गाने दुधाची भाववाढ केल्याबद्दल चवताळली होती. कोणत्याही प्रकारे अधिकृत घोषणा न करता 'मागल्या दाराने' दुधाच्या भावात सरकारने जी भाववाढ केली ही एकप्रकारे सरकारला मताधिक्याची जी गुर्मी आहे त्याचेच द्योतक होती. नाहीतर अनेक वर्तमानपत्रात अग्रलेख येऊन दूधयोजनेची सर्वांगीण चौकशी करावी ही मागणी शेतीमंत्र्यांनी फेटाळून लावली नसती. शेतीखात्याने ह्या प्रश्न इभ्रतीचा केलेला दिसतो आणि सर्व काही ठीक आहे. दूध भाववाढ केलेलीच नाही तेव्हा भाव कमी करण्याचा प्रश्न येतोच कुठे?' दुधातील फॅट कमी करून दुधात केलेला बदल सरकारी खुलाशानंतर ग्राहकांनी हसतमुखाने 'ग्रेसफुली' स्वीकारला आहे.' अशा सारखे मग्रुरीचे व जखमेवर मीठ चोळणारे खुलासे करायला कोणी धजावले नसते पण ते आज होत आहे.

मुंबईतील प्रमुख वर्तमानपत्रांनी ह्या प्रश्नाची दखल अग्रलेख लिहून घेतली आहे. प्रचलीत दुधाचा प्रश्न समजून घेण्यास त्यांचे काय म्हणणे आहे ह्याचा धावता आढावा येथे घेणे अस्थानी होणार नाही.

लोकसत्ताकार आपल्या ७–१–७३ च्या अग्रलेखात लिहितात, 'दारू स्वस्त; दूध महाग!' शासनाच्या अनेक निर्णयांची संगती लावणे मोठे कठीण असते. दुधाचा भाव अकस्मात वाढवून शासनाने आपल्या कर्तबगारीने सर्वांना थक्क केले. एकीकडे महागाई रोखण्याची भाषा करीत वनस्पतीचे भाव वाढवायचे, साखर महाग करायची, धान्ये व डाळी यांचे भाव वाढतच आहेत. आता गरिबांचे दूधही महागणार. 'दारू स्वस्त व दूध महाग' हे 'गरीबी हटविण्याचे प्रात्यक्षिक पाहिल्यावर 'आपल्या उपकारकर्त्यापासून परमेश्वरा आम्हाला वाचव' असे म्हणण्याची गरिबांवर पाळी आली आहे.

नवशक्तिकार आपल्या १२–१–७३ च्या 'उतू गेलेले दूध प्रकरण' ह्या अग्रलेखात लिहितात...ऑपरेशन फ्लड ही पीएल ४८० प्रमाणेच तात्कालीक योजना आहे. अन्नधान्यात जशी स्वयंपूर्णता हवी तशीच ती दुधाच्या उत्पादनातही हवी. ती स्वयंपूर्णता मिळविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र सरकारने योजना आखून ती कार्यान्वित केली पाहिजे. या दृष्टीने गेली १२ वर्षे बव्हंशी फुकटच गेली आहेत. आणि दूधउत्पादनाच्या म्हणून सरकारने ज्या योजना कार्यान्वित केल्या त्यात काही सत्तादांडग्यांनी शिरून योजनेतील दूध लोणी फस्त केले आहे. हे अपप्रकार चव्हाटयावर आणून निर्दोष योजना आणि तिची अंमलबजावणी या संबंधीची चळवळ विरोधी पक्षांनी हाती घेऊन सरकारला ठिकाणावर आणावे.'

नवाकाळकार आपल्या ता. १०–१–७३ च्या 'भाववाढ करताना ती अटळ असल्याबद्दल लोकांची खात्री पटवा' ह्या अग्रलेखात दूध मंडळाच्या कारभाराची चौकशी मागतात. ते लिहितात 'एस. टी. चे दर वाढले, साखरेचे भाव वाढले, आणि आता दूध महाग झाले यात केवळ शेतकऱ्यांचाच कळवळा असेल तर तेही एकवेळ क्षम्य म्हणता येईल; पण शेतकऱ्यांच्या कैवाराच्या नावाखाली उधळपट्टी आणि नासधूस यांना मुक्तद्वार देण्यात येत नाही अशी तरी शक्य ती खबरदारी घेण्यात आली आहे, हे भाववाढ करताना सरकारने सामान्य माणसाला पटवून दिले पाहिजे. दुधाच्या बाबतीत भाववाढ झाल्याने पुनः असंतोष व चळवळी सुरू होणार आहेत. यावेळी सरकारने जाहीर चौकशी करून नुकसानी व उधळपट्टी याचे उच्चाटन झाले आहे व दरवाढ करण्याशिवाय गत्यंतर नाही असे लोकांना पटवून देणे अगत्याचे आहे.'

महाराष्ट्र टाईम्सकार आपल्या ता. १२–१–७३ च्या 'दूधयोजनेची चौकशी हवी' ह्या अग्रलेखात चौकशीची मागणी करतात. ते लिहितात, 'लोकांना ६ टक्क्यांचा स्निग्धांश पाचावर आला याचा राग नाही. दिल्लीत ५ टक्के स्निग्धांशाचे दूध मिळते. गुजरातेतही मिळते. पण तेथे किंमती कमी आहेत. त्या येथे स्वीकारीत का नाहीत? गुजरातमध्ये दुष्काळ नाही काय? तेथे शेतकऱ्यांना भाव वाढवून देण्याची भाषा नाही. खरी मेख आहे ती ही की, सर्व दूधयोजना तोटयात चालते आणि तिचा भूदंड ग्राहकांवर बसविला जात आहे...

...'गुजरातमध्ये दूध उत्पादन सतत वाढते; तेथील लोकांना दुधाच्या भुकटीवर अवलंबून रहावे लागत नाही; सहकारी दूधसंस्था उत्तम चालतात; आणि येथे मात्र दुधाच्या सोसायटयांत राजकारण; यंत्रसामुग्रीचा अपुरा वापर; दुधाचा अपुरा पुरवठा आणि आयात भुकटीवर आपण अवलंबून ही स्थिती आहे...पण आपल्या दूधयोजनेचा मध्यबिंदू पशुसंवर्धनाचा नाही. आयात भुकटी आणावी, मोठीमोठी यंत्रसामुग्री आयात करावी आणि प्रचंड इमारती

बांधाव्या यावर सारा भर आहे...मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक हे शेतीप्रिय व शेतीनिष्ठ असले, तरी महाराष्ट्राची शेती व दूधव्यवसायासारखे अनुषंगिक व्यवसाय मागे राहिले. काही धडाडी दाखवून असे कार्यक्रम अमलात आणायचे असतात. पण माजी शेतीमंत्री श्री. बाळासाहेब सावंत हे करू शकले नाहीत. गेल्या पाच वर्षांतील दूध–पशुसंवर्धनातील आबाळ आता अंगाशी आली आहे. म्हणून महाराष्ट्रातील दूधधंद्याची आबाळ का झाली, याचा तपास तज्ज्ञांकरवी करावा. तो करताना आणंदवाल्यांचे वर्चस्व होऊ देऊ नये.'

ता. १७–१–७३ रोजी 'दूधयोजनेची चौकशी कशासाठी' हा पुन्हा चौकशीची मागणी करणारा अग्रलेख महाराष्ट्र टाईम्सने लिहिला आहे. त्यात ते लिहितात, 'मुंबईत दुधासंबंधी जो गोंधळ घातला गेला त्याची चर्चा आतापर्यंत भरपूर झाली आहे. या निमित्ताने शेतीमंत्री श्री. शंकरराव चव्हाण यांनी दोन-चार दिवसांच्या अंतराने पुन्हा एकदा वृत्तपत्रांना मुलाखत दिली. या सर्व प्रकरणाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या दूधयोजनेची सर्वांगीण चौकशी व्हावयास हवी असे अनेकांप्रमाणे आम्ही सुचविले होते ते शंकरराव चव्हाणांनी अगदीच क:पदार्थ मानलेले दिसते. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही हे खरेच. पण शेतीखात्याने हा प्रश्न प्रतिष्ठेचा मानता कामा नये... दुधाच्या उत्पादनात वाढ करणे हा ग्रामीण आर्थिक जीवन सुधारण्याचा एक प्रभावी उपाय आहे. यात आपण मागे का याची चौकशी करा असे सुचविले ते सहजासहजी उडवून लावण्यासारखे नाही. दुर्दैवाने शंकरराव चव्हाणांनी ही सूचना उडवून लावली. या धोरणाची गाडी बाळासाहेब


# आणि ड्रॅगन जागा झाला

लेखक : अरुण साधू

किंमत . चवदा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

सावंतांच्या लाइनीवर जाईल. सावंतांनी मोकळ्या मनाने अशा पत्रांचा कमी विचार केला नाही....पशुसंवर्धन व शेती या क्षेत्रात बरेच मोठे कार्य करता येण्यासारखे आहे. कशाची व कशासाठी चौकशी असली वृत्ती धारण केल्यास मात्र आहे त्यापेक्षा मागे जाण्याचा महाराष्ट्रावर प्रसंग येईल.'

वरील उताऱ्यावरून ह्या दुधाच्या प्रश्नाची तीव्रता लक्षात येईल. सरकारी पातळीवर दूधयोजनेमध्ये बरेच काही-तरी चुकते आहे. त्याचा परिस्फोट असा केव्हातरी सावळागोंधळ होतो किंवा भाववाढ होते, तेव्हाच होतो आणि पुन्हा स्थिरस्थावर होऊन पुन्हा योजना आपल्या खेकड्याच्या चालीने चालत रहाते.

प्रथम येथे स्पष्ट केले पाहिजे की, पूर्वी सरकारमार्फत होणाऱ्या होल दुधाचा स्निग्धांश ७% होतो. ७% स्निग्धांश देण्याची हमी सरकारने वेळो-वेळी दिलेली आहे. दूध उत्पादकांना जे भाव दिले जातात, तेही ७% स्निग्धांश हाच पाया धरून ता. १-१-१९६९ ते ३०-६-१९७१ पर्यंत आरे कॉलनीत दुधाला जे भाव देत असत ते खालील-प्रमाणे—


| | | | |
|---|---|---|---|
| ए प्रत—म्हणजे ७% स्निग्धांश किंवा अधिक स्निग्धांशाला | १०० लिटरला | | १४६·२० रु. |
| बी प्रत ,, ६·९ ते ६·५ स्निग्धांश | ,, | ,, | १३६·२० रु. |
| सी प्रत ,, ६·४ ते ६ ,, | ,, | ,, | १२३·२० रु. |

डी प्रत म्हणजे ६ टक्क्याहून कमी स्निग्धांशाचे दूध घेतले जात असे.

पण पैसे दिले जात नसत. ह्याचा अर्थ १% स्निग्धांशाला १ लिटरला २५ पैसे कमी मिळत असत. आता ५% स्निग्धांशाचे दूध मिळणार आहे. म्हणजे लिटरमागे ०·५० पैशांनी वाढ झाली आहे. तेव्हा भाव वाढविलेच नाहीत ह्या म्हणण्याला काहीच अर्थ नाही.

आता ही जी भाववाढ झाली आहे त्यामागे वाढलेल्या किंमती जबाबदार किती व सरकारची उधळपट्टी, नासधूस, चुकीचे धोरण, व्यापारी दृष्टिकोनाचा अभाव किती हा खरा वर्तमानपत्र-कारांनी उपस्थित केला आहे तो मुद्दा महत्वाचा आहे. सरकारची चुकीची धोरणे, दुधाचे भाव नक्की करण्या-बद्दलचा अशास्त्रीय दृष्टिकोन, बेदरकार गैरहिशेबीपणा, उधळपट्टी, अर्थशास्त्रीय दृष्टिकोनाचा अभाव, सतत तोट्यात चालणाऱ्या योजना रेटण्याचा अट्टाहास, यंत्रसामुग्रीचा अपुरा वापर, अपुरा दूध-पुरवठा, आयात भुकटीवर अवास्तव भिस्त, राजकीय स्वार्थ आणि दूध-उत्पादनाला महत्त्व देण्याऐवजी वाटपा-वर लक्ष ही सर्व कारणे आजच्या असंतोषकारक परिस्थितीला कारणीभूत आहेत. तेव्हा खरोखर परिस्थिती आहे तरी काय ?

●



# सन १९४० व नंतर

मी जेव्हा समग्र दूध प्रश्नाचा विचार सुरू करतो तेव्हा मी सन १९४० साली प्रथम जेव्हा ह्या दुधाच्या धंद्यात आलो, तेव्हापासूनचा चलत चित्रपट नजरेसमोरून सरकू लागतो. तेव्हा दुधाचा भाव ४ ते ५ आणे शेर होता. एका चांगल्या दुभत्या म्हशीची किंमत ८० रु. ते १०० रु. होती. मुंबई शहराला लागणाऱ्या दुधाची बहुतेक सर्व दुभती जनावरे मुंबई शहरातच होती. तेव्हा उपनगरे विकसित झालेली नव्हती. लोकवस्तीही फारशी वाढलेली नव्हती. मी सुद्धा धंद्याची सुरुवात ग्रँटरोड येथील मुंबईच्या अगदी दाटीवाटीच्या भरवस्तीत २५०० म्हशींच्या असलेल्या

तबेल्यात ८–१० म्हशी ठेवूनच केली. बांबे सेंट्रल, भुलेश्वर, महालक्ष्मी, ताडदेव, सातरस्ता, लोअर परेल, अंजीर वाडी, माझगाव अशा अगदी भर वस्तीत म्हशींचे गोठे विखुरलेले होते. बहुतेक दूधउत्पादक किंवा गवळी हे मुसलमान, खेडा जिल्ह्यातील गुजराती पटेल किंवा यु. पी. चे भय्ये होते. काम करणारे कुलाबा जिल्ह्यातील, काही महाड–माणगावचे गवळी व बहुसंख्येने यु. पी. चे भय्ये हे नोकर असत.

धंद्यातील बहुतेक सर्व मंडळी अशिक्षितच होती. किल्लेदार, भरुचा वगैरे मंडळी 'दुधाचे बादशहा' म्हणून ओळखले जात. एकेकाची स्वतंत्र संस्थाने होती. दोन दोन हजार म्हशी असत. माझ्यासारख्या पदवीधर तरुणाची ह्या धंद्यात खूपच हेटाळणी होत असे. मी प्रथम म्हशी खरेदी करण्याकरिता जेव्हा ग्रँट रोड येथील फलाटावर एका वेगळ्याच विश्वात पाऊल टाकले, तेव्हा माझ्याकडे अगदी चमत्कारिक नजरा रोखलेल्या मला अजून आठवत आहेत. 'ये चिप्पड कहाँसे आया?' असा अधिक्षेप करणारे उद्गारही आठवत आहेत. मी थोडासा थट्टेचाच, उपहासचाच विषय त्या जगात झालो होतो. आणि इकडे घरची मंडळीही माझ्यावर फारच रुष्ट होती. चांगला वकिलीचा प्रतिष्ठेचा धंदा सोडून हा 'घाणेरडा' रोज शेणामुताशी संबंध असलेला हलका धंदा काढण्याची अवदसा मला कोठून आठवली आहे म्हणून जवळ जवळ बहिष्कृतच होतो. त्यावेळी तर गुजराथमध्ये अशी एक म्हणच होती म्हणे की 'दुधाचा धंदा करणाऱ्याला मुलगी कोण देणार ?' धंद्यात येण्यापूर्वीच मी विवाहित होतो म्हणून ह्या दुःखाचे चटके मला भोगायला लागले नाहीत हे सुदैवच ? आणि पुढे काही वर्षांनी माझा ह्या धंद्यात जम बसू लागल्यावर आणखी विचित्र अनुभव येऊ लागले. एकदा एक मित्र मुद्दाम मला भेटायला आले. थोड्याशा चिंतेच्या सुरात म्हणाले, 'आबासाहेब थोडेसे काम आहे माझे तुमच्याकडे. माझी दोन मुले चांगली स्थिरस्थावर झाली आहेत. परंतु सर्वात धाकटा ३ वेळा मॅट्रिकला नापास झाला. त्याचे डोके काही चालत नाही. त्याला म्हशींच्या धंद्यात घालायचे म्हणतो. तेव्हा तुम्ही जरा त्याकडे लक्ष द्या. तुमच्याकडे पाठवू म्हणतो.' मी हे सर्व ऐकून मला अप्रत्यक्ष मिळालेले शिफारस पत्र मनातल्या मनात खिशात ठेवले आणि त्यांना सांगितले 'की तुमचा मुलगा एवढा मॅट्रीकपर्यंत शिकला आहे. डोके कमी असले म्हणून काय झाले ? त्याला तुम्ही सरकारी नोकरीत चिकटवा. तेथे तो चांगला पुढे येईल. त्यांनाही बरे वाटले आणि मीही सुटकेचा श्वास टाकला. एकूण दूध धंद्याकडे पहाण्याची ही अशी दृष्टी होती त्यावेळी !

बहुतेक सर्व अशिक्षित मंडळी ह्या धंद्यात होती, हे वर सांगितलेच आहे. त्याच्या जोडीला अंधश्रद्धा, शास्त्रीय दृष्टिकोनाचा संपूर्ण अभाव व स्थितीप्रियताही होती. ग्रँटरोडला आमच्या

शेजारी फोरदिलखान पठाण, म्हणून एक गवळी होता. रिंडरपेस्ट किंवा बुळकांडो रोग सुरू होऊन त्याच्या १५० म्हशींपैकी दोन दिवसात ३०–४० म्हशी तडकाफडकी मेल्यावर ह्याने हाजीमलंगहून अंगारा आणून गोठर्यातील बहालावर पुरचुंडी करून बांधला. हिंदू गवळी दुर्गादेवीचा पूजापाठ सुरू करायचा. त्यांच्या बाजूलाच आमच्या म्हशी होत्या. तेव्हा ह्या रोगाच्या प्रतिबंधक उपायासाठो मला त्यावेळी केवढो यातायात करावी लागली. मोठ्या मुष्किलोने मला हाफकिन् इन्स्टीटयूटमध्ये डॉ. साठे नावाचे म्हातारेसे डॉक्टर भेटले व मोठा आटापिटा करून R. P. व्हॅक्सीन आणवून काही म्हशींना इंजेक्शन्स दिली. अन् ही अगदी साधी नित्याची वाटणारी गोष्ट त्यावेळी अपूर्व तर होतीच. पण दुर्लभही होती.

एकंदर अशा परिस्थितीत मुंबईतील ५०,००० म्हशींचे साधारणपणे अडीचलाख लिटर दूध मुंबईतील सुमारे २५ लाख लोकवस्तीला पुरवले जात होते. त्यात लालटोपीवाले कावडी घेऊन वसईकडचे गवळीही काही भर घालीत असत. तो त्यांचा शेतीचा जोडधंदा होता.

सामान्यतः विश्वास बसणार नाही इतकी तफावत त्यावेळच्या व आजच्या वस्तूंच्या किंमतीत आहे. आणि गेल्या वर्षभरात तर जी किंमतीची वाढ होत आहे, त्यामुळेच तर एकूण सर्व परिस्थिती आवाक्याबाहेर जात चालली आहे. सन १९४० व सन १९७१ सालातील दूधउत्पादनाला आवश्यक त्या वस्तू व सेवा यांच्या किंमतीचे आकडे खाली देत आहे.

| वस्तू | सन १९४० मधील किंमती | सन १९७१ मधील किंमती |
|---|---|---|
| सूर भर्डा : | रु. ८ ते १०–१०० किलोकरता | रु. ९० ते १००–१०० किलोचा |
| गवत : | रु. १० ते १२ रु. ५०० किलोची किमत | १०० ते १५०–५०० किलो |
| म्हैस : | रु ८० ते १०० रु. प्रत्येकी | रु. २५०० ते ३००० प्रत्येकी |
| मजुरीचे दर : | रु. १९ ते २१ दरमहा | रु. १५०–१६० दरमहा |
| दुधाचे दर : | ३० नवे पैसे १ लिटरला | रु. २/१ लिटरला |

दूधधंद्यांतील अराजक : दूध उत्पादन ज्या परिस्थितीत होत असे ती परिस्थिती अंगावर शहारे आणणारी होती. तबेले भरवस्तीत तर होतेच; पण ते अत्यंत गलिच्छ व अस्वच्छ असत. त्यात बेसुमार गर्दी असे. थोड्या जागेत जास्त जनावरे बांधण्याची चुरस असे. शेण वाहून नेण्याची समाधानकारक साधने नव्हती. बहुतेक सर्व शेण पाण्यात कालवून गटारात सोडून देण्यात येत असे. तेथील शेण व मलमूत्र हा तेथील रहिवाशांच्या स्वास्थ्याला सदैव धोका होता. दूध स्वच्छ रहाण्याकरिता जी किमान स्वच्छता हवी ती अभावानेच

असे. दूध अस्वच्छ तर असेच; पण पाणीदारही असे. वासरे जगविण्याचा प्रश्नच नव्हता. भाकडचा म्हशी सरसहा कसायांना विकल्या जात. दूध हे पूर्णान्न आहे, त्याची सर्वांना फारच गरज आहे, देशाच्या अर्थशास्त्रात पशुसंवर्धनाला अनन्य साधारण महत्त्व आहे; ह्या पुस्तकातच वाचायच्या गोष्टी वाटत. एक प्रकारचे अराजक नांदत होते आणि आता २०–२२ वर्षांनंतर मुंबई शहरातून हे दृश्य नाहीसे झाले असले तरी उपनगरात फारशी वेगळी परिस्थिती नाही. पूर्वी सारख्या आता भाकडचा म्हशी कसायाकड जात नाहीत. त्याचे कारण पूर्वी नवीन म्हैस ८० रुपयांना मिळत असे. ती आता २५००–३००० रु.ना मिळते व पूर्वी कसाई भाकड म्हशींचे ५०–६० रु. देत असे ते आता ४००–५०० रुपयेच देतो. त्यामुळे पूर्वी एका म्हशीचा घसारा फक्त २०–४० रुपयेच असे तो हल्ली १५०० ते २००० रु. आहे. त्यामुळे भाकडी म्हैस कसायाला विकण्यापेक्षा पोसणेच धंद्याच्या दृष्टीने अत्यावश्यक होऊन बसले आहे. म्हणून सध्या बहुसंख्य म्हशी भाकडकाळात कसायांना न विकता पोसल्या जातात. एवढा फरक वर्ज्य केला तर त्यावेळचे अराजक आजही चालू आहे. ह्या दूधधंद्यातील घाणींचा, अत्यंत असमाधानकारक परिस्थितीचा एक फार मोठा फायदा झाला आहे. पूर्वीचे डेअरी डेव्हलपमेंट कमिशनर श्री. डी. एन. खुरोडी यांना व त्यानंतर त्यांच्या चेल्यांना ह्या मरणाऱ्या वासरांचे व तबेल्यांतील घाणीचे भरपूर फोटो आपल्या पुस्तिकात छापून घेऊन दूधधंद्यांतील या अराजकाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या योजना किती व्यवस्थित व स्वच्छ आहेत हे दाखविता आले आहे! त्यांनी छापलेली पत्रके अशा व कितीतरी फोटोंनी व मजकुरांनी सजविलेली दिसतात!

दूध आणि दुसरे महायुद्ध : सप्टेंबर १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि त्यावेळच्या सरकारचे दूधप्रश्नाकडे लक्ष वेधले. तेव्हापासून सरकारने प्रथमच दूधधंद्यासंबंधी विचार करायला सुरुवात केली. त्याचे असे झाले की सर्व वस्तूंच्या किंमती एकसारख्या वाढू लागल्या. पंजाब सरकारने त्यांच्या प्रांताबाहेर म्हशी नेण्यावर निर्बंध घातले. हल्ली जसे गुजरात सरकारने गुजरातबाहेर गवत नेण्यास बंदी घातली आहे. वहातुकींच्या अडचणीमुळे व लढाईमुळे अन्नधान्ये, म्हशींचा दाणा व वैरण दुर्मिळ होऊ लागली. त्यातच आणखी भर म्हणजे मुंबई शहराची लोकवस्ती एकसारखी वाढू लागली. मुंबईच्या परिसरांतील कारखानदारीची वाढही ह्याचवेळी झाली आणि ह्या सर्व

## अराजक चालू
## तबेल्यातील घाणीला भरपूर प्रसिद्धी


गोष्टींचा ताण नागरी जीवनाला जाणवू लागला. परिणामत: ह्या सर्व परिस्थितीत लक्ष घालणे जरूर आहे असे सरकारला वाटू लागले.

सरकारी प्रवेश : सरकारने काही तात्पुरत्या सवलती द्यायला सुरुवात केली. भाकडया म्हशी पोसण्यासाठी सरकारकडून काही मदत मिळू लागली. जे गवळी भाकडया म्हशी पोसण्यासाठी बाहेरगावी पाठवतात त्यांनाच नवीन म्हशी आणण्याचे परवाने सरकारमार्फत मिळू लागले. गवत आणि दाणा यांचे रेशनिंग करण्यात आले. होल दूध वापरावर निर्बंध घालण्यात आले. हॉटेलात ताजे किंवा होल दूध, चहा, कॉफी किंवा आईस्क्रीमसाठी वापरण्यावर बंधने घालण्यात आली. त्याकरिता फक्त आयात केलेली दुधाची भुकटीच वापरायला देण्यात आली. दूधउत्पादनाच्या दृष्टीने हे सर्व वरवरचे उपाय होते.

सबसिडाइज्ड दूध योजना : सन १९४४ मध्ये मुंबई महानगरपालिकेच्या सहाय्याने सरकारने ही दूध-वाटप योजना सुरू केली. गर्भवती स्त्रिया व १० वर्षांखालील मुलांना ह्या योजनेखाली अर्ध्या किंमतीने दूध पुरवण्याची योजना होती. अशा दुधाचा दर ६ आणे शेर होता. सुमारे ८०,००० शेर दूध रोज ह्या योजनेखाली वाटण्यात येत असे. सन १९४४ ते १९४७ ह्या तीन वर्षांच्या दरम्यान सरकारला सबसिडी म्हणून ४ कोटी रुपये द्यावे लागले. हे सर्व केले तरी दूधउत्पादन होते तसेच पोरके राहिले.

मिल्क कमिशनर : ह्या सर्व खटाटोपातून दूध-उत्पादनाला मुळीच चालना मिळाली नाही. सरकारी तिजोरीवर ह्या सबसिडीचा प्रतिवर्षी वाढता ताण पडू लागला व जाणवू लागला. हे असे फार दिवस चालविता येण्यासारखे नव्हते. म्हणून सरकारने दीर्घ मुदतीची मूलग्राही काहीतरी योजना आखावी असे ठरविले आणि केव्हातरी सन १९४५ च्या एप्रिल महिन्यात मिल्क कमिशनरच्या अधिपत्याखाली एक नवीन खाते उदयाला आले. श्री. एम्. डी. भट यांच्यासारखे कर्तबगार व अनुभवी सद्गृहस्थ पहिले मिल्क कमिशनर म्हणून काम पाहू लागले.

काँग्रेस सरकार : सन १९४६ मध्ये काँग्रेस सरकार अधिकारावर आले आणि हे खाते श्री. दिनकरराव देसाई यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. नागरी पुरवठाखातेही त्यांच्याकडेच होते. दूरगामी योजना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या योजना ह्या खात्यामार्फत आखल्या जाऊ लागल्या व अमलात आणल्या जाऊ लागल्या आणि प्रथमच दूधधंद्यासंबंधी अधिकृत असे सरकारी धोरण 'दी बॉम्बे मिल्क प्लॅन' म्हणून प्रसिद्ध झाले. मुंबई सरकार–नागरी पुरवठा खात्यामार्फत मिल्क कमिशनर यांनी ही पुस्तिका १ जून १९४७ साली प्रसिद्ध केली. हा मुंबई दूध नकाशा आहे तरी काय ? ●



# स्वच्छ दूध, स्वस्त दूध जास्त दूध

दूधधंद्यातील जो आलेख आपण पहात आहोत त्यात हा प्लॅन आहे तरी काय हे पहाणे उद्बोधक आहे.

ही एक लहानशी २८ पानांची पुस्तिका आहे. त्याचे चार भाग आहेत. १ : प्रास्ताविक, २ : मिल्क प्लॅन, ३ : त्याच्याशी निगडीत असलेल्या योजना व ४ : सारांश.

१९४० साली हिंदुस्थान व बर्मा येथील मिल्क मार्केटिंगवर हिंदुस्थान सरकारने जो अहवाल प्रसिद्ध केला आहे त्यातील उतारे प्रथम दिलेले आहेत. त्यात मुंबई नगरपालिकेने मुंबई शहराचा दूधपुरवठा सुधारण्याबाबत काय काय उपाय योजले त्याचा तपशील आहे. त्यात खाजगी कंपन्यांना

किंवा व्यक्तींना मुंबई शहराबाहेरून दूध आणण्यासाठी मुंबई महानगरपालिका काही सवलती व मदत देण्याच्या योजनांचा समावेश आहे. अशापैकीच एक योजना बॉम्बे को-ऑपरेटिव्ह मिल्क युनियनने सादर केली होती. कांदिवलीच्या उत्तरेला २०० एकर जमिनीत तबेले बांधून १८५ एकर जागा म्हशींना चरायला म्हणून ठेवायची होती. पाणी पुरवठयासाठी एक मोठा तलाव बांधायचा होता आणि दूध थंड करून मोटारलॉरीतून मुंबईला नेऊन तेथे पाश्चराइज करून ४॥ आणे शेर ह्या भावाने विकण्याची योजना होती. परंतु ही योजना अमलात येऊ शकली नाही. ह्या योजना का बारगळल्या ह्यासंबंधी असे म्हटले आहे की, ह्या योजना मुंबई शहराच्या संपूर्ण दूध पुरवठयाच्या दृष्टीने अपुऱ्या होत्या आणि फक्त काही थोडंसे दूध पुरविण्यात येणार असल्यामुळे तेव्हाचा भांडवलदार गवळयाच्या हाती जो दुधाचा धदा होता त्याच्याशी स्पर्धा करायला ह्या योजना असमर्थ होत्या.

उद्दिष्टे : ह्या प्लॅनची उद्दिष्टचे म्हणून जी मांडली आहेत ती अशी की, प्रथम जे फार कमी उत्पादन शहरात आहे ते वाढवायचे. त्याकरिता प्रचलित दूधधंद्यात जी अत्यंत भयावह व निराशाजनक परिस्थिती आहे ती सुधारण्याला मदत करायची आणि एवढ्यावरच न थांबता दूध स्वस्तही करायचे. म्हणजे जास्त दूध, स्वच्छ दूध व स्वस्त दूध ही त्रिसूत्री नजरेसमोर ठेवून प्लॅन राबवायचा असे योजनाकारांनी ठरविले. त्याचबरोबर ह्या प्लॅनमध्ये हेही स्पष्ट केलेले आहे की, सरकार दूधधंद्यात उतरू इच्छित नाही. दूधउत्पादकांना त्यांचा धंदा योग्य दिशेने करण्यास प्रोत्साहन देणे हाच उद्देश आहे. त्याकरिता दूधउत्पादन व दूधवाटप करता येईल.

कार्यवाही : ह्या उद्दिष्टांच्या कार्यवाहीत ४ गोष्टींचा समावेश आहे. १ : मुंबई शहरातून बाहेर जनावरे हलविणे. २ : बाहेरगावाहून दूध मुंबईत आणणे. ३ : दूधवाटपाची सघटीत व्यवस्था आणि ४ : दूधउत्पादन वाटप आणि किंमती ह्यांचे कायद्याने नियंत्रण.

आरे कॉलनीचा जन्म : ह्या चार सूत्रांच्या अमलबजावणीच्या दृष्टीने प्रथम आरे येथे मुंबईतील २५००० म्हशी हलविण्याची सोय करावी. त्याकरिता २५० म्हशींकरिता एक, अशी लहान लहान युनिटस् बांधायची. त्याकरिता २॥ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज होता. २५००० जनावरांकरिता अडीच कोटी रुपये खर्च येईल. अशा गोठयांचे नमुनेदार नकाशे तयार करून ज्या कोणा गवळयाला असे गोठे बांधायचे असतील त्यांना जागा देण्यात येईल. खर्च कमी ठेवण्याचा प्रयत्न होईल

सरकारने बांधलेले गोठे भाड्याने देण्यात येतील. दुधाचे वाटप एकेकटया गवळयाने करण्याऐवजी ते एक मध्यवर्ती डेअरीत एकत्र करून एखाद्या


नशीब आपलं, दुसरं काय?
परावलंबी जीवनासारखा दुसरा शाप नाही. पण त्यासाठी नशिबाला दोष देण्यात काय अर्थ आहे? मिळवत्या काळात सेवानिवृत्तीसाठी तरतूद केली तर सूनबाईची आणि काही वेळा स्वतःच्या मुलाची बोलणी सहन करण्याचे दुर्धर प्रसंग ओढवणार नाहीत. म्हातारपणी मानहानी टाळण्यासाठी तरुणपणीच नियमित बचत करा. सुखी व निश्चित वृद्धापकाळाची आणि आपल्या पश्चात कुटुंबाला आर्थिक संरक्षणाची खात्रीपूर्वक तरतूद करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे आयुर्विमा!
आयुर्विम्याला पर्याय नाही!
विम्याच्या अनेक योजना आहेत. लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचा एजंट आपल्याला योग्य अशी विमा योजना सुचवील. आजच त्याला भेटा.
PRATIBHA 1510-19-MAR

अधिकृत संघटनेमार्फत विकण्यात येईल. ह्या सर्व कामी दूध सहकारी संस्थांना अग्रक्रम व अग्रहक्क देण्यात येतील.

**बाहेर गावाहून दूध पुरवठा :** मुंबई शहराला दूध पुरवठा करण्यासाठी प्रथम आनंदहून ता. १५-११-१९४५ पासून सुरुवात करण्यात आली. तसेच जिल्ह्याच्या इतर भागातूनही दूध आणण्याची व्यवस्था करण्याचे योजले आहे आणि बाहेरगावाहून होणारा हा दूध पुरवठा स्वस्त असल्यामुळे व पुरेसा वाढल्यावर मुंबई शहरातील गवळी अपसुकच धंदे न परवडल्यामुळे म्हशी घेऊन बाहेर जातील ही स्वाभाविक प्रक्रिया प्लॅनला अभिप्रेत आहे. (पहा पॅरा २३ पान ११)

**संघटित वाटप:** दूध उत्पादकांनी फक्त दूध उत्पादन करावे आणि दूध-वाढ कशी होईल व दूध स्वस्त कसे होईल ते पहावे आणि दुधाचे वाटप दुसऱ्या कोणत्या तरी संस्थेने करावे ह्या करिता एका विभागात वाटप करणारा अधिकृत परवाना असावा आणि त्याचेमार्फतच दूधवाटप करावे ही सर्व योजना पुढे मिल्क बोर्ड स्थापून त्यांचेमार्फत राबवावी (पॅरा ८४ पान २४)

**कायदेशीर नियंत्रण:** ह्या सर्व गोष्टींचे कायदेशीर नियंत्रण करण्यासाठी जरूर ते कायदे मंजूर करून घ्यायचे आहेत. हे सर्व काम करण्यासाठी मिल्क कमिशनर यांना सर्वाधिकार रहातील आणि त्यांना मदत करण्यासाठी दूध कार्यवाही समिती नेमण्यात येईल. ही व्यवस्था कायद्यानेच करण्यात येईल आणि नंतर पुढे योग्य वेळी मिल्क मार्केटिंग बोर्ड निर्माण करून त्याकडे हे सर्व काम सुपूर्द करण्यात येईल.

असे बोर्ड निर्माण करण्याबद्दल १९४७ पासून बऱ्याच वेळा मागणी झाली आहे. परंतु योग्य वेळेची वाट सर्वजणच पहात आहेत ! अजूनही वाट पहातच आहेत !!

ह्या प्लॅनमध्ये मिल्क प्लॅनशी संबंधीत असलेल्या योजनांची माहिती दिली आहे. त्यात सरकारी मॉडेल चार्मचा समावेश आहे. आरे येथे सरकारी मालकीचे २५० दुभत्या म्हशींचे व २५२ दुभत्या गाईंचे एक उत्पादन केंद्र चालविण्यात येईल. ह्या केंद्राचा उपयोग दूध धंद्यासंबंधी व उत्पादन किंमत काय येते हे नक्की करण्यासाठी महत्त्वाची माहिती उपलब्ध होईल. एकूण २२-२३ योजनांची यादी त्यांत दिली आहे. त्यापैकी दूध उत्पादनाची किंमत नक्की करणे, दाणा व वैरण उपलब्ध करून देणे, गवत निर्मितीची सुधारणा, हिरवी वैरण उत्पादन, शेणखताचा उपयोग, दूध उत्पादन व वाटप सुरू करणारांना मदत, पशु वैद्यकीय मदत योजना, वासरे पोसणी योजना, भाकडच्या म्हशी पोसणी योजना, सहकारी दूध उत्पादन, वगैरे प्रामुख्याने समाविष्ट आहेत.

प्लॅनमध्ये ४६५ लाख रुपयांचा अंदाज आहे. त्यातील काही खर्च मदत म्हणून व काही भांडवल गुंतवणूक राहील असा अंदाज आहे. आणि तबेल्यांना ३½ टक्के दराने भाडे आकारण्यात येईल व काही रक्कम अधिकृत

दूध वाटपदारांकडून वसूल करण्यात येईल. आणि शेवटी अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे की ह्या गुंतागुंतीचा प्रश्न सोडविण्यास अर्थातच विलंब लागेल. परंतु सर्वांच्या सहकार्याने 'दूध' ह्यासारख्या जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाची कायमची सोडवणूक करण्याचा प्लॅन यशस्वी होईल.

दुधाच्या प्रश्नासंबंधी हा प्लॅन हे सरकारचे अधिकृत धोरण आहे. त्यात काही गोष्टी स्पष्ट आहेत. जास्त दूध स्वच्छ दूध, स्वस्त दूध ह्या त्रिसूत्रीवर दूध योजनेचे यशापयश मापण्याचा दंडक घातलेला आहे. आरे कॉलनी ही स्वच्छ दूध उत्पादन करण्याची सोय म्हणून व धंद्यातील अनिष्ट गोष्टींना संघटीतरीत्या तोंड देता यावे म्हणून निर्माण करण्यात आली असल्याचे सांगितले आहे. आरे कॉलनीतील गवळ्यांकडून दूध खरेदी करण्याची जी आज सक्ती आहे ते प्लॅनमध्ये कोठेही दिसत नाही. शिवाय मुंबई शहरातील दूध उत्पादकांना मदत करून दूध उत्पादन व वाटप यांचे विभाजन करून जे अराजक होते त्यात व्यवस्था निर्माण करण्याचा मानस व्यक्त केला आहे. हा प्लॅन तयार करीत असताना मांडलेला धोरणात्मक विचार बराचसा योग्य दिशेने आहे; परंतु अंमलबजावणी करीत असताना, त्या प्लॅनच्या धोरणातच जे मूलगामी बदल केले तेच बव्हंशी आजच्या दूध योजनेच्या अपयशाला कारणीभूत आहेत हे लक्षात येईल. ह्या सबंध प्लॅनमध्ये सरकार दूध व्यापारात उतरणार नाही हे स्वच्छ केलेले आहे. सरकारची भूमिका मदतनिसाची असून गिऱ्हाईक व उत्पादक यातील सहाय्यक दुवा म्हणून रहाण्याची आहे.

सरकारने दूधधंदा करण्याला कोणाचीच हरकत नाही किंवा विरोध


ब. मो. पुरंदरे यांचा नवा कथा संग्रह

**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

किंमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

नाही. किंवा प्लॅनमध्ये मांडलेल्या तत्त्व-प्रणालीच्या प्रमाणेच सरकारने वागले पाहिजे असाही आग्रह नाही. परंतु पूर्वी जे ठरविले होते ते काय होते, त्यात बदल केले ते का केले यासंबंधीचे संपूर्ण चित्र जनतेसमोर येणे आवश्यक आहे. आजतागायत प्लॅनमध्ये जे मूलगामी बदल केले आहेत ते लोकांसमोर आलेच नाहीत. आताचे योजनेचे स्वरूप पार पालटले आहे पूर्वी मुंबई शहराला दूध-पुरवठा कसा करायचा व वाढवायचा इतकीच प्लॅनची व्याप्ती होती, भर होता. आता हे करीत असताना ग्रामीण विभागातील शेतकऱ्यांना पूरक धंदा कसा मिळेल हाही विचार अंतर्भूत आहे. आणि तो रास्त आहे. त्याबद्दल आमचा मुळीच विरोध नाही. नव्हे तो तसाच असायला हवा असा आमचा आग्रह आहे. परंतु अमलबजावणीत सर्व दूध-वाटप सरकारमार्फतच करण्याचा जो बदल केला आहे त्यामुळे बरीच अनिष्ट परंपरा ओढवली आहे. मुंबईचे खाजगी दूध उत्पादन वाऱ्यावर सोडून देण्यात आले आहे. जणू काही तो मुलूख स्वतंत्र-पणे खाजगी दूध उत्पादकांना तोडून देण्यात आला आहे. आणि त्यातूनच पूर्वीचेच अराजक तेथे चालू आहे. आणि आरे कॉलनीतील सर्व दूध योजनांनी खरेदी करण्याचा हव्यास धरण्यापायीच उत्पादनाच्या खर्चाच्या प्रमाणात दुधाचा भाव देण्याची जबाबदारी सरकारी शिरावर पडली आहे. दूध उत्पादनाला आवश्यक असणाऱ्या सर्व वस्तूंच्या किंमतीवर योजनाकारांचे किंवा सरकारचे कोणतेच परिणामकारक नियंत्रण नसल्यामुळे इतर वस्तूंच्या वाढत्या किंमतीबरहुकूम दुधाच्या किंमती अनिवार्यपणे फरफटत राहणार हे ओघानेच येते. दुधाच्या एकूण किंमती ह्या एकूण वस्तूंच्या व सेवेच्या किंमतीशी निगडीत आहेत. आणि शिवाय सर्व दूधवाटप योजना सरकारी पातळी-वरच हाताळण्याच्या धोरणामुळे सरकारचा असा जो बराचसा अनावश्यक उत्पादक खर्चाचा बोजा ह्या यंत्रणेवर पडतो त्यामुळे दूधउत्पादकाला योग्य भाव देता येत नाहीत आणि गिऱ्हाईकाची दुधाची किंमत स्वस्त करता येत नाही. गुजरातमध्ये जो दुधाचा धंदा बरकतीत आला असून त्यांच्या योजना यशाची घोडदौड करीत आहेत त्याचे प्रमुख कारण सरकारने दूध उत्पादनाची किंवा वाटपाची कोणतीच जबाबदारी घेतलेली नसून सर्व व्यवहार सहकारी संस्थावर सोपविला आहे. अडचणी निवारण्याचे काम सरकारने घेतले आहे. आणि नेमके उलट महाराष्ट्र सरकारी योजनांचे होत आहे. सर्व दूध-धंद्याचे राष्ट्रीयकरण जर सरकारने केले असते तर सरकारशी संबंध येणाऱ्या दूध उत्पादकांची जी ससेहोलपट होत आहे ती टळण्याची शक्यता होती; पण आज जो अर्धवट प्रकार आहे, उत्पादन उत्पादकांचे व वाटप सरकारकडे, त्यामुळे दूध योजना फसत आहेत. सरकारने ज्या विविध योजना सुरू केल्या आहेत त्या आपल्या खर्चाच्याच ओझ्या-खाली कशा तोटयात जात आहेत ते पुढे पाहू. ●



# चौकशी ! चौकशी !!
# तोटा ! तोटा !!

मुंबई शहराच्या दूध पुरवठ्याकरिता अधिकृत असा बॉम्बे मिल्क प्लॅन तयार झाला. त्यात दुधासंबंधी धोरण जाहीर करण्यात आले. त्याच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. त्याकरिता ग्रेटर बॉम्बे मिल्क स्कीम किंवा जी. बी. एम. एस्. या नावाने ओळखली जाणारी सरकारी व्यवस्था निर्माण करण्यात आली. ह्या स्कीमखाली ज्या विविध प्रवृत्ती सुरू करण्यात आल्या त्याचे प्रामुख्याने चर्चेच्या सोयीसाठी खालीलप्रमाणे भाग पडतात.

१ : आरे कॉलनी, दापचरी दूध योजना व त्या अनुषंगाने सरकारमार्फत चालविल्या जाणाऱ्या योजना.

२ : शहराकरिता बाहेरगावचा दूध पुरवठा योजना—त्यात आनंद व महाराष्ट्रातील ग्रामीण दूध योजना.

३ : दूधवाटप योजना त्याकरिता आरे येथील डेअरी व वरळी डेअरी.

आता ह्या भागाचा स्वतंत्र विचार करू. प्रथम बराच बोलबाला झालेली, जाहीरात झालेली आरे कॉलनी, त्यासंबंधी विचार करू. ही आरे कॉलनी आहे तरी काय? सन १९४७–४८ मध्ये गोरेगाव स्टेशनजवळ पूर्वेला 'आरे' ह्या गावी ३३४५ एकर जमीन संपादन करून व सुमारे २ कोट २६ लाख रुपये खर्च करून आरे वसाहत बांधण्यात आली आहे. तेथे ३० युनिटस्. किंवा गोठे बांधलेले आहेत आणि त्याकरिता ह्या ३३४५ एकरापैकी फक्त २५० एकर जागा लागली आहे. हे गोठे गवळ्यांना भाड्याने देण्यात आले आहेत.

जे ३० गोठे बांधण्यात आले आहेत त्यापैकी २९ गोठ्यात साधारणपणे ५५० ते ६०० प्रमाणे २१९ गवळ्यांच्या सुमारे १६००० म्हशी भाड्याने आहेत. ह्या गवळ्यांना सरकारजवळ एक करार करून द्यावा लागला आहे. प्रथम जेव्हा हे गवळी आले तेव्हा १७ कलमांचा एक करार होता. त्यात दुधाची किंमत नक्की करीत असताना दूध उत्पादनाला आवश्यक त्या सर्व खर्चाचा विचार करून त्यावर १० टक्के नफा देण्याची सरकारने हमी दिलेली होती. पण पुढे सन १९५६ च्या सुमारास तो करार बदलून ५२ शर्तींचा एक करार ह्या गवळ्यांना करावा लागला आहे. ह्या शर्ती एकतर्फी आहेत जशा बहुतेक सर्व सरकारी करारांच्या असतात. गोठ्यात म्हशी बांधण्याबद्दल भाडे, वीज व पाणी यांची वेगवेगळी आकारणी करण्यात येते. भाड्याबद्दल प्रत्येक म्हशीला दरमहा रु. १३·५० व पाणी वीजेबद्दल सुमारे ३.५ रु. आकारण्यात येत असत. आता ता. १।७।१९७१ पासून रु. १३ ५० ऐवजी २० रु. आकारणी करण्यात येते.

ह्या कराराच्या शर्तीप्रमाणे गवळ्याने ठराविक प्रमाणात म्हशींची संख्या ठेवली पाहिजे. त्यापैकी दुभत्या म्हशींचे प्रमाण ठराविक हवे, त्यांचे दूध उत्पादन प्रत्येक म्हशीमागे ठराविक किंवा सरकार ठरावील तेवढे हवे, अशा काही शर्ती आहेत.

एका शर्तीप्रमाणे सरकार ठरवील त्या भावाने सर्व दूध गवळ्यांनी सरकारलाच विकले पाहिजे अशी सक्ती आहे. याचाच अर्थ भाडे वसूल करणाऱ्या घरमालकाची व दुधाचा व्यापार करणाऱ्या दलालाची अशी दुहेरी भूमिका सरकार बजावीत आहे.

ही सर्व वसाहत बांधताना मोठी कल्पकता वापरण्यात आली आहे. निसर्गरम्य खेड्यांच्या परिसरात ही वसाहत वसलेली आहे. तेथे मुद्दाम खर्च करून हिरवीगार ठेवलेली वृक्षराजी, त्यातून ओढणी घेतल्यासारख्या डोकावणाऱ्या त्या अद्ययावत इमारती, सप्त रंगाची बरसात करणाऱ्या नेटक्या बागा, आंबे, काजू, नारळी यांनी नटव-

लले डोंगर उतार, त्यातून नागिणी-सारखा सरपटत जाणारा काँक्रीटचा रस्ता, त्यावरील रेखीव तारांचे कुंपण, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खडीतालीम देणारी रंगीबेरंगी फुलांच्या झाडांची पलटण, तेथील नयनरम्य जलाशय, त्याच्या आसऱ्याने असलेले हिरवेगार गवताचे पट्टे वगैरे गोष्टींचा कोणाच्याही मनावर चटकन परिणाम होतो आणि त्याच्या मनात सहजपणे विचार येतो की, 'येथे रहाणाऱ्या म्हशींच्या व माणसांच्या वाटयाला स्वर्ग सुख तर आलेले नाही ना? कोणा महाभागाच्या कृपेने पृथ्वीतलावर हा एक स्वर्गच अवतीर्ण झाला आहे!' स्वाभाविकपणेच मुंबईच्या गर्दीने विट-लेला माणूस त्याच्या आंबलेल्या व घामट-लेल्या जिण्याची तुलना करू लागतो. एक प्रकारचा ह्या परिसराचा त्याला हेवा वाटला नाही तरच नवल. परंतु आरे कॉलनीत धंदा करणाऱ्या माणसाचा ह्या परिसराशी काही संबंध नाही. हा सर्व मुद्दाम देखावा निर्माण करण्या-करिता एक वेगळे खाते आहे आणि त्याचे जमाखर्च ह्या आरे कॉलनीच्या जमाखर्चातच लपलेले आहेत.

पण ह्या सर्व निसर्गरम्य परिसराचा दूध उत्पादनाशी संबंध काय? काहीही नाही. ही कॉलनी ज्यावेळी निर्माण झाली त्यावेळी आम्ही बरीच टीका केली होती. येथे एक उताराच देतो—

'आरे गवळी वाड्यात गोंधळ' ह्या मथळ्याखाली आम्ही त्यावेळी एक लेख ता. १२-४-१९५३ च्या केसरीत दिला होता. त्यात आम्ही लिहिले होते—

'आम्ही वेळोवेळी दूध योजना सुधारावी म्हणून टीका केली आहे. ह्या दूध योजनेबद्दल आमचे निश्चित स्वरूपाचे आक्षेप आहेत. दूध योजना बंद करून टाका, ती संपूर्ण टाकाऊ आहे, असे आम्ही कधीही म्हटलेले नाही. मुंबई सरकारचा म्हणजेच जनतेचा बराचसा पैसा एका चांगल्या योजनेवर खर्च होत आहे. त्याचा जास्तीत जास्त फायदा जनतेला मिळावा ह्या हेतूने आम्ही टीका करीत आलो आहोत. ह्या योजनेने जे उद्देश पुढे ठेवले आहेत त्यांच्या पूर्तीच्या दिशेने काम होत नाही. दूधयोजनेने दूध स्वस्त केले पाहिजे. दुधाचे उत्पादन वाढले पाहिजे. शुद्ध व स्वस्त दूध मिळाले पाहिजे. भाकड म्हशींची व्यवस्था व्हायला हवी. उत्पादनाचा खर्च शास्त्रशुद्धपद्धतीने नक्की करून ज्या बाबींमध्ये सुधारणा करता येण्या-सारखी आहे ती व्हायला हवी. भाकड म्हशी पुन्हा विकून त्यांचे उत्पादन वाढवायचे म्हणजे त्यांना पुरेशा प्रमाणात हिरवा चारा वगैरेची तरतूद करायला हवी. पद्धतशीर आकडेवारी जमवून अवलाद सुधारून हल्लीची दूध देण्याची जनावरांची शक्ती वाढवायला हवी. ह्यापैकी आरे दूधवाडीत काहीही होत नाही. गेल्या पाच वर्षांत ह्यापैकी काहीही झाले नाही. त्या दिशेने अजून पावले पडत नाहीत. हे सर्व होत नाही म्हणून दूध उत्पादन वाढत नाही व दूध स्वस्तही होत नाही. म्हणजे ज्या उद्देशाने ही योजना आखली आहे तो पुरा होत नाही—अशी आमची टीका

आहे. परंतु आमच्या टीकेला सरकार-कडून उत्तर मिळत नाही. कारण आमच्या टीकेला द्यायला त्यांचेजवळ उत्तरच नाही.'

पण सत्तेपुढे शहाणपण चालत नाही. सरकार आपल्या मार्गानेच जात आहे. परिणाम जो व्हायचा तो आज दिसत आहे. आज आरे कॉलनीतील गवळी आर्थिक कडेलोटाच्या मार्गावर आहेत. त्यांना तेथे दूधधंदा करणे परवडत नाही. ह्यासंबंधी आम्ही काही दिवसा-पूर्वी चळवळ केली होती; परंतु सरकार-वर त्याचा परिणाम होत नाही. तेथील धंद्याची परिस्थिती जनतेसमोर यावी म्हणून 'आमची कैफियत' म्हणून एक सविस्तर पुस्तिका सादर केली होती. विस्तार भयास्तव येथे पुन्हा तेच मुद्दे मांडीत नाही. परंतु आरे कॉलनीच्या बाबतीत आम्हाला समजू शकत नाहीत असे काही मुद्दे आहेत ते मांडतो.

सरकारला गोठे बांधून २० वर्षे झाल्यावर भाडे वाढविण्याची गरज का भासावी हे आम्हाला समजत नाही. आरे वसाहतीत १६००० म्हशी आहेत. भाड्याचे १३·५० अधिक पाणी व वीज यांचे दरमहा दर म्हशीस ३·५० प्रमाणे १७ रु. प्रत्येक म्हशीमागे मिळतात. म्हणजे दरमहा उत्पन्न २,७२,००० सरळ सरळ येते. वर्षाला ही रक्कम ३२,६४,००० रु. होते. आता यावर खर्च किती यावा ते पाहू. ३० गोठ्यावर सुमारे २ कोटी रुपये खर्च झाला आहे. भाडेनियंत्रण कायद्याप्रमाणे ८$\frac{3}{4}$ भाडे धरता येते. ते भाडे २ कोटी रुपयांचे वर्षाचे २१,००,००० रुपये होते. पण सरकार आपले आहे. तेव्हा त्यांना थोडे झुकते माप देण्याच्या दृष्टीने ४% व्याज, २% दुरुस्ती व ६% घसारा अशी रक्कम धरली तरी वर्षाला २४ लाख रुपये होतात. शिवाय दर वर्षाला जे घसाऱ्याचे ६% खर्चात धरले आहेत ते बाजूला काढले की दरवर्षी व्याजाची रक्कम कमी होऊन १६ वर्षांत सर्वच्या सर्व २ कोटी रुपये वसूल होतात आणि दरवर्षी उत्पन्न ३२,६४,००० व खर्च २४,००,००० ह्यातून ८ लक्ष, ६४ हजार रुपये शिल्लक रहातात. खरे म्हणजे १९४९–५० ते १९७२ पर्यंत २० वर्षात भांडवली गुंतवणूक तर वसूल होऊन जवळजवळ तेवढीच रक्कम किंवा १,७२,००,००० रु. नफ्याचे वसूल होतात. ह्या सर्व भाडेवसुलीबाबत एक खुबी अशी आहे की, वसुलीकरिता १ पैशाचाही खर्च येण्याचे कारण नाही. परस्पर दुधाच्या बिलातून पैसे घर-बसल्या वसूल होऊन मिळतात. तेव्हा अशी सर्व परिस्थिती असताना सन १९७१ पासून भाडेवाढ करण्याची गरज का भासावी हे मला न उलगड-णारे कोडे आहे; पण तसे त्याचे उत्तरही सोपेच असणार! हे जे खर्चाचे आकडे मी गृहीत धरले आहेत. त्यापेक्षा खर्च वाढलेले दाखवलेले असणार. खरे म्हणजे वाढण्याची जरुरी नाही; परंतु आरे कॉलनीत बगीचे आहेत, नारळीची बने आहेत, काजूची लागवड आहे, मध्येच केव्हातरी टायपुंग किंवा गज-राजची लागवड सुरू झालेली दिसते.

शिवाय २०–२५ आरामगृहे आहेत. हे सव अनुत्पादक चाळे आहेत आणि आम्हाला अशी शंका आहे की त्याचा खर्च ह्या खर्चात टाकण्यात येत असावा. शिवाय गेल्या काही वर्षांत थोडसे उत्पन्नही घटले असेल. कारण परवडत नाही म्हणून तबेले खाली करण्याची साथ तेथे सुरू झाली आहे. काही मंडळी म्हशी तेथच साडून पळून गेली आहेत. काही म्हशींचे सरकारनेच लिलाव केले आहेत. त्या जागा सध्या रिकाम्याच आहत. आमच्या माहितीप्रमाणे सुमारे २००० म्हशींच्या जागा गेल्या दान वर्षांत रिकाम्या आहत आणि आणखीही रिकाम्या हाण्याच्या मार्गावर आहेत. पण ह सर्व जमेस धरले तरी आरे कॉलनीचे भाडे वाढविण्याची गरज पडत नाही. काहीतरी भरमसाठ खर्च असला पाहिजेत त्याचा भुर्दंड भाववाढीने जनतेला करावा लागत आहे आणि चौकशी झाल्याशिवाय सत्य काय आहे ते समजणार नाही.

तशाच एक आम्हाला न समजणारी बाब आहे, ती म्हणजे आरे कॉलनीतील पॅरा गवताची लागवड. आरे कॉलनीत सुमारे ५०० एकर जमीन ह्या लागवडीखाली आहे. तीन हजार एकरांपैकी २५० एकर जमीन गोठ्यासाठी गेली तरी फक्त ५०० एकर व तीही महत्प्रयासाने. अकटश्च विकटो खर्च करून पॅरा गवताच्या लागवडीखाली घेतली आहे. १५० अश्वशक्तीचे ३–४ बुलडोझर्स कितीतरी वर्षे आरे कॉलनीच्या जंगलात ही जमीन मिळविण्यासाठी गडगडाट करीत होते. पण ते जाऊ द्या! तर काय सांगत होतो की पॅरा गवताची किंमतही १–७–७१ पासून पॅराग्रासमध्ये तोटा येऊ लागल्यामुळे म्हणे वाढवावी लागली आहे. पूर्वी पॅराग्रासची १००० किलोची किंमत रु. २७·२० होती ती आता ४० रु. करण्यात आली आहे. पॅराग्रास लागवड होऊन गेली की त्यावर फारसा खर्च नसतो. आमचा तरी तसा अनुभव आहे. तबेल्यातील म्हशी धुतलेले पाणी अपसुकच पॅराला जाते. एखादा माणूस असला की तो पाणी लावतो. तेव्हा पाणी उपसणे, त्याकरिता पंप, इंजिने वगैरे खर्च नाही. शेणामुताचे पाणी त्या गवताला फार मानवते आणि एकरी १५० टनांपर्यंत उत्पन्न सहज येते. खर्च काय असतो तो फक्त गवत कापणारांचा. तो अगदी १ टनाला १० रुपये धरला तरी २० रुपयांपेक्षा खर्च वाढण्याचे कारण नाही. पॅरा ग्रासच्या खर्चात वाढ होण्यासारखे खर्चच नाहीत, तरीही भाव वाढवावा लागतो. कारण काय तर म्हणे त्या व्यवहारात तोटा येतो. एका टनाला रु. २७·२० प्रमाणे भाव पडल्यास ७·२० रु. नफा व्हायला हरकत नाही; पण ह्या कारभारात काहीतरी विक्षिप्तच दिसते. जर सरकारच असे आपल्या उत्पादनाचे भाव वाढवू लागले तर दूध स्वस्त कसे होणार?

ह्या ५०० एकरांपैकी सुमारे १०० एकर जमीन ही परवानेधारकांना परस्पर भाड्याने दिलेली आहे. म्हणजे ह्या १०० एकरांतून जो काही मिळायचा

तो निव्वळ नफ़ाच. असे असूनही ह्या प्रकरणी तोटा का यावा ? मला वाटते, येथेही असेच अवास्तव खर्च असावेत. याची प्रचिती तुम्ही जर सहज आरे कॉलनीत चक्कर टाकलीत तर एखाद्या ओढयाच्या काठाला ट्रॅक्टरने पाणी उपसण्याचा उपद्‌व्याप चाललेला तुमच्या नजरेस पडेल. पॅराग्रासला कायम पाणी द्यायचे असते ते ट्रॅक्टरने देणे ही समजण्यासारखी गोष्ट आहे. जेथे एखादी ५ हॉर्सपॉवरची मोटार तासाला चार-सहा आण्यात काम करील तेथे कमीत कमी १४ हॉर्सपॉवरचा हाय-स्पिड डिझेलचा तासाला ३–४ रुपयांचा खर्च फक्त आरे कॉलनीचा बेबंद कारभारच करू जाणे. येथेही असाच अनागोंदी खर्च चालू आहे. त्याची चौकशी केल्याशिवाय सत्य बाहेर येणार नाही. नाहीतर सर्वच जमीन परवानेदारांना देऊन हा आतबट्ट्याचा व्यापार व व्याप ताबडतोब बंद का करीत नाहीत हेही असेच न सुटणारे कोडे आहे. ह्या वाढीव खर्चाचा भुर्दंड जनतेच्या माथी का यावा ? ही उधळपट्टी चौकशी केल्याशिवाय कशी थांबेल ?

तसेच पालघर येथे भाकडया म्हशी पोसण्याचे केंद्र आहे आणि त्याचबरोबर सन १९६५–६६ पासून सरकारी मालकीच्या गाई व म्हशी ठेवून दूध-उत्पादन करण्यास सुरुवात झाली आहे. भाकडया म्हशी पोसण्याचा खर्च एका म्हशीला १–७–७१ पर्यंत दररोज २·५० रु. प्रमाणे आकारण्यात येत असे तो आज ४ रु. वर नेण्यात आला आहे. सरकारीफार्मवर तेथील सरकारी जमिनीतीलच गवत कापून जनावरांना घालतात. अधिक सुधारलेल्या पद्धतीने व खताचा वापर करून वर्षानुवर्षाच्या अनुभवाने गवताचे उत्पादन वाढत रहाते. तेव्हा ह्या वाढीव उत्पन्नातून जो काही थोडासा महागाईमुळें नोकरांचा वाढलेला पगार असेल तो सहज भरून येण्यासारखा आहे. असे असूनही तोटा येऊ लागल्यामुळे जनावरांच्या रोजच्या आकारणीत वाढ करावी लागली आहे आणि ती वाढही थोडी थोडकी नाही तर २॥ रुपयावरून ४ रुपयावर म्हणजे ६०% वाढ केलेली आहे. ह्या भाववाढीचा बोजा जनतेवर लादण्यात येत आहे. ह्या प्रकरणाची चौकशी झालीच पाहिजे.

सन १९६५–६६ पासून पालघरला दूध उत्पादनाचा प्रयोग करण्यात आला आहे. त्यावेळी हा प्रयोग खास करून दूध उत्पादनाची किंमत नक्की काय आहे हे समजावे म्हणून पोषण केंद्र काढण्यात आल्याची आम्हाला माहिती आहे.

दूध उत्पादनाची किंमत नक्की करण्याच्या कामाबरोबरच गाईवर संकर पैदाशीचा प्रयोगही सुरू आहे. दुभत्या गाई व म्हशी १९६५ पासून ठेवूनही अद्यापी दूध उत्पादनाची किंमत काही निघाली नाही. आणि ती पुढे कधी निघेल किंवा नाही ह्याबद्दलही आम्हाला शंका आहे. आमच्या माहिती-प्रमाणे दुग्धशाळा आयुक्त आता वेगळाच पवित्रा घेत आहेत. ही दुभती गुरे

मुख्यतः अभ्यासासाठी व संकर पैदाशी-साठीच ठेवण्यात आली आहेत असा त्यांचा दावा आहे. व्यापारी पद्धतीने त्यांचेपासून मिळणाऱ्या दुधाचा हिशेब तुलनेसाठी ठेवण्याच्या आवस्थेप्रत ही गुरे नाहीत असे ते आता सांगत आहेत, पण हे बिलकुल बरोबर नाही. दूध-उत्पादनाची किंमत नक्की करण्यासाठी म्हणूनच पालघरला दुभती गुरे ठेवलेली आहेत अशी आमची निश्चित माहिती-आहे. आता पालघर येथील दूध उत्पा-दनाची किंमत ३ रुपयांच्या आसपास येते असेही आम्हाला समजले आहे. ह्या दूध उत्पादन किंमतीची वाच्यता होऊन ती जर जाहीर झाली तर खात्यांच्या बेअब्रूला पारावार रहाणार नाही म्हणून खाते आता खोटे सांगत आहे. हे आम्ही काही उगीचच सांगत नाही. दूध उत्पादनात एका म्हशीचे किंवा गाईचे रोजचे सरासरी दूध उत्पादन ५॥–६ लिटरच्या पेक्षा कमी होऊ लागले की म्हशीवर होणारा खर्च परवडेनासा होतो. धंदा तोटयात जाऊ लागतो किंवा दूध उत्पादनाची किंमत वाढते. आमच्या माहितीप्रमाणे मागील तीन वर्षांचे रोजचे सरासरी दूध उत्पा-दन खालीलप्रमाणे आहे.

| सन | गाई : लिटर | म्हशी : लिटर |
|---|---|---|
| १९६९–७० | ३·१० | ५·०० |
| ७०–७१ | ३·२० | ५·६० |
| ७१–७२ | ३·२० | ४·३० |

आता सांगा की उत्पादन खर्च ३ रु. का येणार नाही ?

पालघरला गाईचे तीन लिटरचे आस-पास दूध उत्पादन व म्हशीचे ५ लिटरच्या आसपास दूधउत्पादन असता आरे कॉलनीत दर म्हशीमागे ६–२ लिटरपेक्षा दूध उत्पादन कमी झाले म्हणून १०० गवळ्यांना ह्याच अधि-काऱ्यांनी नोटिसा देऊन त्यांचे लायसेन्स रद्द केले होते त्यामुळे आरे कॉलनीतील गवळी दूध धंद्यातून उठून जाणार होते. त्याकरिता कोर्ट दरबार केले तेव्हा आम्ही ही अधिकाऱ्यांची दांडगाई थोपवू शकलो. सरकारी दूध योजना चाल-विणारांच्या प्रवृत्तीवर प्रकाश म्हणून ओघाने आले म्हणून हा उल्लेख केला. हा काही आमचा मुख्य विषय नाही. मुख्य विषय आहे की ह्या दूध उत्पादन केंद्रात आलेली खोट भरण्यासाठी पाल-घर केंद्रावरील दर दिवशीचा पोसणीचा रोजचा खर्च अडीच रुपयावरून ४ रुपयेपर्यंत बिनदिक्कतपणे वाढविण्यात आला आहे. आणि त्याचा भुर्दंड भाव-वाढीच्या रूपाने जनतेवर बसत आहे.

हा सर्व जो गोंधळ आहे त्याची समग्र माहिती जनतेसमोर येणे आवश्यक आहे. आणि ती यायची तर चौकशी करायलाच हवी.

अशीच कथा आरे कॉलनीत युनिट नं. २६ मध्ये प्रायोगिक गोशाळा सण १९६२ पासून सुरू केली आहे तिची आहे. आमच्या माहितीप्रमाणे ह्या योजनेत खालीलप्रमाणे तोटा आहे.

| सन | रु. तोटा |
|---|---|
| १९६८–६९ | ४,०४, ९२४·५३ |
| ६९–७० | १,५८, ३३३·८७ |
| ७०–७१ | ५,३३, २९०·०२ |

ह्या सर्व अनुभवातून काही नवीन दृष्टी प्राप्त झाली असती, काही शहाणपणाचे निष्कर्ष काढले असते तर हा तोटा एकवेळ सहन झाला असता; परंतु त्याचा बोजा आज गिऱ्हाईकांवर पडत आहे. ह्या सर्व प्रकरणाची चौकशी केल्याशिवाय नुकसानी कोठे होत आहे हे कसे कळणार ? आणि तरीही आपले शेतीमंत्री सांगत आहेत की ह्या खात्याच्या कारभाराच्या चौकशीची गरजच नाही.

ही सर्व हकीगत झाली ज्या जुन्या पुराण्या योजना आहेत त्यांची. आता जो दापचरी दूध प्रकल्प होऊ घातला आहे त्यासंबंधीची अशीच चमत्कारिक आणि सुरस हकीगत आहे. तर मग ती ऐकाच. ●

# आरे कॉलनीची धाकटी बहीण दापचरी....




# दापचरी
# साडेसहा कोटी बुडित !

दापचरी किंवा बंकास दूध प्रकल्प किंवा योजना ही आरे कॉलनीची धाकटी बहीण म्हणता येईल. तिच्या गुणावगुणावर लिहिण्यापूर्वी तिचे वर्णनच करतो. हचा वर्णनाबाबत आमची अडचण अशी आहे की इकडून तिकडून तिची जी माहिती मिळाली त्यावरच अवलंबून रहावे लागते आहे. उद्या कदाचित् दुग्ध शाळा आयुक्त म्हणतीलही की 'ती ही नव्हेच.' परंतु आमचा इलाज नाही. काही दिवसापूर्वी आम्ही मुद्दाम पत्र पाठवून ही योजना एकदा प्रत्यक्ष पहावी म्हणून संबंधीत मन्त्र्यांना लिहिले होते. परंतु त्यांना काय वाटले कोणाला ठाऊक! कार्य-

बाहुल्यामुळे त्यांना आमच्या अगांतुकपणाची दखल घ्यायला वेळ मिळाला नसावा असे आम्ही समजतो आणि आम्हाला जी माहिती आहे ती देतो. त्यात काही फार मोठी चूक असली तर दुग्धशाळा आयुक्त ती दुरुस्त करतील. म्हणजे आमची माहिती सुधारण्याला मदतच होईल.

ही योजना आमच्या माहितीप्रमाणे अशी आहे: ही योजना आरे गवळीवाड्याच्या धर्तीवर उभी करावी अशी श्री डी.एन.खुरोडीसाहेबांची इच्छा होती. आरे कॉलनीचे जनक तेच आणि ह्या योजनेची गर्भधारणा त्यांचीच. त्यांच्या कल्पनेपेक्षा जास्त वेळ हिला जन्म घ्यायला लागला. मध्यंतरी काही राजकीय उलथापालथी झाल्या आणि त्यांच्याजागी पुणे योजनेचे श्री. गोडबोले, डॉ. व्ही. एम. पाटील वगैरे मंडळी आली. ह्या खुरोडींच्या अपत्याला दत्तक घ्यायला ह्या मंडळींना बराच वेळ लागला. कारण खुरोडी हे मुंबई योजनेचे जनक तर पुणे योजनेचे गोडबोले-पाटील मंडळी जन्मदाते. ह्या दोन्हीही योजना जरी जनतेला दूध पुरवठा करण्यासाठीच असल्या तरी परस्पर विरुद्ध संबंधामुळे फार पूर्वीपासून एक प्रकारचा सापत्न भाव ह्या दोन्हीही योजनात वावरत होता. खरे म्हणजे ह्या त्यांच्या घरगुती गोष्टी आहेत. आम्ही त्यात पडू नये हे आम्हाला एकदम कबूल आहे. परंतु कित्येक गोष्टींचा उलगडा हे नाते लक्षात आले म्हणजे होतो. तेव्हा पूर्वीची खुरोडींची ही कल्पना बदलून आता नव्या स्वरुपात दापचरी दूधयोजना आपल्यासमोर उभी आहे आमच्या माहितीप्रमाणे योजनाकारांचा दावा असा आहे—

मुंबईपासून दापचरी हे गाव मुंबई अहमदाबाद रस्त्यावर सुमारे ८० मैलांवर आहे. ठाणे जिल्ह्यातील तलासरी ते पालघरपर्यंतच्या भागात दुग्धोत्पादनाचा व्यवसाय हा शेती विकासाच्या कार्यक्रमाचा अविभाज्य भाग म्हणून शेतकऱ्यांना देता यावा हा आता ह्या योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यासाठी दापचरी योजनेत निरनिराळे कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहेत. मुंबई शहारापासून जवळ असलेला हा भाग मुंबईच्या दृष्टीने विकसित करणे महत्वाचे आहे. ते सहज शक्यपण आहे. या भागात मोठ्या प्रमाणावर गवत होते व ते मुंबई शहरास पुरविले जाते. हे गवत मुंबईला पाठविण्याऐवजी ह्या विभागात पुरविण्यास दुग्धोत्पादनाला चालना देऊन स्थानिक जनतेला चांगला व्यवसाय प्राप्त होईल. त्यांचे शेतीचेही उत्पन्न वाढेल.

सुमारे ६००० एकर जमीन संपादन व्हायची आहे. ही जमीन उपेक्षित, उंचसखल आणि बरीचशी लागवडीस अयोग्य अशी आहे. थोडीशी भातखाचरे सोडल्यास उगवेल तेवढे गवत हेच उत्पन्न. सुमारे ३५०० एकर मोठ्या शेतकऱ्यांच्या मालकीची होती. ८७७ एकर जमीन फॉरेस्टची. उरलेली १६२३ एकर आदिवासी व लहान लहान शेतकरी यांची आहे. ही सर्व जमीन सुधारून

त्यावर चांगली चाऱ्याची पीके घेता येतील अशी व्यवस्था करायची आहे. त्यासाठी सुमारे १५०० एकरावर १२०० दक्षलक्ष घनफूट पाण्याची धारणा असलेला एक जलाशय बांधायचा आहे. सुमारे २१००० गुरे, १०,००० लोकसंख्या, २००० एकर बारमाही बागायत व २००० एकरावर हंगामी बागायत यासाठी हे पाणी पुरेल असा अंदाज आहे. डोंगर, टेकड्या, रस्ते, इमारती भाग सोडून ४००० एकर क्षेत्र निरनिराळ्या पिकांसाठी वापरता येईल असा अंदाज आहे. या जलाशयामुळे आजुबाजूच्या गावातील विहिरींना बारमाही पाणी राहील व त्यामुळे शेतकऱ्यांचा चांगला फायदा होईल.

**सरकारी जनावरे :** सरकार स्वतःच्या १००० गाई ठेवणार आहे. दुग्धोत्पादन संबंधीचे प्रश्नावर या ठिकाणी अभ्यासपूर्वक प्रयोग करून त्यावर आधारीत असे उपाय सुचविणे शक्य होईल. येथे संकर पैदाशीचा कार्यक्रम असेल. आरे, पालघर व दापचरी येथील गाईंचा संकर पैदाशीसाठी उपयोग करून त्यांच्या कालवडी मोठ्या संख्येने ठेवून त्यांचा अभ्यास करायचा आहे. यासाठी दापचरी योजनेत १००० फार्म युनिटस् बांधायची आहेत. त्यातील गाईंचा अगर त्यांच्यापासून होणाऱ्या संकरीत प्रजेचाही उपयोग करता येईल. चाऱ्यांच्या पिकांचा या विभागामार्फत अभ्यास करून दुग्धोत्पादनाच्या दृष्टीने पिकांची मांडणी यासंबंधी या विभागातून अभ्यासपूर्वक शिफारशी शेतकऱ्यांसाठी देता येतील.

कृषिक्षेत्र किंवा फार्म युनिटस हा अतिशय महत्त्वाचा कार्यक्रम ह्या योजनेत व्हाणार आहे, असा योजनाकारांचा दावा आहे. सुमारे १००० शेतकरी कुटुंबे ही शेती चालवतील. एका क्षेत्रात २। एकर जमीन राहील. त्यावर एक घर व १२ गाईंचा गोठा असेल. जमिनीचे व घराचे भाडे शेतकऱ्यांना द्यावे लागेल. निम्मी जमीन बारमाही बागायती व निम्मी हंगामी बागायत राहील. त्यावर एक एकर बारमाही चाऱ्याचे पीक व एक एकर भातानंतर चाऱ्याचे पीक अशी पिकांची व्यवस्था असेल. गोठ्यातील शेणखत शेतात वापरले जाईल. या शेतकऱ्यांच्या सहकारी सस्था स्थापन करून त्यांचे मार्फत दाणा, गवत वगैरे गोष्टींचा पुरवठा होईल. शेतकऱ्यांचे सर्व दूध शासनास द्यावयाचे आहे. तेथे सामुदायिक धारा काढण्याची सोय असेल. ते दूध गार करून रोड टँकरने मुंबईत पाठविले जाईल. आरे गौळीवाड्यातील दुधापेक्षा येथील दुधाचे उत्पादन बरेच स्वस्त होईल.

**मुंबईतील गोठे :** मुंबईतील गवळ्यांना दापचरी योजनेत गोठ्यांसाठी सोई मिळतील. २५ गुरांना एक एकर प्रमाणे जागा देण्यात येईल. रस्ता, पाणी, वीज, पैदाशीच्या सोयी, पशु वैद्यकीय मदत, ह्या सोयी मिळतील. अशा १०,००० म्हशींसाठी सोय होईल. गवळ्यांनी गोठे व राहाण्याची घरे तज्ज्ञांच्या सल्ल्याने बांधायची आहेत. त्यांच्या सहकारी संस्था करण्यात येतील. दूध शासनालाच विकावे लागेल.

ग्रामीण दूधयोजना : पालघरपासून दापचरीपर्यंतच्या विभागातून दूध गोळा करण्याचे काम ह्या योजनेमार्फत हाती घेण्यात येईल. ह्या योजनेचा शेती विकासाला, शेतकऱ्यांना लाभ मिळेल.

दूध उत्पादनाचे अंदाज : ही योजना पूर्ण झाल्यावर सुमारे १,२५,००० लिटर दूध मुंबई शहराला मिळेल.

| | | |
|---|---|---|
| १ : | सरकारी जनावरांचे (गाईंचे) | ५,००० लिटर |
| २ : | फार्म युनिटस् (कृषिक्षेत्र) गाईचे | ५०,००० ,, |
| ३ : | मुंबईतील गवळ्यांकडून म्हशीचे | ५०,००० ,, |
| ४ : | ग्रामीण संकलन | २०,००० ,, |
| | | १,२५ ००० |

सुमारे ८०० आदिवासींच्या जमिनी ह्या पसाऱ्यात गेल्या आहेत. त्यांच्या जमिनी कमी होत्या व अनुत्पादक होत्या तरी त्यांना सहाय्य देणे आवश्यक आहे. काहींना शक्य असेल तेथून जमिनी देण्यात येत आहेत. काहींना प्रकल्पातील एका भागात ५०० एकर जमीन बारमाही बागायती – प्रत्येकी एक एकर अशी देऊन वसविण्याचा प्रयत्न आहे. पुनर्वसन मंडळामार्फत योग्य ती मदत त्यांना देण्यात येत आहे.

भूसुधारणेचा मोठा कार्यक्रम प्रकल्पात हाती घेण्यात आला आहे. जेथे म्हणून शक्य असेल तेथे चाऱ्याचे पीक काढण्यात येईल. दुधाचे उत्पादन वाढविणे आणि उत्पादनाचा खर्च कमी करणे यासाठी चांगल्या चाऱ्याचा वापर हे महत्त्वाचे साध्य आहे.

भांडवली खर्च : हा प्रकल्प जरी विकासाच्या दृष्टीने उभा करण्यात येणार असला तरी तो शक्य तितक्या व्यापारी तत्त्वावर चालविण्यात येणार आहे म्हणजे त्यावर होणारा खर्च– वार्षिक खर्च – भांडवली खर्चावरील व्याज, घसारा धरून वार्षिक उत्पादनातून शक्य तितका पुरा करता आला पाहिजे. तसा तो करता येईल अशी अपेक्षा आहे.

भांडवली खर्च :

| | | | |
|---|---|---|---|
| १ : | जमीन संपादन व सुधारणा | रु. | ३७·०० लक्ष |
| २ : | जलाशय व पाणीपुरवठा | रु. | १९६·०० लक्ष |
| ३ : | रस्ते | रु. | २५·०० लक्ष |
| ४ : | फार्म युनिटस् | रु. | १८५·६३ लक्ष |
| ५ : | सरकारी जनावरे | रु. | २४·०० लक्ष |
| ६ : | मुंबईतील गवळी सोई | रु. | १०·०० लक्ष |
| ७ : | दूध गार करणे वगैरे | रु. | ५७·०० लक्ष |
| ८ : | कचेऱ्या घरे वगैरे इमारती | रु. | ६२.०० लक्ष |
| ९ : | गुरांच्या पैदाशीची सोय | रु. | ३.०० लक्ष |
| १० : | रोड टँकर्स, मोटर डपो | रु | ३७.०० लक्ष |
| ११ : | इतर खर्च, वीज शक्ती | रु. | २५·३७ लक्ष |
| | | | ६६२·०० लक्ष |

प्रकल्प पुरा व्हायला वेळ लागेल. तसा हा खर्च वाढत जाईल.

प्रकल्पाची आखणी करणे, आणि प्रकल्पासंबंधी शासनास सल्ला देणे, तसेच प्रकल्प पूर्ण करण्यासाठी मदत करणेसाठी शासनाने दापचरी भागातील कार्यकर्ते व संबधित आधिकारी यांची एक सल्लागार समिती स्थापन केलेली आहे. या समितीच्या शिफारशी लक्षात घेऊन महत्त्वाचे निर्णय घेण्यात येतात. असा हा आमच्या माहितीप्रमाणे दापचरी दूध प्रकल्पाचा तोंडावळा आहे.

हा प्रकल्प १९७५–७६ अखेर पूर्ण व्हायचा आहे. आतापर्यंत २२५·३९ लक्ष रुपये म्हणजे २ कोटी २५ लाख ३९ हजार रुपये खर्च झाले आहेत. त्याचा तपशील आमच्या माहितीप्रमाणे असा आहे.

| | रुपये |
|---|---|
| १ : ॲडमिनिस्ट्रेशन खर्च | २६,८७,५८२·४० |
| २ : जमिनीची किंमत | १७,९४,९४१·७२ |
| ३ : बांधकाम खर्च | १,४८,२४,०००·०० |
| ४ : जनावरे खरेदी खर्च | ४,५१,९२२.७७ |
| ५ : आकस्मिक खर्च | ३४,२९,०९४·४२ |
| ६ : इतर खर्च | ४,१७,३००·८४ |
| | २३६,०४,८४२.१५ |

हा एवढा खर्च आतापर्यंत झालेला आहे. हा खर्च सन १९६१–६२ सालापासून सुरू झालेला आहे.

आता सध्या दापचरीला काय उद्योग चालला आहे ते पाहू.

सन १९७० पासून दुभत्या गाई ठेवल्या आहेत. हल्ली तेथाल जनावरे खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १ : दुभत्या गाई | २५८ |
| २ : भाकड्या गाई | २१९ |
| ३ : कालवडी | ४४७ |
| ४ : इतर | ९५ |
| | १०१९ |

ह्या २५८ दुभत्या गाईंचे दूध ७०० लिटरच्या आसपास आहे. गेल्या वर्षाची दुधाची सरासरी खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| ७०–७१ | १·६ लिटर. |
| ७१–७२ | २·७ ,, |

म्हणजे एका गाईची रोजची सरा-

सरी २·७ लिटर आहे.

हे जे दूधउत्पादन होत आहे त्याचा उत्पादन खर्च काढण्यात येत नाही. याचे कारण असे सांगण्यात येते की, सरकारी गायी ह्या मुख्यत: दुभत्या जातींच्या गाईंच्या संबंधी जे अनेक प्रश्न निर्माण होतात त्यांचा सखोल अभ्यास करून त्यावर उत्तरे शोधून काढण्यासाठी पोसल्या जात आहेत. मुख्य कार्यक्रम देशी गाईपासून संकरित प्रजा निर्माण करणे संबंधीच्या. तेव्हा दुधाचा हिशेब व्यापारी पद्धतीने करणे योग्य होणार नाही असे आता दूधखाते सांगत आहे असे आम्हाला समजते.

आमची ही अशी माहिती आहे. ती बहुधा चूक नसावी. पण काही चूक असल्यास 'चूकभूल द्यावी घ्यावी' ही आमची वृत्ती आहे. आता एकूण जी वर सर्व माहिती दिली आहे त्यावरून मुंबईकरांना फार मोठा दिलासा मिळायला सुरुवात झाली असेल. ह्या योजनेने काय काय साधणार आहे असे योजनाकार सांगतात ते पहा.

१: सुमारे ६॥ कोटी रुपये खर्च करून १९७५–७६ साली १। लाख लिटर दूध.

२: दूध उत्पादनात वाढ.

३: दूध स्वस्त होणार.

४: शेतकऱ्यांना , दुधाचा धंदा मिळणार.

५ : पालघर ते दापचरी पर्यंतच्या विभागातील शेतीचा विकास होणार.

६ : गाईवर संशोधन होऊन संकर पैदास स्थिर होणार.

दापचरी दूध योजना सादर करीत असताना ही महत्त्वाकांक्षी उद्दिष्टचे नजरेसमोर ठेवली आहेत. ही साध्य झाली तर दूधखाते लोकांकडून दुवा घेईल. आणि साध्य झाली नाहीत तर...ते मी लोकांवरच सोपवितो आणि ही उद्दिष्टचे कितपत साध्य होऊ शकतील हे जरा मांडतो.

आतापर्यंत सुमारे २ कोटी ३६ लक्ष रुपये खर्च झाले आहेत. सुरुवात १९६१–६२ साली झाली. १९७१–७२ पर्यंत १० वर्षे झाली. आणि हाताला काय लागले? बहुतेक सर्व अनुत्पादक खर्च. अॅडमिनिस्ट्रेशनवर २७ लाख, आणि आकस्मिक खर्च ३४ लाख रुपये. बांधकामावर १॥ कोटी. जनावरे खरेदी


# संध्याकाळ

वेधक आत्मकथन

गजानन जागीरदार

मूल्य : रुपये दहा

राजहंस प्रकाशन

पुणे ३०.

४॥ लाख आणि पदरात काय पडले? तर रोजचे ७०० लिटर दूध आणि सुमारे १००० गाईंचा पांजरपोळ पोसण्याची जबाबदारी. त्यातील फक्त २५ % गाई दूध देणाऱ्या आहेत. आणि ते तरी किती? रोजचे २॥ लिटर? आहे की नाही सरकारी खाक्या? डोंगर पोखरून उंदीरसुद्धा निघायचा नाही. हे दूध काय भावाने पडले म्हणून विचारण्याची सोयच नाही. कारण तसा उद्देशच नाही. संशोधन करायचे आहे म्हणे! जणू संशोधनात उत्पादनाची किंमत नक्की करायला गेले तर संशोधनच बिघडून जाईल! ह्या दूध योजनेच्या अधिकाऱ्यांना कोणी विचारणारे नाही. बेताल खर्च चालू आहेत. आकस्मिक खर्च म्हणे ३४ लाख आणि बांधकामावर १॥ कोटी रुपये. आणखी दिवस जातील तसा खर्च वाढेल म्हणे! एवढा खर्च करून दूध काय भावाने पडणार आहे? त्याचा कोठे ठावठिकाणा नाही आणि तरी हे लज्जा गुंडाळून ठेवलेले लोक वर सांगणारच, की आरे गवळीवाड्यापेक्षा हे दूध स्वस्त पडणार आहे! कारण काय तर 'चांगल्या चाऱ्याचा वापर' ह्यावर योजनेचा भर रहाणार आहे. आधीच इतका बेबंद खर्च होणार आहे की हे दूध तुपाच्या भावाने तरी परवडेल का? काय भावाने दूध परवडणार आहे, ह्याबद्दल काहीच माहिती मिळत नाही हा नुसता अंदाज आहे किंवा नुसतीच सदिच्छा आहे.

आता १९७५-७६ साली १। लाख लिटर दूध मिळणार म्हणून लिहिले आहे हा आशावाद तर थक्क करणारा आहे. १९७५-७६ सालापर्यंत मुंबईतील गवळ्यांच्या १०,००० म्हशींचे ५०,००० लिटर दूध मिळणार म्हणून आशाळभूताचा हा आशावाद आहे. आरे कॉलनीचा भरपूर अनुभव घेतल्यानंतर पुन्हा ह्या सरकारी सापळ्यात सापडतील एवढे मुंबईचे गवळी मूर्ख आहेत असेतर नाहीना योजनाकारांना वाटत? १९४९ साली ते शक्य झाले. पण आता १९७९ साली ते शक्य नाही. मुंबईची एकही म्हैस जोवर सरकार दूध घेण्याची सक्ती करीत आहे तोवर दापचरीला जाणार नाही. शिवाय १००० कृषिक्षेत्रातील ५०,००० लिटर दुधाचा अंदाज असाच मूर्खांच्या नंदनवनात वावरण्यासारखा आहे. जमीन २ एकर. त्यावर घर, गोठा, ह्याची किंमत ४०,००० रु.च्या आसपास जाणार आणि तो बोजा १२ जनावरांवर पडणार. आरे कॉलनीत तो जनावराला साधारणपणे १००० रु. आहे. १७ रु. वीज, पाणी व भाडे म्हणून दरमहाची आकारणी आहे. येथे दर जनावराला ३००० रु.च्यावर भांडवली खर्च येणार आहे. नुसती जनावरे गोठ्यात बांधण्यासाठी. शिवाय किंमत वेगळीच. मासिक भाडे कसे परवडणार आहे? आणि कोणी त्या संबंधी विचार न करताच ह्या कृषिक्षेत्रात पदार्पण करण्यास धजावलाच तर शासनाचे पैसे बुडण्याचा जबदरस्त धोका आहे. शासकीय कळपाचे कदाचित ५००० लिटर दूध येईल आणि ते काय

भावाने पडते हे पहाण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्यामुळे ते उत्पादन होऊ शकेल असे आम्ही म्हणतो. पालघर ते दापचरी विभागातून २०,००० लिटर दुधाचे संकलन होईल हा असाच एक मृगजळी आशावाद आहे. सरकारी दूध योजना गेली १०–१५ वर्षे दूध गोळा करीत आहेच का नाही? मग कासा दूधयोजना, पालघर दूधयोजना का फसल्या आहेत? श्री. सोनुभाऊ बसवंत गेली १०–१५ वर्षे शहापूर भागात जिवाचा आटापिटा करीत आहेत आणि त्यांची मजल आता कोठे ६००० लिटर दुधावर गेली आणि तीसुद्धा जेव्हा १·८० रु. दराने त्यांनी 'आपना बाजार' ह्या सहकारी संस्थेला रोज २००० लिटर दूध द्यायला सुरुवात केली तेव्हा! उगीच खोटे आकडे मांडून ही मंडळी लोकांची दिशाभूल करीत आहेत आणि आत्मवंचना करून घेत आहेत.

आहे ह्याच स्वरुपात दापचरी योजना चालविण्याचा सरकारचा मानस असेल तर १९७५ सालीच काय, पण २०७५ सालीसुद्धा ह्या सरकारी कळपातून जे आज ७०० लिटर दूध येत आहे त्यापेक्षा जास्त दूध ही दापचरी योजना पान्हवून मिळण्याची सुतराम् शक्यता नाही. ठरल्याप्रमाणे खर्च मात्र होईल.

आता सांगा की ह्या दापचरी योजनेचे मूल्यांकन करणे जरुरीचे आहे किंवा नाही? आणि ते सर्वांगीण चौकशीशिवाय कसे होणार? जनतेने वेळीच सावध होऊन ह्या दापचरी योजनेला आवर घातला नाही आणि तेथे होणारा अनुत्पादक खर्च थांबविला नाही, तिला योग्य वळण दिले नाही तर ६॥ कोटी रुपये विकासाच्या नावावर बुडीत टाकावे लागतील. ●

---

# दूध शेती का हवी?




# दुधाची शेती हवी

वर चौथ्या विभागात सरकारच्या विविध प्रवृत्तींचा उल्लेख आहे. त्यापैकी आरे कॉलनी व दापचरी दूध-योजनेचा कारभार व माहिती दिली. आता ग्रामीण दूधयोजनेचा विचार करायचा आहे. ह्या ग्रामीण दूधयोजने-मार्फत मुंबई शहराला दूधपुरवठा होतो. त्यात गुजरात राज्यातील आनंद व महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण विभागा-तून होणाऱ्या दूधपुरवठ्याचा समावेश होतो. येथे आनंदचा विचार करण्याची गरज नाही. कारण आनंद आता महाराष्ट्रात नाही. तेव्हा ग्रामीण दूध-योजनांचा विचार करण्यापूर्वी त्यांचा एकूण विकासाशी कसा संबंध आहे ते पाहू.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतात

शेकडा ७०% जनतेला आपल्या उपजीविकेकरिता शेतीवर अवलंबून रहावे लागते. तसेच आपले राष्ट्रीय उत्पन्न सुमारे १२,५०० कोटी रुपये आहे, त्यापैकी सुमारे ५७०० कोटी रुपये म्हणजे ४५% उत्पन्न शेतीतील आहे. हे उत्पन्न दर एकरी फारच कमी आहे. दर एकरी अखिल भारतीय सरासरी उत्पन्न फक्त १२३ रु. आहे. (नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाईड इकॉनॉमिक रिसर्चच्या आधारे). जपान, अमेरिका यासारख्या प्रगत देशात ते आपल्यापेक्षा ५ पट अधिक आहे. आपली दैनंदिन गरज जेमतेम पूर्ण होत आहे आणि यंदाच्या दुष्काळासारखी आपत्ती आली की धान्याच्या जमवाजमवीकरिता परराष्ट्रांच्या तोंडाकडे पहाण्याची पाळी येते आणि मग शासनकर्त्यांसह सर्व लोकप्रतिनिधींकडून, 'खेड्यात रोज ५ किलोही अन्नधान्याचा पुरवठा होत नाही.' ह्या संतप्त तक्रारींना विधानसभेत आपल्या पुरवठा मंत्र्यांना तोंड देण्याचा प्रसंग येतो.

अन्नधान्याबाबत निश्चित व्हायचे तर दर एकरी उत्पादन वाढवायला हवे. उत्पादनवाढीमध्ये खतांच्या उपलब्धतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्याकडे खताचा वापर फारच कमी आहे. पुढील कोष्टक पहा–

(हे आकडे सन १९६४–६५ सालाचे आहेत.)

**खत वापराचे प्रमाण–किलोग्रॅममध्ये**

| देश | नायट्रोजन | फॉस्फेटस् | पोटॅश | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. बेल्जम | ९७·७१ | ७७.३८ | १०६·५८ | २८१·२८ |
| २. डेन्मार्क | ५५·०२ | ४०·३८ | ५६·४२ | १५४·८२ |
| ३. इजिप्त | ९०·६२ | १९·१५ | ०·४२ | ११०.१७ |
| ४. पश्चिम जर्मनी | ५५·६६ | ५५·९५ | ८३·८५ | १९२·३८ |
| ५. तैवान | १५३·५३ | ४१·१० | ३१·५३ | २३४·१६ |
| ६. जपान | १०४·०२ | ७४·१८ | ८४·९१ | २६३·१३ |
| ७. नेदरलँड | १२९·५० | ४९·२३ | ६१·३३ | २३९·८३ |
| ८. भारत | २·८९ | ०·८४ | ०·३६ | ४·०९ |

याप्रमाणे खतांचा एका हेक्टरमागे आंतरराष्ट्रीय वापर आहे हे आकडे इंडिया पॉकेट बुक ऑफ इकॉनॉमिक इन्फर्मेशन १९६७ पृष्ठ १८९ वरून घेतलेले आहेत.

आपला दर हेक्टरी खताचा वापर ४·०९ किलो तर जपानचा २६३·१३ किलो आहे. आपण किती मागे आहोत याचा अंदाज येईल. आपल्याकडे कृत्रिम खताची उपलब्धता अगदीच नगण्य आहे. आणि म्हणूनच जनावरांपासून मिळणाऱ्या मूत्र किंवा शेणखताचा

वापर मोठ्या प्रमाणात शेतीमध्ये करायला हवा. त्याकरिताच जमीन आणि जनावरे यांची सांगड घालणे अनिवार्य आहे. आजही शेतीवर असंख्य जनावरे आहेत. जगात सुमारे ९७ कोटी २९ लक्ष जनावरे आहेत, त्यापैकी भारतात सुमारे १८ कोटी गाई–म्हशी आहेत. परतु त्यांचे दूध किती? तर ९४% गाइ फक्त १ दिवसात जेमतेम १ लिटर दूध देतात. ह्यापैकी २९% गाई दिवसाला १/४ लिटरही दूध देत नाहीत. जगातील जनावरसख्यपैकी २२ ते २५ टक्के जनावरसंख्या आपल्याकड असूनही दूधउत्पादन फक्त ९ टक्कच आहे. ही परिस्थिती चिंताजनक आहे. ही जनावरे माळरानात अत्यत निकृष्ट जातीच्या गवताचे खुट चघळीत कसेतरी अर्धपोटी उपासमारीने जीवन जगत असतात. त्यांच्याकडून शेण असे फारसे मिळतच नाही. कारण ते बहुतक जनावरे चरत असताना माळरानातच पडते आणि तेही त्या जागेला खत म्हणून उपयागी पडत नाहीच. कारण ते गोळा करून एकतर सरपण म्हणून जाळलेतरी जाते किंवा रोपांना राब म्हणून तरी जाळले जाते. १२ कोटी टन शेणापैकी शेतीला २ कोटी टन शणच फक्त खत म्हणून उपयोगी पडत असावे असा प्लॅनिग कामशनचा अंदाज आहे. या परिस्थितीमध्ये या न परवडणाऱ्या जनावरांची विल्हेवाट लावली पाहिजे. भावनांच्या आहारी जाऊन हा प्रश्न सुटणार नाही. तर तो अधिकाधिकच बिकट होत आहे. कुचकामी जनावरांचा असह्य भार आपल्या जमिनीवर पड्त आहे. तो थांबलाच पाहिजे. पशुसंवर्धनाकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात त्याप्रमाणे गाय हा उपयुक्त पशु आहे या दृष्टीनेच तिच्याकडे पहायला शिकले पाहिजे.

अवलाद सुधारणा : परदेशात गाई आपल्या गाईंच्या मानाने २० पट तरी जास्त दूध देतात. आपल्या गाईचे वार्षिक सरासरी दूधउत्पादन १७३ किलोच आहे; तर न्यूझीलडमध्ये ते ३००० किलो, डेन्मार्कमध्य ३०१० किलो आहे. यावरून आपल्याला जनावरांचा वंश सुधारण्याच्या दृष्टीने केवढी मजल मारावी लागणार आहे ह्याची कल्पना यावी. वंश सुधारणेमुळे एकूण उत्पादनात वाढ होऊन देशाची समृद्धी वाढते. अशी समृद्धी पाश्चात्य देशांनी निर्माण केली आहे. त्यांच्या शेतीकार्यक्रमात पशुसंवर्धनाला अग्रक्रम आहे. पशु संवर्धनाभिमुख अशी त्यांची शेती व्यवस्था आहे. खालील कोष्टक फार बोलके आहे.

पशुसंवर्धनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचे एकूण शेतीउत्पादनाशी मिळणारे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| देश | आकडे शेकडेवारीत |
|---|---|
| १ : बेल्जिम | ६२ |
| २ : फ्रान्स | ६४ |
| ३ : नेदरलँड | ६९ |
| ४ : प. जर्मन | ७१ |
| ५ : ऑस्ट्रिया | ६५ |
| ६ : डेन्मार्क | ८२ |

| दूध | आकडे शेकडेवारीत |
|---|---|
| ७ : फिनलँड | ८८ |
| ८ : आयर्लंड | ८१ |
| ९ : नॉर्वे | ७८ |
| १० : स्वीडन | ९७ |
| ११ : स्वित्झर्लंड | ७२ |
| १२ : इंग्लंड | ७८ |
| १३ : भारत | १३ |

या वरील आकडेवारीचा अर्थ स्पष्ट आहे. पशुसंवर्धनाबाबत आपण अगदी प्राथमिक अवस्थेत आहोत.

पशुसंवर्धनाभिमुख शेती : या सर्व विवेचनावरून हे स्पष्ट व्हावे की आपली शेती एकांगी आहे. उपजिवीकेकरिता आपला शेतकरी फक्त शेतीच्या पिकावर अवलंबून असतो. दूधदुभते, पशुसंवर्धन, कुक्कुट पालन, वराहपालन, वगैरे पशुसंवर्धनाधिष्ठित जोडधंद्यांची शास्त्रीय पद्धतीने आपल्या शेतीला जोड दिल्यावाचून आपल्या शेतकऱ्यांची हलाखी सुधारणार नाही. नाहीतर दुष्काळ, अतिवृष्टी, कमी थंडी, हिमवृष्टी अशासारख्या नैसर्गिक आपत्ती आल्यावर आपला शेतकरी भांबावून जातो. त्याला स्वतःच्या पायावर उभे रहाता येत नाही. आपल्या शेतकऱ्यावर ४५% भारतीय अर्थव्यवस्था अवलंबून आहे. तो दुर्बल बनला आहे. म्हणूनच आपली अर्थव्यवस्था जोमदार होत नाही. ही परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने पशुसंवर्धनाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त होते. परंतु आपल्या सरकारांनी ह्या प्रश्न समजून घेऊन शेतीचे नियोजन केले आहे असे दिसत नाही. जो काही प्रयत्न होत आहे तो कच्च्या दिलाचा वाटतो. त्यातसुद्धा ज्या काही दूधयोजना आहेत आणि खास करून महाराष्ट्रात दूधयोजना आहेत, त्यात दूधउत्पादनाला अग्रस्थान न देता दूधवाटपावर भर देतात. दूध उत्पादनाचे प्रश्न हाताळण्याचे प्रयत्न अगदी जुजबी आहेत. ग्रामीण दूधयोजनेमध्ये दूधाला चांगले गिऱ्हाईक मिळण्याच्या दृष्टीने वाटपाची जरुरी आहे. परंतु दूधउत्पादनावर व पर्यायाने पशुसंवर्धनावर भर देऊन त्या दृष्टीने नियोजन व कार्यवाही व्हायला हवी आहे. आज तसे होत नाही हे खेदाने नमूद करावे लागत आहे.

महाराष्ट्रात सन १९४७ सालापासून सरकारी दूधयोजना सुरू आहे. त्यावेळी परदेशी दूध भुकटीच्या मक्तेदारी विक्रीचा आधार घेऊन योजना उभी राहिली. आनंद विभागातच फक्त दूध खरेदी होत असे. आरे कॉलनी निर्माण करून जनावरे मुंबई शहराबाहेर नेण्यात आली. परंतु तेथेही दूधउत्पदनावर भर नव्हता. दूध उत्पादनाची शास्त्रशुद्ध किंमत नक्की करून दूधउत्पादनाला चालना द्यावी म्हणून काही झाले नाही. ह्या कॉलनीसंबंधी व एकूण दूधयोजनेसंबंधी. आम्ही वेळोवेळी न रहावल्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांना पत्रे पाठविली आहेत. पहिले पत्रे आरे कॉलनीच्या अगदी प्रथमावस्थेत तेथील दोष निवारण करण्यासंबंधी त्यावेळचे मिल्क कमिशनर डी. एन् खुरोडी यांना

ता. क्रमांक OR २९१ ना. ५।८।१९५० चे आहे. दुसरे पत्र माननीय आरे कॉलनी मंत्रीमहाशय यांना ता. १४-१२-१९५६ चे आहे. त्यात आरे कॉलनीत दूध स्वस्त करण्याच्या दृष्टीने सूचना दिल्या आहेत. तिसरे पत्र श्री. आदम शेख आय. सी. एस् सचिव, कृषि व सहकार विभाग सचिवालय मुंबई यास ता. १८-२-६५ चे आहे. त्यात दूधयोजनेला १७-१८ वर्षे होऊनही परिस्थिती असमाधानकारक आहे, ती सुधारण्याच्या दृष्टीने काय करायला हवे ह्या सूचना आणखी विचार-विनिमय करण्याची तयारीही दर्शविली आहे. त्या पत्रातही 'सरकारी दूध-योजनेने दूधउत्पादनावर लक्ष केंद्रित न करता फक्त दूधवाटपावर केंद्रित केले आहे.' हा मुद्दा स्पष्ट केलेला आहे. ह्या कोणत्याही पत्राचे उत्तरही मिळाले नाही. असो.

पुढे महाराष्ट्राच्या ग्रामीण विभागात ३५ योजना सुरू झाल्या. १६ जानेवारी १९५० साली पुणे दूधयोजना सुरू झाली. १९५८ च्या ऑगस्ट महिन्यात नागपूरची दूधयोजना सुरू झाली. १९६० मध्ये नाशिक, ३१-३-१९६१ ला कोल्हापूर, त्यामागोमाग सोलापूर, अकोला, अमरावती, औरंगाबाद असा दूधयोजनांचा महापूर आला. जेवढे जिल्हे आणि जेवढे मंत्री तेवढ्या दूध-योजना. ह्या योजनामुळे एक फायदा निश्चित झालेला आहे. शेतकऱ्यांच्या हातात वर्षभर पैसा आल्यामुळे त्याची परिस्थिती सुधारण्यास मदत झालेली

**फिडेल चे आणि क्रांती**

अरूण साधू

मूल्य : सात रुपये

---

**एका पराभवाची कहाणी**

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये

---

राजहंस प्रकाशन

आहे. धुळे, मिरज, चाळीसगाव, पुणे ह्यासारख्या योजना, जर धोरणात योग्य ते बदल केले तर गुजरातच्या आनंद योजनेपेक्षा रतीभरही कमी रहाणार नाहीत. पण! हे पण आणि परंतुच फार घोटाळा करतात! तर आम्ही काय मांडीत होतो, की ह्या ग्रामीण दूधयोजनांमध्ये 'दूधउत्पादक' आणि दूध उत्पादन अगदीच पिछाडीला असून दूधवाटपावरच लक्ष केंद्रित केलेले आहे. कोठे पारड्या दे. तर कोठे गजरान वाढवायला मदत दे असे दानधर्मावर व दयेवर उत्पादनाचे विषय हाताळले जातात. अशा अर्ध्या कच्च्या, धरसोडीक प्रयत्नाने हा दूधउत्पादनाचा व पशुसंवर्धनाचा कार्यक्रम रेटता येणार नाही. दूधउत्पादनाला, पशुसंवर्धनाला अग्रक्रम देऊन त्याचा एक अपरिहार्य भाग म्हणून वाटप योजनेकडे पहायला हवे, पण आता अगदी उलटी स्थिस्ती आहे. दूध वाटप हा प्रमुख भाग व त्या अनुषंगाने येणारी उत्पादन यंत्रणा, त्यामुळे मूळ प्रश्नाला हात घातला जात नाही.

शेतीला जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय विकसित व्हायला हवा अशी आमची कल्पना आहे. ह्यालाच आम्ही दुधाची शेती म्हणतो. आरे कॉलनीत काय किंवा मुंबई शहरात काय, आज जी दुधाची कारखानदारी चालली आहे तसे स्वरूप न रहाता दुधाची शेती व्हायला हवी आहे. परंतु शेती आणि दुग्धव्यवसाय हे दोन्ही धंदे या स्वरूपात स्वतःच्या पायावर उभे करायचे आहेत हे गृहीत धरलेले आहे. एकेका शेतकऱ्याच्या दोन दोन, चार चार म्हशी आहेत. शेतीच्या पीक कार्यक्रमात थोडे ल्यूसर्न, थोडे कडवळ, बरसीत, आरे, मका अशा हिरव्या वैरणीचा समावेश आहे. शास्त्रीयदृष्टीने प्रत्येक जनावरामागे दूधवाढीचा रेखीव व आखीव कार्यक्रम आहे. उत्तम निपज होण्यासाठी जातीवंत वळूंची निवड होत आहे. दूधउत्पादन हे शेती उत्पादनाचे एक स्वाभाविक यंत्र बनले आहे. असे आमचे दूधाच्या शेतीचे चित्र आहे. थोडक्यात म्हणजे आपण जशी भाताची, ज्वारीची किंवा ऊसाची शेती करतो तशी शेती करायला हवी. दुधाचा धंदा हा थोडक्यात शेतीचा अविभाज्य भाग बनला पाहिजे. बारीकसारीक सर्व गोष्टींना पैसा मोजावा न लागता, शेतीतील एरव्ही वाया जाणाऱ्या गोष्टी जनावरांना घालून दूध काढून घेऊन, उत्सर्ग, शेण व मलमूत्र पुन्हा शेतीत घालून नैसर्गिक चक्र फिरवायला मदत देण्याचे काम करायचे आहे. दुधाची रोजची रोकड निर्वाहाकरिता शेतकऱ्यांच्या हातात आल्यामुळे त्याचा कर्जबाजारीपणा कमी होऊन तो समर्थ बनत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा ४५% भार सहन करण्याइतपत तो जोमदार बनत आहे. परंतु २०–२० वर्षे दूधयोजना चालवूनही ग्रामीण दूधयोजना तोट्यात जात आहेत. थोड्याथोडक्या नाहीत. चांगल्या ८० लाख रुपये सालीना तोट्यात जात आहेत.

●




# आमच्या जिल्ह्यालाही योजना हवी !

ग्रामीण दूधयोजनांकडे केवळ शहरांना दूधपुरवठा करणाऱ्या संस्था म्हणून पाहून चालणार नाही, तर एकूण शेतीविकासाचा महत्त्वाचा भाग म्हणून त्यांच्याकडे पाहिले पाहिजे हे आपण पाहिले. आता ज्या ह्या विविध योजना आहेत, त्यांची परिस्थिती काय आहे ते पाहू त्यापूर्वी एक मुद्दा ध्यानात घेणे जरूर आहे की ह्या दूधयोजना त्या जिल्ह्यातील शहरांना दूधपुरवठा करून उरलेले दूध मुंबई योजनेला पुरवीत असतात. आणि शिवाय ग्रामीण शेतीविकासालाही हातभार लावीत असतात. आता मुंबई दूधपुरवठ्याची स्थिती काय आहे ते पाहू या. मुंबईची लोकसंख्या सध्या ५० लाखाच्या आस-

पास आहे. आणि रोजचे साधारणपणे १० लाख लिटर होल दूध सरकारी व खाजगी मिळून उपलब्ध आहे. ही वसती सारखी वाढते आहे. तेव्हा उद्याची गरज एकसारखी वाढत रहाणार आहे हे लक्षात येईल.

ह्या दुधापैकी साधारणपणे ६ लाख लिटर दूध मुंबई, उपनगरे व आजूबाजूच्या विभागातील खाजगी गवळ्यांकडून पुरविले जाते. सुमारे ४ लाख लिटर दुधाचा पुरवठा सरकारी दूध योजनेमार्फत होतो. खाजगी दूधपुरवठा फारसा वाढण्याची शक्यता कमी आहे. कारण मुंबई उपनगरात नवीन गोठे बांधायला नगरपालिकेची परवानगी नाही. तसेच कॅटल कंट्रोल ऑर्डर अन्वये नवा परवाना म्हशी ठेवण्यासाठी मुंबई उपनगरात मिळत नाही. चोरूनमारून विनापरवाना तबेले होत असतात. जरा शिस्तप्रिय व कडक नगरपालिका आयुक्त आले की गैरकायदा तबेला बांधकामे तोडली जातात; परंतु त्याबाबतीतही राजकीय दडपण येऊन अशा बांधकामांना जीवदान मिळते आणि असे तबेले मुंबईच्या भरवसतीत घाण निर्माण करीत रहातात. परंतु आता नव्याने आणखी दूध उत्पादनात वाढ व्हायला अशारीतीने फारच थोडा वाव आहे. मुंबई शहराबाहेर वसई तालुक्यात काही तबेले जात आहेत. परंतु ते मुंबईमधून किंवा आरे कॉलनीतून बाहेर जाणाऱ्या म्हशी असल्यामुळे वाढत्या लोकसंख्येला दूधपुरवठा होण्याइतपत वाढ होत नाही. तेव्हा ही वाढती गरज पूर्ण करण्याची स्वाभाविकच जबाबदारी सरकारी दूधयोजनेवर येऊन पडते. सध्या हा सरकारी दूधपुरवठा खालील ठिकाणाहून होत असतो.

| | |
|---|---|
| आरे कॉलनी | ७०,००० लिटर |
| उपनगर सहकारी संस्था | ३,००० लिटर |
| आनंद | १,२५,००० ,, |
| ग्रामीण दूधयोजना | १,४०,००० ,, |
| | ३,३८,००० ,, |

ह्या दुधातून आता नव्याने पुरवठा होत असलेले टोण्ड व स्पेशल टोण्ड दूध बनवून विकण्यात येते. सध्या जी होल दुधातून मलई काढतात ती सर्वच्या सर्व ५ % दुधाकरिता वापरावी लागत नसल्यामुळे त्याचे तूप बनवून विक्री करण्यात येते. जशी दुधाची मागणी वाढेल त्याप्रमाणे ही तूप विक्री कमी होईल.

हा जो ग्रामीण दूधपुरवठा होतो

पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन

त्याचे गेल्या ५ वर्षांचे दूधपुरवठ्याचे आकडे खाली देत आहोत.

| वर्ष-<br>महिना | १९६७–६८<br>लीटर्स | ६८–६९<br>लीटर्स | ६९–७०<br>लीटर्स | ७०–७१<br>लीटर्स | ७१–७२<br>लीटर्स |
|---|---|---|---|---|---|
| एप्रिल | १७,४९०११ | २६८२५३५ | २५३६०६८ | २८०३४८५ | ३०८११२९ |
| मे | १३०९७७८ | १७८४४१३ | १४८६४५५ | १९८२४२२ | २१५७७२१ |
| जून | ८९५९५३ | ११२७७०५ | १२५५९०६ | २०४३५३६ | २१५०८०० |
| जुलै | १०३६१०४ | १२०५६७५ | १२७११२७ | २५५३२०९ | २२४२६४१ |
| ऑगस्ट | १४१८५९० | १३२७५३४ | १६९५६७७ | ३१८८२४२ | २८०२७१६ |
| सप्टेंबर | २२१२९१३ | २१५३९९२ | २५६१५४० | ४३५२८८८ | ४०४४८३२ |
| ऑक्टो. | ३४७१६०० | ३९१२२२८ | ४४५८९९९ | ६४११०८१ | ६२७५६४३ |
| नोव्हें. | ४२५०८२० | ४७५२८८० | ५११९६७३४ | ५२६००२० | ६६३६२२० |
| डिसें. | ४३०९६१८ | ४८७५९२३ | ६०८०६७१ | ६२२७७२४ | ६४९५३७८ |
| जाने. | ४८६६९८८ | ५०७७०४० | ६११९३४५९ | ६११९०९३ | ५५७८४७१ |
| फेब्रु | ४४५२८७३ | ३५९८२४७ | ५०७८१५३ | ४९३१४४८ | ५१७१८३२ |
| मार्च | ३८०१२६९ | ३५६४५६० | ४३२२९३० | ४३६८७१७ | ४३९२६३६ |
| | ३३७७५५१७ | ३६०६२७१७ | ४२२३७९२६ | ५०३२१८६५ | ५१०३००२९ |

ह्या आकड्यावरून दरवर्षाचे सरासरी रोजचे दूध व जून महिन्यात जास्तीतजास्त तुटीचा काळ असतो तेव्हाचे दूध व सुगीच्या काळात म्हणजे डिसेंबर महिन्यातील सरासरी दुधाचे आकडे खालीलप्रमाणे—

| वर्ष | रोजचे सरासरी दूध | जून महिन्यातील सरासरी दूध | डिसेंबर महिन्यातील सरासरी दूध |
|---|---|---|---|
| ६७–६८ | ९२,७०० | २९,८६५ | १,४३,६५३ |
| ६८–६९ | ९८,८०२ | ३७,५९० | १,६२,५३० |
| ६९–७० | १,१५,७२२ | ४८,८६३ | १,७३,२२४ |
| ७०–७१ | १,३७,८६७ | ६८,११७ | २,००,५९० |
| ७१–७२ | १,३९,८०८ | ७१,६९३ | २,१६,५०२ |

डिसेंबरमधील जास्तीत जास्त दूध २,१६५०२ लिटर व जूनमधील ७१००० लिटर दूध ही जी तफावत आहे, त्यामुळे दूधपुरवठ्यात फार मोठे चढउतार

होतात. याचा अर्थ जून महिन्यात योजनेला एक गवळी १ लिटर दूध देत असला तर तोच गवळी डिसेंबर महिन्यात ३ लिटर दूध देतो. त्यामुळे त्याला सरासरी भाव वर्षाला जो मिळतो तो असा होतो. (ऑक्टोबर ते मार्च ८८ पैसे व एप्रि. ते सप्टें. १४३ पैसे).

| | | |
|---|---|---|
| म्हणजे जून महिन्यात | १ लिटरचे | १४३ पैसे. |
| डिसेंबरमधील | ३ लिटरचे | २६४ पैसे. |
| | ४ लिटरचे | ४०७ पैसे |

सरासरी १ लिटरचे १.०२ पैसे.

म्हणजे सुगीचा काळ व तुटीचा काळ यांची सरासरी जरी १·१५ येत असली तरी दूधउत्पादकाचे हातात फक्त १.०२ पैसेच पडतात. हा भाव त्याला परवडत नाही. म्हणून हा भाव अधिक दूधउत्पादनाला प्रेरक ठरत नाही.

ह्या चढउताराचा आणखीही परिणाम असा होतो की डेअरीची जी यंत्रसामुग्री चालू असते तिला पुरेसे काम मिळत नाही. म्हणून एकूण दूध-प्रक्रियेचा खर्च वाढतो. शिवाय गिऱ्हाइ-कांना एकसारखे दूध न मिळाल्यामुळे खासकरून लहान मुलांचे फारच हाल होतात. तेव्हा ग्रामीण दूधयोजनात हा जो दूधपुरवठ्याचा चढउतार आहे तो कमी केल्याशिवाय चालणार नाही. हवामानातील उष्णतेमुळे व उन्हाळ्यात म्हशी एकूणच कमी वीत असल्यामुळे २० टक्के दूधपुरवठा कमी होणे स्वाभाविक आहे. परतु ७५ टक्के कमी दूधपुरवठा हा योजनेवर असह्य ताण निर्माण करतो. हा कमी दूधपुरवठा होण्याचे प्रमुख कारण सरकारमार्फत दूध उत्पादकाला मिळणारा भाव हा दूध उत्पादकाची किमत विचारात घेऊन दिलेला नसतो हे एक. आणि दूध-उत्पादन वाढविण्यासाठी जे लक्ष केंद्रित करावे लागते ते न करता दूध वाटपा-वरच जास्त लक्ष दिले जाते. एका बाजूने दूध उत्पादक पुरेसा भाव मिळत नाही म्हणून उत्पादनाबाबत उदासीन बनतो तर गिऱ्हाइकाला स्वस्त दूध-पुरवठा होत नसल्यामुळे तोही नाखूष असतो. दूध खरेदी केल्यापासून मुंबईला पोहोचेपर्यंत अधिकारीवर्ग, यंत्रसामुग्री, वगैरेवर अवाढव्य खर्च होत रहातो आणि सर्व दूधयोजना तोट्यात जातात. हा जो वर्षानुवर्षे दूधयोजनेला तोटा येत आहे त्याचा भुर्दंड गिऱ्हाइकावर व दूधउत्पादकांवर – दोघावरही पडत आहे. तोट्याचे आकडे योजनावार पुढीलप्रमाणे आहेत.

| योजनेचे नाव | ७०–७१ येणारा अंदाजे तोटा | ७१–७२ येणारा अंदाजे तोटा |
|---|---|---|
| | रुपये | रुपये |
| १. सरकारी दूधपुरवठा योजना, नासिक | ५,२१,३१७ | ३,१२,२०० |
| २. सरकारी दूधयोजना, सोलापूर | ७,७४,५३० | ९,३९,८०४ |
| ३. सरकारी दूधपुरवठा योजना, धुळे (फायदा) | ७९,८७३ | ५,६५,२१९ |
| ४. सरकारी दूधपुरवठा कम फीडींग स्किम, चाळीसगाव | १,५६,३१८ | ५३,१०० |
| ५. सरकारी दूधपुरवठा योजना, महाबळेश्वर | १,६९,३०८ | ७२,१०० |
| ६. सरकारी दूधपुरवठा कम फीडींग स्कीम, अहमदनगर | १,७७,०६१ | ३,६४,३०० |
| ७. कृष्णा व्हॅली मिल्क प्रॉजेक्ट, मिरज | १३,०७,४९६ | ६,४३,३०० |
| ८. सरकारी दूधपुरवठा योजना, कोल्हापूर | ६,३७,९७० | ४,१४,१०० |
| ९. सरकारी दूधखरेदी केन्द्र, कासा | १,२६,५४९ | १,७६,२०० |
| १०. सरकारी दूधपुरवठा योजना, खालापूर | २,५०,००० | २,०३,१०० |
| ११. सरकारी दूधपुरवठा योजना, नागपूर | ८,२७,२४१ | ९,७६,६८३ |
| १२. सरकारी क्रीमरी प्रॉजेक्ट, उदगीर | १,६३,४१० | १,०७,२०० |
| १३. सरकारी दूधपुरवठा योजना, अकोला | ४,३७,८०० | ५,६३,००० |
| १४. सरकारी दूधपुरवठा योजना, अमरावती | २,१७,३६५ | ३,७८,६०० |
| १५. सरकारी दूधपुरवठा योजना, औरंगाबाद | ३,२३,००० | ३,७७,००० |
| १६. सरकारी दूधपुरवठा योजना, रत्नागिरी | ५,५४,६२९ | ४,२८,२०० |
| १७. सरकारी दूधपुरवठा योजना, महाड | ४,५५,४०० | १,२१,५०० |
| १८. सरकारी दूधपुरवठा योजना, कणकवली | ३,९६,८०० | ५,३५,५०० |
| १९. सरकारी दूधपुरवठा योजना, चिपळूण | ४,४७,७७५ | ४,७७,४०० |
| २०. सरकारी दूधपुरवठा योजना, आर्वी | — | ५,४०० |
| | ७९,४३,९६४ | ७७,१३,९०६ |

[हा उतारा 'महाराष्ट्र सरकारच्या सन १९७१–७२ सालाकरिता महत्त्वाच्या सरकारी योजनांची हिशेबपत्रके' ह्या पुस्तिकेतून पान १२ वरून घेतलेला आहे.]

जवळजवळ सर्वच्या सर्व दूधयोजना तोट्यात आहेत. हा तोटा थोडाथोडका नाहीतर सालीना ७७ लाख रुपये आहे. म्हणजे मुंबई-वरली डेअरी पोच जो सध्या १·६० रु. भाव, त्यात हा आणखी ७७ लाख रुपये खर्च वाढतो म्हणून तोटा येतो. त्यामुळे ग्रामीण विभागातील दूध महाग पडते. रोज सरासरी १ लाख

४० हजार लिटर दूध येते असे धरल्यास हा तोटा १ लिटरला १५ पैसे येतो. म्हणजे ग्रामीण दूध योजनेतील मुंबईपोच दूध १ लिटरला १·७५ रु. पडते. सर्व दुधावर सरासरीने हा खर्च विभागला म्हणून १५ पैसे इतका कमी खर्च दिसतो. पण काही योजनांच्या बाबतीत तर तो ०·५७ पैशांपर्यंत जातो. कसे ते पहा. आपण कोकणयोजनांचा विचार करू. वर उल्लेख केलेल्या पुस्तिकेतील उतारे आम्ही देतो

१. रत्नागिरी योजना–ही ता. ८–७–१९६६ ला सुरू झाली.

| | १९६९–७० | ७०–७१ | ७१–७२ |
|---|---|---|---|
| १. ट्रेडींग प्रॉफिट | ९४,४४० | १,००,००० | १,१५,००० |
| २. एकूण खर्च व्याजासह | ५,८०,६९३ | ६,१५,००० | ५,४३,२०० |
| ३. १ वर्षाचा तोटा (२–१) | ४,८६,५५३ | ५,१५,००० | ४,२८,२०० |
| ४. रोजचे सरासरी दूध लीटर्स | १६५७ | २२०० | २६०० |
| ५. १०० लीटर्सचा रोजचा खर्च | ९९·४४ | ७९·४४ | ५७·२३ |

ट्रेडिंग प्रॉफिट ९४,४४० असताना रु. ५८,९०३ वर्षाला खर्च होत आहे. असा खर्च फक्त सरकारी दूधयोजनाच करू शकतात. हा एवढा खर्च होतो तरी कसा, असे कुतूहल निर्माण होणे स्वाभाविक आहे म्हणून एक नमुना म्हणून त्याचा तपशील खाली देत आहे. इतर योजनांवर होणारा खर्च ह्याच नमुन्याचा आहे.

| खर्चाचे नाव | १९६९–७० | ७०–७१ | ७१–७२ |
|---|---|---|---|
| १. एस्टॅब्लिशमेंट चार्जेस (नोकर पगार वगैरे खर्च) | १,६३,३५० | १,६९,५०० | १,८२,७०० |
| २. कंटीन्जन्सीज् (इतर खर्च) | ३,०४९१९ | ३,५७,००० | २,७२,००० |
| ३. पेन्शन | १३,१९८ | १४,००० | १४,००० |
| ४. घसारा | ३३,७३६ | ३३,००० | ३३,००० |
| ५. किरकोळ खर्च | १,५०० | १,५०० | १,५०० |
| ६. व्याज | ६३,९९० | ४०,००० | ४०,००० |
| | ५,८०,६९३ | ६,१५,००० | ५,४३,२०० |

| २. महाड योजना | १९६९–७० | ७०–७१ | ७१–७२ |
|---|---|---|---|
| १. ट्रेडींग प्रॉफिट | १,१५,६६१ | ५२,२०७ | २,३९,००० |
| २. एकूण खर्च रु. | ३,२३,९८२ | ३,३१,२९० | ३,६०,५०० |
| ३. एकूण तोटा | २,०८,३५१ | २,७९,०८३ | १,२१,५०० |
| ४. रोजचे सरासरी दूध लीटर्स | १,३२० | १,९७२ | २,५६० |
| ५. १०० लीटर्सचा एक दिवसाचा खर्च रुपये | ६८·०० | ४७·७० | ७७·८७ |

| ३. कणकवली योजना | १९६९–७० | ७०–७१ | ७१–७२ |
|---|---|---|---|
| १. ट्रेडींग प्रॉफिट (पान ४७ वरून) | ७,१३७ | २५,६०० | ३३,००० |
| २. एकूण खर्च व्याजासह | ४,१४,०६५ | ४,५६,६०० | ८,२४,४०० |
| ३. एक वर्षाचा तोटा | ४,०६,२९८ | ४,३१,००० | ५,३५,५०० |
| ४. सरासरी रोज लीटर्स | १,१७५ | ३,००० | ३,८०० |
| ५. १०० लीटर्सचा १ दिवसाचा खर्च | १०३·०० | ६४·९० | ५९·४५ |

| ४. चिपळूण योजना | १९६९–७० | ७०–७१ | ७१–७२ |
|---|---|---|---|
| १. ट्रेडींग प्रॉफिट | २,४२,२०० | ३,०६,००० | ३,४७ ००० |
| २. एकूण खर्च व्याजासह | ६,७९,६९५ | ७,४०,६०० | ८,२४,४०० |
| ३. एक वर्षाचा तोटा | ४,३७,४९५ | ४,३४,६०० | ४,७७,४०० |
| ४. सरासरी दूध लीटर्स रोज | २३०० | ३००० | ३८०० |
| ५. १०० लीटर्सचा १ दिवसाचा खर्च रु. | ८०·०० | ६४·९० | ५९·४५ |

रत्नागिरी जिल्ह्यातील ह्या चारही शहरांचा ७१–७२ सालातील अपेक्षित खर्च व दुधाचा विचार केला तर काय दिसते ?

| नाव | रोज दूध | खर्च रु. | तोटा रु. |
|---|---|---|---|
| रत्नागिरी | २,६०० | ५,५३,२०० | ४,२८,२०० |
| महाड | २,५६० | ६ ०,५०० | १,२१,५०० |
| कणकवली | २,००० | ५,६८,५०० | ५,३५,५०० |
| चिपळूण | ३,८०० | ८,२४,४०० | ४,७७,४०० |
| | १०,९६० | २३,०६,६०० | १५ ६२,६०० |

१०,९६० लिटरचा वर्षाचा खर्च २३,०६,६०० रु. म्हणजे रोजचा खर्च ६३,२०० रु. होतो. हा एका लिटरचा खर्च ५७॥ पैसे होतो. म्हणजे कोकणातील दूध मुंबईला येऊन १·६०+५७॥ २·१७॥ रु. ना पडते.

हे एवढे मुंबईच्या गिन्हाइकांना महाग पडणारे दूध शेतकऱ्यालाही तोटयात नेते. त्याला फक्त १ लिटरला साधारणपणे १·०२ रु. च मिळतात हे आपण पाहिले. त्याला किफायतशीर भाव मिळत नाही म्हणून उत्पादन वाढत नाही आणि उत्पादन वाढत नाही म्हणून हा मधला खर्च वाढतो हा सर्व खर्च अनुत्पादक खर्च आहे. नोकर, पगार, पेन्शन, घसारा, कंटिन्जन्सीज, किरकोळ खर्च, व्याज अशासारखे खर्च उत्पादनाला प्रेरणा देऊ शकत नाहीत. तेव्हा आहे अशीच परिस्थिती राहिली तर कितीही वर्षे गेली तरी ग्रामीण दूध योजना स्वयंपूर्ण होणे शक्यच नाही. सध्या दुष्काळी परिस्थितीमुळे जो

ग्रामीण गवळ्यांना भाव वाढवून दिला आहे तो सर्व वाढीव खर्चावरच जाणार आहे. मिळणाऱ्या वाढीव पैशापेक्षा खर्चच वाढणार आहेत. ह्या दुष्काळाचा तर फारच मोठा फटका दूध उत्पादनाला बसणार आहे. मुंबईतील दाणा-गवताच्या किमती भरमसाठ वाढत आहेत. त्याचा तक्ता खाली देत आहोत.

| मालाची जात | ऑक्टोबर १९७१ | ऑक्टोबर १९७२ | जानेवारी १९७३ |
|---|---|---|---|
| शेंगदाणा पेंड | ५२५ | ९७० | १३०० |
| सरसू पेंड | ६०० | ९१० | १०९० |
| अळशी पेंड | ७७५ | ८५० | ९५० |
| कपास पेंड | ४८० | ६२० | ७२० |
| तूर चुनी | ८०० | ९६० | १०८० |
| चणा चुनी | ७५० | १०६० | ११८० |
| गवार चुनी | २८० | ६९० | ८६० |
| गवत, १००० किलोंना | १६० | ७०० | ३३० |

मिरच्या कोथिंबिरीचे भाव आटोक्यात ठेवण्यास उत्सुक असलेले उत्साही पुरवठामंत्री ह्या वाढलेल्या भावाबद्दल काहीच करीत नाहीत. उलट भुशाचे नियंत्रण संपूर्णपणे त्यांच्याच अखत्यारीत असतानासुद्धा त्याचे संपूर्ण नियत्रण करून जो भुसा फक्त जनावरांकरिता वापरला जातो त्याचा पुरवठाहि नियंत्रित दराने करू शकत नाहीत. सरकारी अखत्यारीत असलेल्या 'सुग्रास' ह्या खुरकाचेही भाव टनाला जे पूर्वी ५०० रु. होते ते आता ८३० रु. झाले आहेत. ह्या वाढत्या किमतींचा अपरिहार्य परिणाम दूध उत्पादन महाग होण्यावर होतो. त्यातच भर सरकारी अनुत्पादक खर्चाची पडते.

महाराष्ट्रात ही परिस्थिती आहे तर मग गुजरातचे दूध स्वस्त कसे पडते? कारण स्पष्ट आहे. सन १९५२ पासून आनंद दूध योजना सुरू झाली तेव्हापासून त्यांनी सर्व गुजराथमधून दूध गोळा करण्याचा राजकीय हव्यास धरला नाही. तर गुजरातमध्ये जे विभाग दूध उत्पादनाला व पशु संवर्धनाबद्दल प्रसिद्ध होते अशा खेडा व मेहसाणा जिल्ह्यातच दूध उत्पादनावर लक्ष केंद्रित केले. सरकारने फक्त मदतनीसाची भूमिका घेतली आणि सारा व्यवहार सहकारी संस्थेवर सोपवून राजकारण ह्या प्रश्नापासूनच दूर ठेवले. उत्पादन पूर्वीपासूनच होते. त्यालाच चालना देण्यात आली. तर आपल्याकडे जेवढे जिल्हे तेवढ्या दूधयोजना. कोठे पाव लिटरही दूध उत्पादन होत नव्हते तेथे मोठमोठे कारखाने, डेअऱ्या उभ्या करण्यात आल्या. दूध उत्पादनाशी काडीचाही संबंध नसलेले जिल्हा फेडरेशनचे अध्यक्ष लाखावरी रुपयांची

खिरापत वाटू लागले. बहुतेक जिल्हा फेडरेशनस् ही सत्तेची स्थाने होऊन बसली. शास्त्रीय विकासाचा प्रश्न गौण ठरला. 'आमच्या जिल्ह्याला पण योजना हवी' असे राजकारणी मंडळींनी म्हणावे आणि ८०-१०० लिटर दुधाचे कॅन-२ कॅन-दूध घेऊन ५ टनी ट्रक रस्त्यावरून पळू लागावे. त्यातच भर म्हणजे आपले मंत्री उत्साही तर दूध-खाते अति उत्साही! त्यांना एकदम कोकणच्या विकासाची स्वप्ने दिसू लागली. दुधाची संस्कृती नाही तेथे हे भलतेच कलम करण्यात आले. व्हायचा तोच परिणाम दिसत आहे. आज योजना आर्थिक तोटयांच्या भोवऱ्यात गटांगळया खात आहे. गिऱ्हाईकांचे मागल्या दाराने भाव वाढवून हा प्रश्न सुटणार नाही.

एखाद्यावेळी मनात विचार येतो की हल्ली सर्वात स्वस्त दूध आनंदचे पडते. दूध योजनेकडे सध्या जे दूध येते त्याचे भावखालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| आनंद | १·३० रु. लिटर |
| ग्रामीण विभाग | १·७५ रु. लिटर |
| आरे कॉलनी | १·७० रु. लिटर |

तेव्हा आरे कॉलनी विघटनाच्या मार्गावर आहेच. दूध योजना तोटयात जात आहेतच. तर सर्वच जरूर तेवढे दूध आनंदचे घेऊनच दूध योजना चालवून मुंबईच्या गिऱ्हाइकांना स्वस्त दूध-पुरवठा का सुरू करू नये? आरे कॉलनीचे भाडे द्यावे आणि त्यांना दूध मुंबईच्या बाजारात विकायला सांगावे. सर्व जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना दूध विक्रीची मोकळीक द्यावी. त्यांनी हवे तेथे आणि ह्व्या त्या भावाने दूध विकावे. सहकारी संस्थांच्या ज्या शासकीय पातळीवर अडचणी असतील त्या सरकारने दूर कराव्या. त्यांना मदत करावी. नाहीतरी एकात्म भारताबद्दल आपण बोलत असतोच नाही का? तर मग आनंदचे स्वस्त दूध महाराष्ट्राने घ्यावे आणि महाराष्ट्राचा गुजरातच्या मानाने स्वस्त असणारा गूळ गुजरातने घ्यावा. अशी व्यापारी देवाणघेवाण करून प्रांतीय सीमारेषा पुसट नाही का करता येणार? पण हे नुसती दुधापुरतेच करून चालणार नाही. प्रादेशिक भावना पिछाडीला ठेवून राष्ट्रहिताला अग्रस्थान द्यावे लागेल. आजची परिस्थिती हा विचार ग्राह्य मानील असे समजायला आधार नाही. आणि शिवाय दूध-पुरवठ्याचा प्रश्न हा काही फक्त शहरांना दूध पुरवठा करणे एवढयाच करता मर्यादित नाही तर एकूण महाराष्ट्राच्या शेतीविकासाशी निगडीत असल्यामुळे जेथे दुग्ध व्यवसायाचा विकास होणार आहे, तेथे दूध उत्पादनाला प्राधान्य देऊन दूध योजनांची फेर आखणी करावी लागेल.

ह्या तोटयात चालणाऱ्या योजना फायद्यात आणायच्या आहेत ह्या दृष्टीने प्रयत्नशील रहाणे आवश्यक आहे. ग्रामीण विभागातील दूध उत्पादन वाढवून, ते स्वस्त करून, शहरी दूध उत्पादनाला गिऱ्हाईकच उरणार नाही. ही परिस्थिती निर्माण करायला हवी. दुग्धव्यवसाय विकासाची ही नैसर्गिक प्रक्रिया आहे. १९४७ बॉम्बे मिल्क प्लॅन

मध्ये हीच प्रक्रिया गृहीत धरलेली आहे. ही परिस्थिती बदलत नाही तोवर शहरी दूधउत्पादन व ग्रामीण दूध-उत्पादन हे वाद निरर्थक आहेत. परंतु शास्त्रशुद्ध दुग्धव्यवसाय विकासाची गती वाढविण्याऐवजी दूधखाते परदेशातील फुकटात मिळालेली निधूत भुकटी व द्रवरूप लोणी मिसळून कृत्रिम दूधपुरवठा फुगवण्याचे कृत्रिम उपाय योजण्यात फार धोक्याचा मार्ग अंगिकारीत आहे, असा इशारा आम्हाला वेळीच द्यावासा वाटतो.

अन्नधान्याच्या स्वावलंबनावर अलीकडे भारत सरकार भर देताना दिसते. अगदी त्याविरुद्ध कृती होत असून परावलंबित्व हा स्थायीभाव बनण्याचा फार मोठा धोका निर्माण झाला. ही योजना 'ऑपरेशन फ्लड' म्हणून ओळखली जाते. त्याची संपूर्ण ओळख करून घेतल्याशिवाय दूधप्रश्नांचे आकलन अपूर्ण राहिल म्हणून आता ऑपरेशन फ्लड— ●

---

## लोण्याच्या पर्वताकडे पाहून
## आमच्या बुभुक्षित मंडळींच्या
## तोंडाला पाणी सुटले...

---




# मुंबईत दुधाचा महापूर ऑपरेशन फ्लड

पाकिस्तान–बांगला देश युद्धापासून भारत व अमेरिका यांचे संबंध काही ठीक नाहीत. तेव्हापासून अमेरिकेने भारत–मदतीचा हात आखडता घेतला आहे. तेव्हापासून आपल्या पंतप्रधान आर्थिक स्वावलंबनाबद्दल फार निर्धाराने बोलत असतात. अन्नधान्याबद्दल स्वावलंबी व्हायचे अशा घोषणा होत असतात. परंतु इकडे दुधाच्या बाबतीत मात्र कृती अगदी विरुद्ध दिशेने होत आहे. ऑपरेशन फ्लड नावाने ओळखली जाणारी एक दुधाची भुकटी व द्रवरूप लोणी (बटर ऑईल) मदत म्हणून मिळविण्याची योजना डॉ. कुरिअन साहेबांनी हिंदुस्थान सरकारच्या

गळी उतरविली आहे. आरे कॉलनीचा जसा पूर्वी खुरोडी साहेब डांगोरा पिटीत असत, त्यापेक्षा थोड्या सरस प्रचारकी थाटात, कुरअन साहेबांनी ह्या ऑपरेशन फ्लडची तारीफ व तरफदारी चालविली आहे आणि ते समजण्यासारखेही आहे. कारण तेच तिचे जन्मदाते आहेत.

'नॅशनल डेअरी डेव्हलमेंट बोर्ड' म्हणून केंद्र सरकारने ८–१० अधिकाऱ्यांचे एक मंडळ नेमले आहे. त्याचे अध्यक्ष आहेत, आनंद डेअरीचे जनरल मॅनेजर डॉ. व्ही. कुरिअन. ते मोठे उत्साही गृहस्थ आहेत. दूध प्रक्रियेला जरूर असणारी यंत्रसामुग्री उभी करण्याच्या कामात ते वाकबगार आहेत अशी त्यांची ख्याती आहे. आनंद डेअरी उभी करण्यात व तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. पण दूध उत्पादनाबद्दल त्यांना फारसे काही समजत नाही असे ते स्वतःच कबूल करतात. आनंदच्या डेअरीकरिता यंत्रसामग्रीची बरीच आयात करावी लागते. दुधाची पावडर ते आनंद डेअरीत तयार करीत असले तरी त्यांना परदेशी दुधाची पावडरही बरीच लागते. अशा कामात मध्य सरकारमधील वरच्या अधिकाऱ्यांशी त्यांचे घनिष्टसंबंध वृद्धिगत झाले तर आश्चर्य नाही. मध्य सरकारने, अध्यक्ष म्हणून ज्या नॅशनल डेअरी डेव्हलपमेंट बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड केली त्या बोर्डाचा दूध उत्पादनाशी काही संबंध नाही. जो काही आहे तो वाटपाशी व दूध प्रक्रियेला लागणाऱ्या यंत्रसामुग्रीशी व ज्ञानाशी. बोर्डाच्या उद्देशावरून हे स्पष्ट होते.

श्री. कुरिअन साहेबांची एवढी तपशिलात ओळख करून देण्याचे कारण असे की, ह्या साहेबांनीच 'ऑपरेशन फ्लड' ही योजना आणली आहे. तिचे फार दूरगामी अनिष्ट परिणाम आपल्या ग्रामीण दूध योजनांवर होणार आहेत. पी. एल्.-४८० योजनेने आपले शेती उत्पादन २० वर्षांनी मागे नेले. ऑपरेशन फ्लड आपला दुग्धव्यवसाय व पशुसंवर्धन व त्यामुळेच शेती विकास उध्वस्त करणार आहे.

गेल्या ४–५ वर्षांत 'युरोपियन इकानॉमिक कम्युनिटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रांकडे दूध आणि तज्जन्य पदार्थांचे बेसूमार उत्पन्न वाढले. कारण असे समजते की युरोपियन राष्ट्रांच्या व्यापाराच्या नव्या धोरणामुळे दुधाचा जो भाव नक्की करण्यात आला तो उत्पादकांना फायद्याचा होता. त्यांनी उत्पादनाला चालना दिली. गरजेपेक्षा जास्त उत्पादन झाले. लोण्याचे साठे पडून राहू लागले. लोणी साठविण्यास त्यांना जागा पुरेनाशी झाली. ह्या साठ्यांचे काय करावयाचे ही एक मोठी समस्या ह्या देशासमोर उभी राहिली. त्याचे फार मार्मिक वर्णन 'टाईम्स ऑफ इंडिया'ने आपल्या ता. १०–१०–१९६९ च्या अग्रलेखात केले आहे ते येथे देण्याचा मोह टाळता येत नाही.

**Butter Not Guns**

Man does not live on butter

alone. But there exists the distinct possibility of a half dozen seemingly stable European Governments talling as a result of an excess of it. The idea of a Government tumbliny down the slippery slopes of a butter mountain is bit to make a hungry chuckle, but the threat is real.

ह्यात वर्णन केल्याप्रमाणे ह्या लोण्याच्या पर्वताच्या निसरड्या उतारा-कडे पाहून आपल्या बुभुक्षित मंडळींच्या तोंडाला पाणी सुटले आणि त्यांनी केंद्र सरकारकडून 'देणगी' मिळविण्याची परवानगी मिळवली. अन्नखात्याने डॉ. कुरिअन यांना 'वर्ल्ड फूड प्रोग्रॅम'कडे याचना करण्यासाठी रोमला पाठवले आणि हे बहाद्दर आपला दौरा यशस्वी करून आले, त्याचा फलितार्थ असा–

१,२६,००० टन दुधाची भुकटी, एक टनास रु. १७००/– प्रमाणे २१·४२ कोटी रुपये किंमतीची व १ टनास रु. ३२३४/– प्रमाणे रु. १३·६८ कोटी रुपयांच्या किंमतीचे ४२,००० टन बटर ऑईल किंवा तूप मिळून एकूण ३५·१० कोटी रुपयांची भेट किंवा देणगी म्हणून युरोपियन राष्ट्रांनी भारताला 'वर्ल्ड फूड प्रोग्रॅम'मार्फत द्यायचे कबूल केले.

ही पावडर व लोणी यांचे मिश्रण तयार करून येथे 'दूध' तयार करा-वयाचे. त्याकरिता जरूर ती यंत्रसामग्री आयात करावयाची व बसवावयाची. मुंबई, मद्रास, दिल्ली व कलकत्ता ह्या चार मोठ्या शहरात हे दूध विकावयाचे. सध्या ज्या भावात दूध योजना दूध खरेदी करतात त्याच भावाने योजनांनी ही पावडर व दूध खरेदी करावयाचे. वेगवेगळ्या चरबीच्या प्रमाणाचे दूध तयार करून, दुधातील घृतांश कमी करून वेगवेगळ्या दराने गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांना दूध उपलब्ध करून द्यायचे. हल्ली जो खऱ्या दुधाचा भाव १·७०रु.लिटरला आहे,त्याच भावाने त्या दर्जाच्या घृतांशाच्या दुधाचा राहील असे समजते. ह्या व्यापारातून सुमारे ६५ कोटी रुपये नफा होईल असा अंदाज आहे. तो नफा व मूळचे ३५ कोटी मिळून १०० कोटी रुपये इतका दूध-धंद्याच्या विकासासाठी एक फंड तयार करायचा.

थोडक्यात अशी ही योजना आहे. हे जे १०० कोटी रुपये नफ्याचे मिळणार आहेत हे फार मोठे आकर्षण योजना-कारांना आहे.

ह्या योजनेचे उद्दिष्टच कोणते ? तर असे सांगण्यात आले आहे की १ : शहरातील गोठेवाले दुधात फार पाणी घालतात आणि दूध विकतात, त्यामुळे ग्रामीण दूध योजनांना त्यांच्याशी स्पर्धा करता येत नाही. २ : सरकारी दूध-योजना एकूण गरजेपैकी ३०–४० टक्केच पुरवठा करीत असल्यामुळ त्यांना दुधाच्या भावाबाबत स्थैर्य निर्माण करता येत नाही. ३ : शहरां-तील गोठेवाले जातलग जनावरे खरेदी करतात आणि शहरात आणतात. येथे वासरे पोसायला परवडत नाहीत म्हणून

ती ते मारतात आणि म्हशी पाडश्या झाल्या की कसायांना विकतात. त्यामुळे देशातील चांगल्या पैदाशीच्या जनावरांना देश मुकतो.

म्हणून पावडरीच्या दुधाचा ह्या शहरांतून महापूर निर्माण करावयाचा. दूध गोठेवाल्यांना ह्या दुधाशी स्पर्धा करणे परवडेनासे होईल आणि ते आपल्या म्हशी बाहेरगावी नेतील. त्यांना पुनर्वसनासाठी एका म्हशीमागे २००० रु. प्रमाणे कर्ज देण्यासाठी २० कोटी रुपये ह्या नफ्यापैकी द्यायचे आहेत. ही जनावरे ग्रामीण विभागात गेली की, गोठेवाले वासरे पोसू लागतील आणि पाडशा म्हशीही पोसतील असा अंदाज करण्यात आला आहे.

एकदा सर्व गोठेवाले बाहेरगावी गेले की ३ वर्षांनंतर वासरांची वाढ होईल. त्याचे बरेच दूध उत्पादन मिळेल. ग्रामीण दूध योजना विकसित होईल. कारण कित्येक कोटी रुपयांची मशिनरी बसविण्यात येईल. गुरांच्या खाद्यमिश्रणाचे कारखाने उभारण्यात येतील आणि ५ वर्षांत दुधाचे पाट खेड्यांतून शहरांकडे वाहू लागतील असा बराच कल्पनाविलास ह्या योजनेत आहे.

ह्या योजनेचा मूलाधार म्हणून जो धरण्यात आला आहे तो साफ चुकीचा आहे. एवढी दूरगामी परिणाम घडविणारी योजना एवढ्या कच्च्या पायावर कशी उभी करण्यात येते, याचे आश्चर्य वाटते आणि म्हणून ही योजना सद्हेतूने प्रेरित होऊन केलेली नसावी अशी शंका येऊ लागते किंवा प्रश्नाच्या सम्यक ज्ञानाच्या अभावातून तरी निर्माण झाली असावी असे वाटते.

मुंबई शहरापुरते बोलायचे तर आरे कॉलनीत सुमारे १५,००० म्हशी आहेत आणि बाहेर सुमारे ६०,००० म्हशी आहेत. सध्या म्हशींच्या किमती रु. २००० ते ३००० रु. आहेत. ह्या म्हशी पाडश्या झाल्या की, गुजरात किंवा महाराष्ट्रात इतरत्र पोसणीसाठी पाठवितात. ६८-६९ साली मुंबईहून ५६,००० म्हशी बाहेरगावी पोसणीसाठी गेल्याची लायसेन्सिंग खात्यात नोंद आहे. कारण त्या खात्याकडून परवाना घेतल्याशिवाय म्हशी बाहेर पाठवता येत नाहीत. त्यामुळे उत्तम जनावरे परवडत नाहीत म्हणून कसायांना विकून कापली जातात, हे विधान निराधार आहे. उलट कसाई म्हशींची किंमत २०० ते ४०० रु. देतो. त्यापेक्षा ६–७ महिन्यांकरिता ४०० ते ५०० रु. खर्च करून भाकड म्हशी पोसणे परवडते. म्हणून पाडशा (भाकड्या) म्हशी पोसल्या जातात.

मुंबईमध्ये 'वासरे' मरतात व पोसली जात नाहीत हे खरे आहे. परंतु म्हशी ग्रामीण विभागात नेल्याबरोबर वासरे पोसणे कसे परवडू लागेल ते समजत नाही. आरे कॉलनीत किंवा दापचरी येथे सरकारी योजनेमार्फत जी वासरे पोसली जातात त्यांचा रु १५०० ते २००० रु. खर्च येतोच. पोसणीचा हा खर्च अन्नधान्या व वैरणीच्या किमतीशी निगडित आहे. जोपर्यंत धान्याच्या

किंमतीमध्ये स्थैर्य निर्माण होत नाही तोवर वासरे ग्रामीण विभागामध्ये गेली म्हणून परवडू लागतील हे संभवत नाही. तेव्हा शहरातून गोठेवाल्याला धंदा करणे परवडत नाहीसे झाल्यामुळे हुसकावून लावण्याचे पुण्य योजनेला पदरी पाडता येईल. परंतु त्यामुळे दूध उत्पादन वाढणार नाही. उलट हे धंदे बंद झाल्यामुळे हे दूध उत्पादन कमी होण्याचीच धास्ती आहे.

हे गोठेवाले ग्रामीण विभागात वसाहत करून योजनेला दूध देऊ लागतील हे गृहीतकृत्यही वास्तविक परिस्थितीच्या अज्ञानातून निघाले आहे. कारण आरे कॉलनीच्या रुपाने अशा योजनेचा प्रयोग सध्या सुरू आहे. आणि तो अत्यंत असमाधानकारक आहे हे सर्वश्रुतच आहे. ह्या बाबतीत सर्वांचेच असमाधान आहे. दूधउत्पादन वाढत नाही. पशुसंवर्धनाच्या दृष्टीनेही सुधारणा होत नाहीत. म्हणून दूध स्वस्त होत नाही. म्हणून जनता नाराज आहे. तर आरे कॉलनीतील गवळ्यांना दुधाचा भाव त्यांच्या उत्पादन खर्चाच्या मानाने परवडणारा मिळत नाही म्हणून ते गवळी हैराण आहेत. आरे कॉलनीतील बहुसंख्य गवळी कर्जात बुडालेले आहेत. कोणत्याक्षणी त्यांच्या धंद्याचे काय होईल ह्या बद्दल शाश्वती नाही. आम्हाला त्यांची तरफदारी करण्याची गरज नाही. परंतु हा जो सरकारबाबतचा अनुभव आहे तो जमेस धरल्यास मुंबईतील गवळी पुनर्वसन करून सरकारी दूध योजनांना दूध देण्याचे धाडस करतील असे वाटत नाही.

शहरातील गवळी दुधात पाणी घालतात म्हणून सरकारी दूधयोजना त्यांच्याजवळ स्पर्धा करू शकत नाही, हे खरे नाही. उलट दूधयोजना स्टँडर्डाइझ दुधाचा पुरवठा करू शकतात आणि ह्या चांगल्या दर्जाच्या दुधपुरवठ्यामुळे दुधाच्या किंमती स्थिर करण्यात दूधयोजना चांगल्याच यशस्वी झालेल्या आहेत. तेव्हा ह्या संबंधीचा दावाही फोल आहे. ज्या हेतूंसाठी म्हणून ही योजना आखण्यात आली तेच बिनबुडाचे असल्यामुळे ही योजना महाराष्ट्र सरकारने का राबवावी हे समजू शकत नाही.

ग्रामीण दूध योजनांची परवड कशी चालू आहे त्याची माहिती मागे आलीच आहे. त्यासंबंधीचे पडसाद महाराष्ट्र विधान सभेतही उमटले आहेत. 'दुधाची जी स्कीम आहे त्याबद्दल मतभेद आहेत. परंतु तरीही मार्जिन देऊ शकतो. परंतु ह्यासंबंधी जो बेलगाम कारभार चालला आहे त्यासंबंधी काय करणार आहात ते या सभागृहामध्ये निश्चितपणे जाहीर झाले पाहिजे. असे उद्गार श्री. त्र्यं. सी. कारखानीस, आमदार, कोल्हापूर यांनी कृषि सहकार विभागाच्या अनुदान मागण्यावरील १३-७-७२ च्या आपल्या भाषणात काढले आहेत (महाराष्ट्र विधान सभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदेत पान १८७१) त्याच पुस्तिकेच्या पान १८७९ वर श्री. दि. वि. पुरोहित यांचे भाषण आहे त्यातील हा उतारा 'दुध फेडरेशनच्या बाबतीत तर जी परिस्थिती

आहे त्याबद्दल काही विचार करू नका. महाडला जे फेडरेशन आहे त्याला दूध देणारे लोक कंटाळले. त्यांनी असा पायंडा पाडला आहे की, कोणत्याही सोसायटीने दूध दिले तरी आठवड्यातून दोन दिवस ते नासल्याचे सांगायचे, त्याचे लोणी काढायचे व आपसात वाटून घ्यायचे. दूध उत्पादकाने वार्षिक सरासरी काढली तर ६० पैसे लिटर असा दुधाचा दर पडतो. तेव्हा माझी अशी सूचना आहे की सरकारने फेडरेशनमार्फत दूध खरेदी न करता डायरेक्ट खरेदी करावे...तुम्ही मुंबई शहरात हे दूध १ रु. ७० पैसे ह्या दराने विकता आणि एक लिटरवर एक रुपया खर्च लावता. हा तुमचा व्यवहार म्हणायचा, शेतकऱ्याच्या फायद्याचा धंदा म्हणायचा, की सरकारचा फायद्याचा धंदा म्हणायचा; हाच आमच्यासमोर प्रश्न आहे. आज उत्पादक इतके नाराज झालेले आहेत की, त्याचे वर्णन करणे कठीण आहे. तुम्ही सांगता त्याला जोडधंदा दिला परंतु उत्पादकाला जोपर्यंत योग्य भाव मिळत नाही तोपर्यंत हा जोडधंदा त्याला फायद्याचा होऊ शकत नाही. या भावाने दुधाचा धंदा करणे त्याला परवडत नाही.'

वरील उतारा विरोधी पक्षाच्या आमदारांच्या भाषणातील आहे; परंतु काँग्रेसचे माजी खासदार श्री. सोनू बसवंत शहापूर, यांच्या पत्रकार परिषदेचा वृत्तांत ता. ४–२–७३ च्या नवाकाळात आहे. त्यात ते म्हणतात, 'सरकार दुधाचा सुकाळ असला की दूध उत्पादकाला लिटरला ९५ पैसे भाव देते आणि दूध तुटवड्याचा काळ असला की एक रुपया चाळीस पैसे भाव देते. हे भाव उत्पादकाला न परवडणारे असे आहेत. कारण जनावरे, चारा व इतर वस्तूंच्या किंमती येत्या १० वर्षांत दुप्पट झालेल्या आहेत.'

ऑपरेशन फ्लडमुळे ही जी शेतकऱ्यांची दूधयोजनांमुळे कर्जबाजारी होण्याची परिस्थिती आहे ती बदलणार आहे काय? मुळीच नाही. कारण—

नॅशनल डेअरी डेव्हलमेंट बोर्डाऐवजी आता इंडियन डेअरी कॉर्पोरेशन ही कंपनी ता. १३–२–१९७० रोजी ऑपरेशन प्लडची कार्यवाही करण्यासाठी निर्माण करण्यात आली आहे. त्या कंपनीमार्फत ऑपरेशन प्लडची कार्यवाही व्हायची आहे. एक रीतसर करार ता. १६–७–१९६८ रोजी भारत सरकार आणि युनायटेड नेशन्स, एफएओवर्ल्ड फूड प्रोग्रॅम यांच्या दरम्यान झालेला आहे. (W.F.P. प्रोजेक्ट नं. ६१८) हा त्याचा नंबर आहे. त्याकरिता एक अधिकृत प्लॅन तयार झालेला आहे. त्यात पान ११ वर ह्या योजनेतून जे ९५·४० कोटी रुपये उत्पन्न होणार आहेत त्याची वाटणी कशी करायची ते दिले आहे.

प्रत्येक शहराने भुकटी व बटर ऑईल वापरून रोज विक्रीसाठी दूध किती तयार करावयाचे त्याचे मुंबईपुरते आकडे खालील प्रमाणे—

| सन | रोज |
|---|---|
| १९७०–७१ | ९०,००० लिटर्स |

| सन | रोज |
|---|---|
| १९७१–७२ | २,४०,००० ,, |
| १९७२–७३ | २,९०,००० ,, |
| १९७३–७४ | २,२५,००० ,, |
| १९७४–७५ | १,२५,००० ,, |

ह्या बनावट दुधात दर लिटरमध्ये ३० ग्रॅम बटर ऑइल आणि ९० ग्रॅम दुधाची भुकटी मिसळावी याचा अर्थ ३% फॅट व ९ टक्के सालिड्स नॉट फॅट.

ह्या प्रमाणे ह्या बनावटी दुधाचा वापर होत असतानाच प्रत्येक शहराने आपला ग्रामीण दूधपुरवठा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करायचे असून मुंबई शहरापुरता खालीलप्रमाणे दररोज किती लिटर्स दूध जमवावे याचा कार्यक्रम आखून दिला आहे तो असा–

| | |
|---|---|
| १९७०–७१ | ५,१५,००० लिटर्स |
| ७१–७२ | ५,३०,००० ,, |
| ७२–७३ | ६,३,०००० ,, |
| ७३–७४ | ७,७५,००० ,, |
| ७४–७५ | ८,७५,००० ,, |

येणेप्रमाणे प्रतिवर्षी बनावटी दूध वापरीत असतानाच ग्रामीण दूधपुरवठा वाढत जाणार आहे असे या योजनेत गृहीत धरलेले आहे आणि त्यानुसार यंत्रसामुग्रीची वाढ, डेअरी इमारतीची निर्मिती वगैरे खर्चाची तरतूद जे नफ्याचे म्हणून ९५,४०,००००० रु. निर्माण होणार आहेत त्यातून वाटणी केलेली आहे. ती पृष्ठ ५९ वर दिली आहे.

यापेक्षा श्रेष्ठ दर्जाचा स्वप्नाळू शेख महमदी कल्पनाविलास दुसरीकडे पहायला मिळेल काय ? ही जी पैशाची मेरात करण्यात येणार आहे त्यावरून नुसती नजर फिरविली तरी हे लक्षात येईल की ९५ कोटी पैकी फक्त ४ कोटी रुपयेच फक्त जनावरांची पैदास सुधारण्यासाठी आहेत. बाकीची सर्व रक्कम येनकेन प्रकारेण यंत्रसामुग्री खरेदी करणे, इमारती, मोटारी वगैरे अनुत्पादक खर्चावरच होणार आहेत. ही योजनासुद्धा वाटपावरच भर देते. दूध उत्पादन ह्या सर्व चित्रात कोठेच दिसत नाही. तरीसुद्धा प्रतिवर्षी लाख दीड लाख लिटर ग्रामीण दूधपुरवठा वाढेल हे गृहीत धरलेले आहेच.

महाराष्ट्रात ही योजना सुरू होऊन आता जवळ जवळ तीन वर्षे पूर्ण झाली. उद्दिष्टे किती पूर्ण झाली ? १५।८।७० पासून प्रमाणित दूध विक्रीला सुरुवात झाली. ही विक्री १५।१०।७१ पर्यंत चालली. ती विक्री ७१,९६,४४१ लिटर १५ महिन्यातील आहे. म्हणजे रोजची सरासरी विक्री १६,००० लिटरची येते. पहिल्या वर्षातील उद्दिष्टच होते रोजचे ९०,००० लिटरचे व दुसऱ्या वर्षाचे २,४०,००० लिटरचे. अंदाज आणि वस्तुस्थिती ह्याची विदारक तफावत सरकारी योजनेच्या अत्युच्च कार्यक्षमतेची ग्वाही आहे !

ग्रामीण दूधउत्पादन वाढीबद्दल काय प्रकाश पडला आहे तोही पहा. दरवर्षीचे सरासरी दूध सकलनाचे आकडे मागील मजकुरात दिलेच आहेत. त्यात ७०–७१ साली दररोज सरासरी १,३७,८६७ लिटर दूध तर ७१–७२ साली १,३९,८०८ लिटर दूध संकलित केल्याचे दिसते. उद्दिष्ट आहे ७०–७१ करिता

| कशावर खर्च व्हावयाचा त्याची माहिती | कार्यक्रमाचे वर्ष १ ले | २ रे | ३ रे | ४ थे | ५ वे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. सांप्रत डेअरींची वाढ | १६,६०,००० | २५,००,००० | – | – | – | १,९१,००,००० |
| २. नवी यंत्रसामुग्री | १,७५,००,००० | ५,२५,००० | ५,२५,००,००० | १७,५०,००० | – | ४,००,००,००० |
| ३. दूरवरच्या दूध पुरवठ्याची सोय | – | – | १०,५०,००,००० | १,०५,००,००० | १,००,७०,००० | ३,१७,००,००० |
| ४. दूधसंकलन व थंड करणे | ३०,४०,००० | १,०९,००,००० | २,२०,००,००० | २,१८,००,००० | ४७,००,००० | ६,२८,००,००० |
| ५. जादा यंत्रसामुग्री | ८३,००,००० | २,२२,००,००० | ५,३७,००,००० | ५,८८,००,००० | ४०,००,००० | १४,७०,००,००० |
| ६. शहराबाहेर तबेले हलविणे | १,४०,००,००० | ३,५०,००,००० | ३,५०,००,००० | ३,५०,००,००० | ३,५०,००,००० | १५,४०,००,००० |
| ७. दूध उत्पादन वाढविणे | १,०५,००,००० | ६,४३,००,००० | ६,९०,००,००० | ६,७७,००,००० | ७,०८,००,००० | २८,५०,००,००० |
| ८. सुधारित जनावरांचा विकास | – | – | ९९,००,००० | १,४७,००,००० | १,५४,००,००० | ४,००,००,००० |
| ९. ग्रामीण दूधसंकलन संघटना | १६,००,००० | ३९,००,००० | ४७,००,००० | ४८,००,००० | ३०,००,००० | १,८०,००,००० |
| १०. नियोजन कार्यवाही व प्रशिक्षण | १७,००,००० | ६२,००,००० | १,०८,००,००० | १,२१,००,००० | ५०,००,००० | ३,५८,००,००० |
| ११. किरकोळ-भराई-उतराई | ४५,००,००० | ९५,००,००० | २०,००,००० | २०,००,००० | २६ ००,००० | २,०६,००,००० |
| एकूण | ७,८१,००,००० | २,०७,००,०००० | २७,०८,००,००० | २४,६९,००,००० | १५,१३,००,००० | ९५,४०,००,००० |

५,१५,००० लिटर तर ७१–७२ करिता ५,३०,००० लिटर दुधाचे. ह्या तफावतीवर आणखी काही टिपणीची जरूरी नसावी.

ह्या योजनेखाली पाच वर्षांत महाराष्ट्राला सतराकोटी पंचवीस लाख रुपये मिळणार आहेत. आणि त्याची वाटणी खालीलप्रमाणे अपेक्षित आहे.

| | कोटी रुपये |
|---|---|
| १ : आरे व वरळी डेअरी यंत्रसामुग्रीची वाढ | ०·८२ |
| २ : कुर्ला डेअरी रोज ४ लाख लिटर हाताळण्यासाठी | ४·०० |
| ३ : दूधसंकलन व दूध थंड करणे | ०·९७ |
| ४ : पूरक व्यवस्था व यंत्रसामुग्री | १·६० |
| ५ : तबेले हलविणे | ६·९३ |
| ६ : तांत्रिक मदत | २·९३ |
| एणूण | १७·२५ |

आता हा जो खर्च आहे तो बहुतेक सर्व दूधवाटप व्यवस्थेवर होणार आहे ह दिसून येईल. आता हे जे वर खर्चासंबंधी आकडे दिले आहेत तो कोठे खर्च होणार आहे व अंदाज खालीलप्रमाणे आहे.

आरे, वरळी व कुर्ला डेअरीची यंत्रसामग्री बसविली की रोज ११ लाखापासून १३ लाख लिटरपर्यंत दूध हाताळता येईल. प्रश्न हे दूध कोठून येणार इतकाच आहे. दुसऱ्या योजना अशा—

१ : मिरजला पूरक दूधपुरवठा केंद्र होणार आहे.

२ : धुळे येथे यंत्रसामग्रीत वाढ करून रोज १,२०,००० लिटर दुधावर नेणे.

३. जळगाव येथे पूरक डेअरी बांधणे व यंत्रसामग्री उभी करणे.

४ : चाळीसगाव पूरक डेअरी बांधणे व यंत्रसामग्री उभी करणे.

५ : दूध थंड करण्यासाठी यंत्रसामग्रीकरिता ६ केंद्रे उभारणे. साक्री, शहादा, शिरपूर, चोपडा, नांदगाव व मालेगाव ह्यावर अंदाजे ७२ लाख रुपये खर्च होणार आहेत.

आजच बऱ्याच ठिकणची यंत्रसामग्री पूर्णपणे वापरली जात नाही म्हणून पडून आहे आणि तरीही यंत्रसामग्रीवरच पैसा खर्च करण्याचा हव्यास सुरू आहे.

आरे येथील डेअरीवर २ कोटी रुपये खर्च झाले आहेत आणि तेथे रोजचे २ लाख लिटर दूध हाताळण्याची क्षमता आहे. वरळीला ३ कोटी रुपये खर्च झाले आहेत. आणखी होणार आहेत. दूध हाताळण्याची क्षमता ५ लाख लिटरपर्यंत जाणार आहे. आज ४ लाख लिटरची आहेच. तेव्हा ह्या दोन डेअरीकरिता हा पुरेसा दूधपुरवठा

आज उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत परदेशातून यंत्रसामुग्री येईल. काही अधिकाऱ्यांच्या परदेशच्या वाऱ्या होतील. दूधउत्पादन वाढण्याची काहीच सोय नाही. दूधउत्पादक आहेत तसेच कोरडे रहातील आणि दुधाकरिता सदैव परदेशी पावडर व बटर ऑईलसाठी अवलंबून रहावे लागेल.


आपल्याला खरंच स्वावलंबी व्हायचे आहे काय ? आयते वापरायला मदतीचे मिळणारे पैसे चलन फुगवटा करतात आणि देशाला कर्जबाजारीपणा वाढवतात. त्यामुळे आपल्या स्वातंत्र्याचा संकोच सुरू होतो. पी. एल्. ४८० खाली अमेरिका आली. सहयोग, सहकार्य ह्या नावाखाली रशिया आला आणि आता भुकटी व तुपाच्या नावाखाली युरोपीय राष्ट्रे येत आहेत. ही परिस्थिती सुधारण्यास योग्यवेळीच जर खबरदारी घेतली नाहीतर दूधपावडरच्या व वाटोळ्या द्रवरूप लोण्याच्या महापुरात आपली सर्व शेतीउत्पादन व्यवस्था वाहून धुवून जाईल आणि मुंबईकरांच्या नशिबी पावडरचे दूध कायमचे येऊन बसेल.

●

---

# गाय विरुद्ध म्हैस हा वाद सध्या तरी अगदी निरर्थक आहे....

---



# गाय की म्हैस ?

आतापर्यंत दूधखात्याचे विविध कार्यक्रम, ते कसे पार पाडले जात आहेत, ते गैरहिशेबी कसे आहेत, मृगजळामागे धाव घेणारे कसे आहेत, आतबट्ट्याचे कसे आहेत, अवाढव्य खर्चिक कसे आहेत, मूळ हेतूंना मारक कसे आहेत, नियोजनशून्य कसे आहेत आणि ह्या दरिद्री देशाची गरिबी दूर करण्याऐवजी, उधळपट्टी करून गरिबी वाढविणारे कसे आहेत ते आपण पाहिले. आता ह्या दूधधंद्यासंबंधी व प्रश्नासंबंधी काही फार मोठे गैरसमज आहेत ते आपण पाहू या.

गाय विरुद्ध म्हैस : आपल्याकडे मूळ प्रश्न डावलण्याची कला वृद्धिगत झाली आहे. दूधयोजनेतील अपयश लपविण्यासाठी खोटे वाद उपस्थित करण्यात येतात. त्यापैकीच एक वाद गाय विरुद्ध

म्हैस हा आहे. अलीकडे दूधयोजनेचे अधिकारी गाईबद्दल मोठ्या भक्ति-भावाने बोलत असतात. 'दूधयोजना सुधारायची तर गायींचे दूधच ती सुधारणा घडवून आणील' असे बोलले जाते. 'मला जर कोणी सर्वाधिकार दिले तर ताबडतोब मी अरबी समुद्रात सर्व म्हशी बुडवून टाकीन' असे शेरे मारले जातात. जणू काही गेली २० वर्षे ह्या सरकारी अधिकाऱ्यांना कोणी गाईचा विकास करण्यात अडवून धरले होते! जो उठतो तो आता गोपालन, गाईंचा विकास आणि संकरपैदास ह्याबद्दल बोलतो आहे. जणू 'तिळा उघड' इतका 'संकर पैदास' हा परवलीचा शब्द दूधउत्पादनाची काळाच्या पोटात दडवलेली दौलत खुली करायला उपयोगी पडणार आहे असा त्याचा वापर सुरू आहे. माझ्या दृष्टीने जोवर एकूण दूधउत्पादनाची पातळी फारच खाली आहे, आपल्याला दुधाची गरज आहे तोवर आपले सर्व लक्ष अधिक दूध-उत्पादनावर केंद्रित करायला हवे. गाय सुधारण्याचे शास्त्रशुद्ध प्रयत्न सुरू ठेवायलाच हवेत. पण ते जसे आज आरे येथे 'जय प्रकाश' व 'जवाहर' यांच्या सहाय्याने चालले आहेत किंवा पालघर किंवा दापचरी येथे चालले आहेत तसे चालणार नाहीत. क्रॉसब्रिडिंग कार्यक्रमात 'सिद्ध वळू' किंवा 'प्रूव्हन बुल' हा अगदी 'मस्ट' आहे. तोच असला पाहिजे. त्याबाबत बिलकुल तडजोड चालणार नाही. उरळीकांचन येथे सध्या जो 'भारतीय कृषिउद्योग प्रतिष्ठान'चा ह्या क्षेत्रात प्रयोग आहे त्यात अशी तडजोड नाही म्हणून त्या प्रयोगाचे फार महत्त्व आहे. शास्त्र तडजोड जाणीत नाही. तुम्ही तडजोड केलीत तर त्याचे परिणाम भोगावे लागतात आणि शास्त्रशुद्ध पैदाशबाबत तर निश्चित स्वरूपात परिणाम किंवा इष्ट फळ दिसायला बरीच वर्षे लागतात. म्हणून जास्त काळजी घेण्याची गरज आहे आणि सरकारी योजनेनंतर ही काळजी फारच घेतली पाहिजे. कारण त्या योजना सर्व लोकांचा, ह्या देशाचा, गरीब जनतेचा पैसा वापरीत असतात. त्यामुळे त्यांची जबाबदारी फारच वाढते. पण दूधखात्याचा जो एकूण काही व्यवहार आहे, त्यात ही सुबुद्ध जाणीव मुळीच आढळत नाही. कसे ते पहाच.

'प्रूव्हन बुल' किंवा 'सिद्ध वळू' कोणाला म्हणायचे ह्याबद्दल निश्चित अशा कसोट्या ठरलेल्या आहेत. चांगल्या उत्पादनाचे अनुवंशिक गुण जे एखाद्या वळूला त्याची आई, आजी किंवा बाप, आजोबा यांच्यापासून मिळालेले असतात ते चांगले गुणधर्म त्या वळूत त्याच्या प्रजेत म्हणजे मुलीमध्ये, त्याच्यापासून जन्माला येणाऱ्या कालवडीत उतरविण्याची क्षमता आहे किंवा नाही याची प्रत्यक्ष परीक्षा घेतल्यावर, त्या परीक्षेला उतरतो त्याला सिद्ध वळू म्हणतात. ज्याला 'सिद्ध वळू' म्हणून वापरायचा मानस असेल त्याची त्याच्या लेकीतील दूधउत्पादनक्षमता व दुग्ध-व्यवसायाकरिता आवश्यक असलेल्या

इतर गुणांची चाचणी घेऊन नंतरच तो वळू प्रजोत्पादनासाठी वापरण्यास लायक आहे किंवा नाही ते ठरविले जाते. असाच वळू संकरपैदाशीसाठी वापरला पाहिजे असे दूधशास्त्र सांगते.

क्षीणरोग प्रतिकार शक्ती : तसेच ह्या क्रॉसब्रिडिंग कार्यक्रमात तोंडचे व पायचे ह्या संसर्गजन्य रोगांचा फार मोठ्या प्रमाणात धोका असतो. सन १९६० सालापासून आरे कॉलनीत क्रॉसब्रिडिंगचा प्रयोग चालू असूनही दरवर्षी 'नेमेची येतो मग पावसाळा' ह्या धर्तीवर वर्षांतून कधी एकदा तर कधी दोनदा हा रोग धुमाकूळ घालीत असतो. जागृती डेअरी म्हणून अगदी नव्यानेच, संकरीत गायी बंगलोर येथून आणून आरे कॉलनीत एक प्रयोग सुरू झाला आहे. गायींना सर्व तऱ्हेची इंजेक्शने, इनॉक्युलेन्स वगैरे देऊनही सर्वच्या सर्व गायी ह्या रोगाच्या साथीला बळी पडल्या आणि हे दूध-उत्पादन एक चतुर्थांशावर आले. हा रोग येतो म्हणून हे प्रयोग करायचे नाहीत असे आमचे म्हणणे नाही. परंतु धोके लक्षात घेऊन पाऊल टाकावे हे बरे. अजूनही म्हणावी तशी संकरीत गायींची दूधवाढ प्रत्ययास येत नाही. दूधवाढ ही शक्यता आहे. शरीरशास्त्राच्या, आधाराने म्हशीपेक्षा गायीमध्ये खाल्लेल्या अन्नाचे दुधात रूपांतर करण्याची शक्ती निश्चितच जास्त आहे. त्यामुळेच गायीवर सतत शास्त्रशुद्ध पद्धतीने कार्य करीत राहिल्यास दर जनावरामागे दूध उत्पादन वाढीची शक्यता आहे. परंतु नजिकच्या १०–१५ वर्षांततरी ही वाढ दृष्टिपथात नाही. तोवर म्हशी बुडवून टाकण्याची भाषा किंवा आता संकरपैदाशीचा कार्यक्रम सरकारने हाती घेतला आहे तेव्हा मुंबईकरांचे व एकूण जनतेचे नष्टचर्य संपून, कृष्ण कन्हैय्याचा अवतार जणू होऊन गोकूळ निर्माण होईल हे मनाचे मांडे खाण्यात कोणी मशगुल होऊ नये हे बरे! आम्ही गायीच्या विरुद्ध नाही आणि म्हशीच्या बाजूचेही नाही. आम्ही आहोत दूधउत्पादन वाढीच्या बाजूचे, ते स्वस्त करण्याच्या बाजूचे आणि मुबलक प्रमाणांत, शुद्ध स्वरूपात जनतेला उपलब्ध व्हावे या बाजूचे. परंतु गाय विरुद्ध म्हैस हा वाद आज तरी, अगदी तुटपुंज्या उत्पादनाचे वेळी निरर्थक आहे.

ऊरुळीकांचन येथे भारतीय कृषि-उद्योग प्रतिष्ठानच्या विद्यमाने पुणे जिल्ह्यात श्री. मणीभाई देसाई यांच्या प्रेरणेने कमी संकरपैदाशीचा शास्त्रशुद्ध प्रयोग सुरू आहे. त्याप्रयोगापुढेही असंख्य समस्या आहेत आणि त्यास समर्थपणे तोंड देण्याचे कार्य चालू आहे. अशा प्रयोगाकडे पूर्वग्रह बाजूला ठेवून मोकळ्या मनाने पाहिले पाहिजे. गाय ही तर आर्थिकदृष्ट्या अधिक कार्यक्षम ठरली तर वादविवादात न शिरता अपसुकच ती आपल्या सामर्थ्याने मानाचे स्थान पटकावील.

शहरी दूध उत्पादन विरुद्ध ग्रामीण : सांप्रत हाही असाच एक निरर्थक वाद आहे. 'दुधाची शेती' करूनच दूध

प्रश्न सोडविण्याचे धोरण शास्त्रज्ञाने अंगिकारले पाहिजे; ग्रामीण विभागातील दूधउत्पादनाला खऱ्या अर्थाने प्रोत्साहन देऊन ग्रामीण विभागातून दूधउत्पादन वाढ झाली पाहिजे. पण हे होईस्तवर बराच कालावधी लागणार आहे. तोवर आपल्याला शहरी दूध-उत्पादनाची हेळसांड करून मुळीच चालणार नाही. आज जे सरकारी नियंत्रणाबाहेर मुंबई उपनगरात गोठे आहेत तेथे एक प्रकारचे अराजक आहे. ह्या सर्व गोठ्यांत मिळून सुमारे १ लाख दुभत्या म्हशी आहेत. त्यांचे रोजचे ६ लाख लिटर दूध मुंबई शहराला मिळते. एकूण दूधपुरवठ्यापैकी ६० % दूध-उत्पादन ह्या अशा गवळ्यांवर अवलंबून आहे. तेव्हा ह्या दूधउत्पादनाची सध्या गरज आहे ही गोष्ट दृष्टीआड करता येणार नाही. आरोग्याच्या दृष्टीने त्यांचे भर वसतीतून उच्चाटन करणे आवश्यक आहेच; पण हे करीत असताना त्यांचा दूधपुरवठा शहराला मिळत राहील हे पाहिले पाहिजे. त्याकरिता स्वतंत्र डेअरी झोन मुंबईच्या उपनगराच्या हद्दीतच स्थापन करून जे कोणी गवळी शास्त्रीय पद्धतीने, जरूर त्या स्वच्छतेचे पालन करून शिस्तीत वागायला तयार असतील त्यांना पुनर्वसनाकरिता जरूर त्या सवलती दिल्या पाहिजेत. सध्याच्या ह्या दूधउत्पादनात विशेष असा आहे की म्हशीचे दूध काढल्यावेळेपासून २–३ तासातच गिऱ्हाईकांना दूध पोहोचते होते आणि हा विशेष शाबूत ठेवण्यासाठी म्हणूनच मुंबई उपनगरात डेअरी झोन स्थापन करायला हवा असे आम्ही सांगत आहोत. जेवढी जनावरे दूर जातील तेवढा दूध थंड करण्याचा व मोटार वहातुकीवरचा खर्च वाढत रहाणार आहे. ह्या दृष्टीने आम्ही गेली १०–१२ वर्षे मुंबई शहरात डेअरी झोन हवा अशी मागणी करीत आहोत. आता नगरपालिकेने असा डेअरी झोन मंजूर केला आहे. त्याचे काम प्रयत्नपूर्वक पूर्ण केले पाहिजे.

खेड्यात म्हशी नेल्या म्हणजे दूध-उत्पादन स्वस्त होते, हाही असाच एक गैरसमज आहे. तेथे गेल्यावर वासरे जगू लागतील हाही एक असाच गैर-समज आहे. खेड्यात जर १००–२०० म्हशींच कळप एकेका मालकाचे नेले तर प्रचलित उत्पादनखर्चात फार मोठा फरक पडत नाही. आर्थिक दृष्टिकोनातून ह्या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे. ‘दुधाची शेती’ ही आदर्श दूधव्यवस्था आहे. त्याप्रत दूधव्यवसायाचा व पशुसंवर्धनाचा विकास करायचा आहे. डेअरी झोन किंवा मोठाले कळप हे मध्यंतरीच्या काळाकरिता सहन केलेली सोय आहे. खरे म्हणजे ती शेती-विकासाच्या दृष्टीने गैरसोयच आहे. परंतु दुधाची गरज असल्यामुळे थोड्या काळापुरतीच सहन करायची आहे. हा काळ थोडा किंवा अधिक रहाणार किंवा काय हे, दूधधंद्यासंबंधीची धोरणे किती इमानदारीने पार पाडली जातात त्यावरच अर्थात अवलंबून रहाणार आहे.

आरे कॉलनीच्या दूधधंद्यासंबंधीही असाच एक गैरसमज आहे. आरे

कॉलनीत एक राष्ट्रीयकरणाचा महान प्रयोग दूधउत्पादनाच्या क्षेत्रात सरकार करून राहिले आहे. असा एक गैरसमज आहे. प्रत्यक्षात तेथे गोठे सरकारी मालकीचे आहेत. त्यातील म्हशी खाजगी गवळ्यांच्या मालकीच्या आहेत. दूध फक्त सरकार खरेदी करते ह्यात राष्ट्रीयकरणाचा काहीच संबंध नाही. दूधधंद्याचे राष्ट्रीयकरण करायचे तर सर्व खाजगी दूधविक्री बंद करून सर्व उत्पादन व्यवस्था सरकारी मालकीची करायला हवी. तसे जोवर होत नाही तोवर आरे कॉलनी आणि राष्ट्रीयकरण याचा सुतराम् संबंध नाही. आरे कॉलनीच्या दुधाची जर सरकारी दूध-योजनेला गरज असेल तर तिचे आज ज्या पद्धतीने पद्धतशीरपणे विघटन होऊ दिले जाते आहे, ती अक्षम्य गुन्हेगारी आहे. महाराष्ट्र टाइम्समधील डॉ. पी. व्ही. मंडलीक यांचे आरे कॉलनी संबंधीचे पत्र व्याकूळ करणारे आहे. २०–२५ वर्षे दुधाचा धंदा करणारे गवळी धंदा करणे परवडत नाही म्हणून, म्हशींना खायला घालता येत नाही म्हणून, त्या मुक्या जनावरांचे उपासमारीने होणारे हाल पहावत नाहीत म्हणून म्हशी तेथेच सोडून, आरे कॉलनी सोडून पळून जात आहेत ही घटना बेचैनी आणणारी आहे. आरे कॉलनीत आणखीही ४००–५०० म्हशी उपासमारीने मरणाच्या वाटेवर आहेत. महाराष्ट्रांतील दुष्काळ आरे कॉलनीत अवतीर्ण झाला आहे. ही परिस्थिती निर्माण होऊ देण्याला व दूध-धंद्याचा नाश करण्याला महाराष्ट्र सरकारचे शेतीखातेच जबाबदार आहे. काहीतरी थातुरमातुर उपायांनी आरे कॉलनीची परिस्थिती सुधारणार नाही. त्याकरता धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत आणि ते जर करायचे नसेल आणि सरकारला ते दूध महाग पडते असे वाटत असेल तर कॉलनी बाहेर दूध देण्याची परवानगी तरी आरे गवळ्यांना द्यावी ही जी मागणी आम्ही मागेच केली आहे, तिचा पुनरुच्चार करावा लागत आहे. ●

# आमची फिर्याद

आतापर्यंत आम्ही सरकारी दूध योजनेच्या गैर कारभाराचे मांडले. दूध-प्रश्नाची परिस्थिती अत्यंत असमाधानकारक आहे हे आपण पाहिले. ही परिस्थिती सुधारण्यासाठी काय करायला हवे, ह्या प्रश्नाचे आमचे उत्तर आता देत आहोत.

कोणत्याही दूधयोजनेचा विचार करीत असताना दूधउत्पदनापासून सुरुवात करायला हवी. म्हणजे मग दूध




उत्पादनाला आवश्यक असणाऱ्या गोष्टी स्थिर किमतीत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारने घेतलीच पाहिजे. काही गोष्टींच्या किमती वाढतात, त्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे. अपुरा पुरवठा व वाढती मागणी यांचा मेळ बसत नाही म्हणून किमती वाढतात. पण नियोजनाने ह्या किमती आटोक्यात ठेवण्याचे सर्वाधिकार आज सर्व सत्ताधीश सरकारला प्राप्त झाले आहेत. त्यांचा योग्य उपयोग तरी सरकार करीत नाही. किंवा नियोजनातच काहीतरी चुकते आहे म्हणून किमतीवर नियंत्रण रहात नाही आम्हाला वाटते दोन्हीही गोष्टी सरकार धड करीत नाही. दूधउत्पादनाला आवश्यक असलेल्या पेंडी, वगैरे पदार्थ येथे टंचाई करून, परकीय चलन मिळते म्हणून परदेशात पाठवायला आपण सूट देणार आहोत काय? त्यामुळे येथे पशुखाद्यांचे भाव बेसुमार वाढतात. जवळजवळ सरकारी नियंत्रणाखाली चालणाऱ्या 'सुग्रास' ह्या पशुखाद्याचा भाव ता. १।११।७२ पर्यंत एक टनाला ५०० रु. हा होता तो ६३० करण्यात आला. आणि ता. ५।२।७३ पासून ८०२ करण्यात आला. सरकारच जर भाव स्थिर कण्याऐवजी वाढवू लागते तर त्याचा अपरिहार्य परिणाम दूधाउत्पादनाची किमत वाढण्यात होणारच. आम्ही मागे दूधउत्पादनालाला आवश्यक असलेल्या गोष्टींचे भाव कसे वाढत आहेत हे कोष्टक दिले आहे. त्या भाववाढीला सुमार नाही.

सरकार आपले आधिकार वापरीत नाही याचे उदाहरण गव्हाच्या भुशाच्या भावाचे व गवताच्या भावाचे देता येईल. भुशाच्या भावाचे संपूर्ण नियंत्रण करण्याचे आधिकार सरकाला आहेत. आज भुशाची टंचाई आहे म्हणून भाव वाढविण्याचे मुळीच कारण नाही. भुशाचा नियंत्रित दर आहे ६३ किलोच्या एका गोणीला रु. २६·१५ तर तोच काळ्याबाजारात दर आहे ५२ रुपये. काळ्या बाजारात हवा तेवढा भुसा मिळतो हे पुरवठामंत्र्यांना माहीत आहे. गेले कित्येक महिने भुशाचे धोरण

बदलण्याचे बोलले जात आहे. परंतु ते काही होत नाही. करण्याची इच्छाच नाही किंवा कोठेतरी पाणी मुरते आहे अशी शंकास्पद परिस्थिती ह्या भुशाच्या व्यवहारात आहे. तसेच गवताच्या किमतीसंबंधी. एकतर जो तथाकथित नियमित भाव ठरविला तो बराच चढा होता. फूल गवताचे भाव पूर्वी ५०० किलोला ५० रु. ते ६० रु. असत. ते आता १३५ रु. ठरविण्यात आले. भेळसेळीचे भाव पूर्वी १०० रु. ते १२० रु. असत ते १६५ रु. ठरविण्यात आले. बेराबद्दल आम्ही बोलत नाही, कारण ती जात फारच कमी आहे. कारण गुजरातमध्ये दुष्काळ आहे. तेव्हा गवत कापणीच्या हंगामात चढे भाव असले तर शेत-कऱ्यांना सर्व ठिकाणचे, रस्त्यापासून दूरचे गवत कापण्याला आर्थिक प्रलोभन मिळेल. आणि त्याप्रमाणे यंदा मिळा-लेही. ह्या चढ्या भावाचा यंदा दुष्काळाच्या दिवसात आदिवासी शेत-कऱ्याला बराच आर्थिक दिलासाही मिळाला. एकवेळ फुलाचे चढे भाव आम्ही समजू शकतो; पण ते आम्ही सुचविल्याप्रमाणे १०० रु. ठेवले असते तरीही चालले असते. परंतु भेसळीचा भाव १६५ रु. ठेवण्यात फक्त गवत व्यापाऱ्यांचे हिताचे रक्षण होते. पालघर वगैरे विभागात २-४ गुंड्या वेगळ्या सर्व फुलजातीच्या गठ्ठ्यात घालून फुलाचे भावात खरेदी केलेले गवत भेसळीच्या भावात विकून पैसे मिळ-ण्याची सोय ह्या चुकीच्या भावामुळे व्यापाऱ्यांनी केलेली आहे. तेव्हा ही जी भाववाढ आहे तिची कारणे राजकीय आहेत. राजकीय सत्ता हाती असलेले शासन जोवर ह्या बाबतीत निर्णय घेत नाही तोवर वाढलेल्या भावाचा बोजा उत्पादकांवर व गिऱ्हाइकावर अपरिहार्यपणे पडतो आणि त्याची जबाबदारी सरकारची आहे. गवताचे रेशनिंग करून गवत वाटप व्यवस्था करतो असे आश्वासन देऊनही पुरवठा मंत्री त्याबाबतीत स्वस्थच आहेत आणि दूधउत्पादकांना संपूर्णतया गवतव्यापा-ऱ्यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. गवताबाबत एक गोष्ट अशी आहे की, यंदा जरी दुष्काळी परिस्थिती असली तरी पडलेल्या पावसामुळे गवत वाढायचे ते वाढलेच. दुष्काळाची झळ म्हणावी तशी गवताला मुळीच लागलेली नाही. आणखी दुसरी गोष्ट अशी आहे की दुभत्या म्हशीला थोडा दाणा कमी खायला घातला तरी चालेल परंतु; रोज ९-१० किलो गवत घातले नाहीतर तिची उपासमारच होते. तेव्हा आमचे उत्तर असे आहे की सरकारने दूध-उत्पादनाला लागणाऱ्या सर्व वस्तूंचे भाव नियमित दराने मिळण्याची व्यवस्था करायला हवी. ती तशी फार कठीण गोष्ट नाही. मागे गवत व दाण्याचे रेशनिंग होते आणि ते चांगले समाधानकारक चालले होते. आता तर एकाधिकार खरेदी व्यवस्था आहे. सर्व गव्हाचा व्यापार सरकार हाती घेणार आहे. तेव्हा दाणा व गवत यांचे रेशनिंग करून भाव व पुरेशा प्रमाणात मिळ-ण्याची हमी देता येईल. हा सर्व राज-

कीय प्रश्न आहे. आणि जर त्याला राजकीय उत्तर आहे. तर मग सरकारने लोकांना विश्वासात न घेता केलेल्या दूधभाववाढीविरुद्ध राजकीय हेतूने विरोधी पक्ष चळवळ करीत आहेत हे म्हणण्यात काय अर्थ आहे? बहुतेक सर्व राजकीय पक्ष व महागाई प्रतिकार संयुक्त महिला समिती ह्या महिला संघटनेने दूधभाववाढ प्रकरण प्रकर्षाने जनतेच्या समोर आणून ह्या प्रश्नाला चालना दिली त्याबद्दल ही मंडळी अभिनंदनास पात्र आहेत. इतर वाढत्या वस्तूंच्या किमतीबरोबर दूधउत्पादनाला आवश्यक वस्तूंच्या वाढलेल्या किमतीचा प्रश्नही हाती घ्यावा असे आम्ही सूचवू इच्छितो. म्हणून वस्तूंच्या किमती वाढत आहेत तेव्हा दुधाचा भाव वाढणारच हा युक्तिवाद अगतिकतेचा द्योतक वाटतो. पंचवार्षिक योजना, नियोजन, कल्याणकारी राज्य ह्या गोष्टींना मग काहीच अर्थ उरत नाही. ह्या वाढणाऱ्या किमती रोखल्या नाहीतर सर्व आर्थिक क्षेत्र अरिष्टात सापडून सर्व देशच संकटांच्या खाईत ढकलला जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

आम्ही खाली एका म्हशीचा गेल्या काही महिन्यातील दाण्याचा खर्च देत आहोत. साधारण रोज ६॥ लिटर दूध असलेल्या १ म्हशीचा खर्च खालील-प्रमाणे--

| महिना | म्हशींची संख्या | खर्च रु. | एका म्हशीस खर्च रु. |
|---|---|---|---|
| जुलै १९७२ | २१७ | २३३२३ | ३.४७ |
| ऑगस्ट | २१६ | २२४२३ | ३.३५ |
| सप्टेंबर | २२१ | २२९७८ | ३.४७ |
| ऑक्टोबर | २२२ | २५०४२ | ३.६४ |
| नोव्हेंबर | २२६ | ३२१२० | ४.७३ |
| डिसेंबर | २३२ | ३४५४० | ४.८० |
| जानेवारी | २३१ | ४१८३० | ५.८४ |

ह्या खर्चावरून एका म्हशीचा रोजचा दाण्याचा खर्च २.३७ रु. वाढला आहे. सुग्रासचे भाव ०.५० पैशावरून ०.८० पैशावर गेला आहे. एका म्हशीला ६॥ किलो कमीत कमी दाणा खायला घालतात असे गृहीत धरले तरी प्रत्येक म्हशीमागे २ रु. दाण्याचा खर्च वाढला आहे. मुंबई व उपनगरात १ लाख जनावरांना दाणा वापरतात. त्यावर हा रोजचा वाढीव बोजा २ लाख रुपयांचा पडला आहे. वर्षभरात ७ कोटी ३० लाख रुपयांचा हा अप्रत्यक्ष करच बसला आहे आणि हे वाढीव पैसे काही शेतकरी व उत्पादकाच्या हातात न जाता व्यापाऱ्याच्या हातात जातात हा फार मोठा तोटा आहे. भाववाढ रोखण्यातील सरकारची असमर्थता ही गिऱ्हाईकावर भुर्दंड बसवायला कशी कारणीभूत होते हे वरील उदाहरणावरून स्पष्ट होते. शेंगदाण्याच्या पेंडीचा भाव १००० किलो म्हणजेच १ टनाला ५२५ रु. होतो तो आता १६०० रु.; तर गवारीचा भाव २८० होता तो ८६० रुपये झाला आहे. भाववाढीला काही सुमारच राहिलेला नाही आणि

कसायाच्या सुरीपुढे बकऱ्याने दीनवाणे होऊन मान तुकवावी त्याप्रमाणे जराही आवाज न काढता दूधउत्पादक भाववाढीला शरण जात आहेत!

दूधउत्पादनाला आवश्यक असलेल्या वस्तूंच्या किंमतीची हमी मिळाल्यावर दूधउत्पादनाची शास्त्रशुद्ध किंमत काढली पाहिजे. शहरी दूधउत्पादनाची किंमत व ग्रामीण दूधउत्पादनाची किंमत काढण्यात आली पाहिजे आणि त्याप्रमाणे दूधउत्पादकांचा दुधाचा भाव सरकारने देण्याची तयारी ठेवायला हवी. दूधवाटपातून सरकारने आपले अंग काढून घेण्याच्या तयारीने लवकरात लवकर सर्व दूधव्यवहार मिल्क बोर्डाची कायद्याने स्थापना करून त्यांचेकडे सोपविण्याची तयारी करावी. दरम्यानच्या काळात जनतेच्या प्रतिनिधींना विश्वासात घेऊन ५% फॅटचे का होईना पण परवडणाऱ्या किंमतीत गिऱ्हाईकांना दूध देण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्याकरिता जरूर ती सबसिडी द्यावी लागली तरी दिली पाहिजे. कायम स्वरूपात सबसिडी देता येणार नाही हे निश्चितच. परंतु तोपर्यंतच्या काळात दूधधंद्याचे सर्व धोरण तपासून घेऊन ते जरूर तेथे बदललेच पाहिजे. दूधउत्पादनावरच भर द्यायला हवा. वाटप हा उत्पादनाचा एक भाग रहावा. दूधउत्पादकांना व विशेषतः ग्रामीण दूधउत्पादकांना उत्पादनाला प्रेरक राहील असा भाव मिळू लागल्यावर वाढीव उत्पादन होऊ लागेल. अपुऱ्या दूधपुरवठ्यामुळे दूधप्रमियमवर वाढणारा खर्च कमी करता येईल. ५% दुधाकरिताही होल दूधाची गरज आहे ती पूर्ण होऊ शकेल.

त्याचबरोबर सरकारी दूधयोजनेबाहेर जो खाजगी दूधपुरवठा आहे त्याकडेही त्यालाही प्रोत्साहन द्यावयाचे आहे, उत्पादनात वाढ करायची आहे ह्या दृष्टीने पहावे. डेअरी झोनची स्थापना करून तेथेच उत्पादन केंद्र चालवावे. किंवा आरे कॉलनीत चालवावे. तेथे जास्तीत जास्त शास्त्रीय ज्ञानाचा उपयोग करून भाव कमी करण्याची प्रक्रिया विकसीत करता येईल. त्याचबरोबर हिरव्या वैरणीची सोय, भाकडच्या म्हशींची निगा केंद्रे, वासरे पोसणीचे केंद्र अशा स्वरूपाचे दीर्घ मुदतीचे कार्यक्रम व्यापारी तत्त्वावर चालविता येतील. डेअरी झोनमध्ये सहकारी तत्त्वाचा खऱ्या अर्थाने अमल करणाऱ्यालाच जागा मिळेल, अशीही व्यवस्था करता येईल. आजही दूधधंद्यात पिढचान् पिढचा ह्यात घालविलेले व अनुभव असलेले गवळी आहेत. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग काही मूठभर व्यक्तींना होऊ न देता ह्या अशा उपक्रमांत एकूण समाजाच्या हिताकरता करून घेता येईल. प्रामाणिकपणे जगता येते. जगणे शक्य आहे आणि अप्रामाणिकपणा चालून दिला जाणार नाही आणि प्रामाणिकपणा असेल तरच नफा मिळविण्याचा हक्क आहे हे सूत्र पकडून कार्यवाही करावी लागेल.

मिल्क बोर्ड प्रस्थापित होण्यास वेळ लागेल. त्या दरम्यानच्या काळाकरिता

वेगळी व्यवस्था करावी लागेल. परंतु त्यात दूधउत्पादन हीच मध्यवर्ती कल्पना घेऊन परिपोष केला जाईल.

दूधधंद्यात स्वावलंबन हा महामंत्र राहील. पावडरचा व बटर ऑईलचा उपयोग आता ठराविक वर्षानंतर करायचाच नाही हे ठरवून काम करावे लागेल.

तोटयात चालणाऱ्या योजना, अवास्तव खर्च, उधळपट्टी, थांबवावीच लागेल. ज्या विभागात पुरेसे दूध नाही तेथे दूधयोजना बंद करावी लागेल आणि जेथे दूधउत्पादनाची नैसर्गिक अनुकूलता आहे त्यावरच लक्ष केंद्रित करून तेथे दुग्धव्यवसाय वर सांगितल्या-प्रमाणे विकसित करण्यात येईल. वर्षानु-वर्षे तोटा येतोच आहे आणि तरीही काही बदल न करताच तसेच कसे तरी ढकलगाडीप्रमाणे ज्या योजना चालल्या आहेत त्याबद्दलचे सोक्षमोक्ष लावणारे निर्णय घ्यावे लागतील.

थोडक्यात जास्त दूध, स्वच्छ दूध, व स्वस्त दूध ही त्रिसूत्री पूर्ण करण्या-साठी योजना राबवायची आहे. परंतु हे सर्व करायचे तर दूधयोजनेला त्यांच्या कामाचे मूल्यांकन करावे लागेल. धोरणात्मक बदल करावे लागतील. हा काही असा प्रश्न नाही की तो सोड-विताच येणार नाही. तो सोडवायला हवा आहे आणि त्याचा निश्चित मार्ग आहे. अन् तरी सरकारची वृत्ती वाळूत डोके खुपसून बसलेल्या शहामृगाची आहे. सरकार ही वृत्ती सोडत नसेल तर ती सरकारला सोडायला भाग पाडले पाहिजे. हे जनतेच्या हाती व निर्धारावर अवलंबून आहे.

आम्ही आमच्या परीने गेली कित्येक वर्षे हा प्रयत्न करत आहोत. किंबहुना आरे कॉलनी व वेकास दूधयोजनेच्या अगदी प्राथमिक अवस्थेपासून आम्ही त्यांचा अभ्यास व त्यांवर टीका करून संबंधित अधिकाऱ्यांच्या नाराजीस पात्र झालेलो आहोत. अर्थात ही टीका त्यातील दोषनिवारण व्हावे यासाठीच होती व दूध ही बाब समस्या म्हणून लोकांना प्रकर्षाने जाणवण्याच्या पूर्वीच्या काळात, मुंबईच्या समग्र दूधपुरवठ्याच्या प्रश्नाच्या अभ्यासातून केलेला होती.

दुधाच्या उत्पादनाच्या बाबीकडे सरकारची जी सतत डोळेझाक चालली आहे, त्याची परिणती गेल्या दोन-तीन वर्षांत आरे कॉलनीत निर्माण झालेल्या भयानक परिस्थितीत झाली आहे. आरे कॉलनीतील बहुसंख्य परवानेधारकांवर कोसळलेल्या आर्थिक अरिष्टाचा व त्यांच्या वाताहतीचा उल्लेख पूर्वी आलेलाच आहे. या गवळ्यांतर्फे संघटित-पणे सरकारकडे दाद मागण्याचेही आम्ही प्रयत्न केले. सरकारी अधि-काऱ्यांच्या अक्षम्य बेमुर्वतखोरपणामुळे कित्येकदा गवळ्यांकडे आठवड्याच्या बिलापैकी एक नवा पैसाही न आल्या-चेही प्रकार घडले आहेत. या आर्थिक हलाखीतून मार्ग काढण्यासाठी व थेट मुख्यमंत्र्यांकडे दाद मागण्यासाठी, आरे कॉलनीतील महिलाही आपल्या तान्ह्या लेकरांना घेऊन रस्त्यावर आल्या होत्या. लोकशाहीत एक व्यक्ती किंवा एक

संघटना विशिष्ट मर्यादेपर्यंतच जाऊ शकते.

आमच्या व्यक्तिगत मर्यादेने आम्ही विधायक सूचना करून आमची जबाबदारी उचलण्याची तयारी दर्शविली आहे. परंतु सर्वसत्ताधीश हा सर्वज्ञानीही असतो या समजुतीत आपले सरकार वावरत आहे.

प्रास्ताविकात उल्लेख केल्याप्रमाणे, सांप्रत दूधयोजनेच्या दोषांचा पाढा आम्ही वाचला आहे. ह्या सर्व योजनेची जाहीर चौकशी कशासाठी हवी त्याचा प्रत्यक्ष पुरावाच आम्ही सादर केला आहे. भांडवली खर्च वर्षानुवर्षे उत्पन्न न देताच पडून राहून देणे हा सामाजिक गुन्हा समजला पाहिजे. तो दूधयोजनेत भरपूर प्रमाणात घडत आहे. आरे कॉलनीची ३३४५ एकर जमीन घेतली त्याकरिता मोबदला म्हणून दिलेली रक्कम एकरी २००० रु. प्रमाणे आहे. त्यापैकी फक्त २५० एकर गोठ्याखाली व पॅरा गवताच्या लागवडीखाली सुमारे ५०० एकर शिवाय आणखी कुक्कुटपालन, बेकरी, खाद्य कारखाना, डेअरी इन्स्टिटयूट अशासारख्या बांधकामाखाली २५० एकर गेली आहे, असे गृहीत धरले तरी १००० एकरांचा हिशेब मिळतो. उरलेली २३४५ एकर ही तशीच पडून आहे. ह्या जमिनीचे संरक्षण, देखभाल, कुंपण वगैरे सर्व अवास्तव खर्च उत्पन्नाची वाढ करण्याची व्यवस्था नसल्यामुळे तोटा आणणारे ठरतात. दापचरी योजना १० वर्षे आपला खर्चच करीत आहे. उत्पादन रोजचे ७०० लिटर. ७०० लिटर उत्पादन करण्याला जास्तीत जास्त ६–७ लाख पुरेसे आहेत. परंतु त्याकरिता खर्च झाला आहे २। कोटी रुपये. ह्याचे व्याजच नुसते विचारात घेतले तरी तें असह्य आहे. ही सर्व उधळपट्टी आहे. अपुरा दूधपुरवठा, एकूणच सर्व यंत्रसामग्रीचा अपुरा वापर, दूध-भुकटीवर भिस्त, वगैरे सर्व गोष्टी ह्या नुसत्या क्षमा करून विसरून जाव्यात अशा स्वरूपाच्या चुका नाहीत तर ती अक्षम्य हेळसांड, बेपर्वाई आणि बेजबाबदारी आहे. ह्या समग्र प्रश्नाची चौकशी करण्याकरिता ज्याला 'प्रायमा फेसी केस' किंवा प्रथमदर्शनी आरोप म्हणता म्हणता येईल, असे पुराव्यानिशी आरोपपत्र आम्ही दाखल केले आहे. पशुसंवर्धनाची जबाबदारी असलेले अधिकारी, आरे कॉलनीतील पशुहत्त्येला जबाबदार आहेत. ह्या सर्व प्रकरणातील आमची फिर्याद आम्ही जनतेच्या कोर्टासमोर गुदरीत आहोत. आम्ही पुरावा सादर केला आहे. आमचे म्हणणे मांडले आहे. संपूर्ण चौकशीची मागणी करून दूधखात्याला त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली आहे. तरी जनतेच्या अदालतीनेच ह्या बाबतीत काय तो निवाडा करावा. ● ● ●

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. MH-649

